EAGLE LEAP

International Publication

EDITED BOOK

"WOMEN EMPOWERMENT, WOMEN LAWS AND EDUCATION IN INDIA"

Editor :-

Dr. Vilas Aba Gaikwad

Academic year

2023-24

“WOMEN EMPOWERMENT, WOMEN LAWS AND EDUCATION IN INDIA”

Editor :-

Dr. Vilas Aba Gaikwad

EAGLE LEAP

Title : **Women Empowerment, Women Laws And Education In India**

Editor's : **Dr. Vilas Aba Gaikwad**
Education-M. A. Public Administration, SET, NET, Ph.D. Associate Professor and Head of Department of Public Administration, Matoshri Shantabai Gote College Washim District Washim.

Publisher : **Sandesh Dadarao Pahulkar**
Address **Chinchwad, Pune MH 411033**

Pritinting & Publish : **Eagle Leap Printers And Publisher Pvt. Ltd.**
SNO 57/4/5 Balaji Colony, Nr. Hamuman Mandir, Bijali Nagarshivnagar, Chinchwad, Pune MH 411033
Contact: 8600071634
Email: eagleleap.pp@gmail.com

ISBN : **978-81-963340-4-8**

Publishing Date : **20/09/2023**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means without permission.

संपादकीय

भारतातील महिला सक्षमीकरण, महिला कायदे आणि शिक्षण हा संपादित ग्रंथ विद्यार्थी व वाचकांच्या हाती देताना खूप आनंद होत आहे. भारताला स्वातंत्र्यपूर्व काळापासून पुरोगामी व सुधारणावादी विचारांचा देश मानला जातो. प्राचीन काळात याच भारतामध्ये जिथे नारीला पुजले जाते तेथे देवतांचा वास असतो असे सांगितले गेले. मात्र याच भारतामध्ये महिलांवर अनेक अत्याचार देखील झाले. पुरुषाच्या तुलनेत तिला गौण स्थान दिले गेले. या सर्व बाबींची दखल येत आधुनिक भारतातील विशेषतः स्वतंत्र तर भारतातील समाज सुधारक आणि महापुरुषांनी महिलांना समाजामध्ये मानाचे स्थान मिळण्यासाठी आपले मोठे योगदान दिले आहे.

भारतीय राज्यघटनेमध्ये सामाजिक समता, बंधुता व न्याय या तत्त्वाचा स्वीकार केलेला आहे. त्यामध्ये भारतात जात, धर्म, पंथ वंश, लिंग याद्वारे कोणीही भेदभाव करणार नाही, अशी तरतूद आहे. तरीही काही प्रमाणात पुरुष सत्ता संस्कृतीमुळे महिलांना पुरुषांच्या बरोबरीने काम करणे अशक्य होत होते. अशावेळी या समाजसुधारक व महापुरुषांच्या योगदानामुळे महिलांच्या सक्षमीकरण व विकासाच्या अनुषंगाने अनेक कायदे व धोरणे तयार करण्यात आली आणि महिलांना सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाची सोय व व्यवस्था करण्यात आली. मात्र असे अनेक कायदे असताना सुद्धा आज महिलांवरील अत्याचार अनेक भागात होत असल्याचे दिसून येत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षा नंतरही या घटना अतिशय दुर्दैवी आहेत. त्यामुळे या व्यवस्थेमधील महिलांचे स्थान ही अत्यंत महत्त्वपूर्ण बाब असून या महिलांच्या सक्षमीकरणांमध्ये असणारे कायदे त्यांना भारतीय व्यवस्थेमध्ये दिले जाणारे शिक्षण यावर लिखाणाला चालना देणे हा मुख्य हेतू असल्यामुळे हा संपादित ग्रंथाचा उद्देश समोर ठेवून हे ग्रंथ प्रकाशित करीत आहोत. सदर विषयाला अनुसरून जवळपास ५० उपविषय देण्यात आलेले होते त्यापैकी अनेक विषयावर लेखकानी संशोधित लेख पाठविले आहेत. या संपादित ग्रंथाद्वारे महिलांचे सामाजिक क्षेत्रातील स्थान, महिलांचे सामाजिक आर्थिक प्रगती, भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील महिलांचे भूमिका, भारतातील महिला नेतृत्व, महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण अशा अनेक विषयावर संशोधीत लेख प्राप्त झाले. या संपादित ग्रंथाच्या माध्यमातून महिलांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व राष्ट्रनिर्माणाच्या क्षेत्रातील कार्य एकत्रित बांधण्याचा व वाचकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या ग्रंथाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. भारतीय व्यवस्थेतील महिलांच्या सक्षमीकरणाच्या अनुषंगाने जे विविध कायदे तयार करण्यात आलेले आहेत त्याचा अभ्यास करताना प्रस्तुत संपादित ग्रंथ निश्चितच उपयोगी ठरेल याची खात्री व विश्वास आहे.

प्रस्तुत ग्रंथासाठी लेखन करणारे माझे सर्व वरिष्ठ प्राध्यापक मित्र व प्राध्यापक भगिनी, सहकारी, संशोधक, विद्यार्थी यांनी लेखन केले त्याबद्दल त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. कारण त्यांच्याशिवाय हा ग्रंथ पूर्ण होऊ शकला नसता. मला सदर संपादित ग्रंथ निर्माण करण्यास प्रेरणा देणारे माझ्या मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालयाचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे व संस्थेचे सन्माननीय इतर सदस्य , माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि माझे प्राध्यापक मित्र यांच्या प्रेरणेमुळे व आशीर्वादाने हा संपादित ग्रंथ निर्माण करण्यात आला. सर्वात महत्त्वाची म्हणजे या संपादित ग्रंथाच्या प्रकाशनाची संपूर्ण जबाबदारी येणारे माझे मित्र आंतरराष्ट्रीय पब्लिकेशन ईगल लिप चे कार्यकारी प्रमुख माननीय संदेश पहुळकर पुणे यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

प्रस्तुत संपादित ग्रंथाला सर्व संशोधक वाचक स्वीकारतील व त्याचे स्वागत करतील अशी आशा व्यक्त करतो.

- डॉ. विलास गायकवाड

INDEX

०१.	महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण - प्रा सुरेन्द्र हरीभाऊ किन्हीकर	08
०२.	रमाबाई महादेवराव रानडे यांनी सेवासदन द्वारे स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले कार्य : ऐतिहासिक अभ्यास - डॉ नितीन उल्हासराव सराफ	14
०३.	महिला सबलीकरण आणि प्रशासकीय कायद्यातील तरतूदी एक अभ्यास - डॉ. बालाजी कोंकटवार	20
०४.	भारताच्या विकासात महिला सबलीकरणाचा प्रभाव - प्रा.डॉ. दयानंद उत्तमराव राऊत	26
०५.	महिला सबलीकरणाचे घटक आणि आर्थिक विकास - प्रा.दीक्षित साहेबराव ज्ञानोबा	31
०६.	सावित्रीबाई फुले यांची कविता आणि महिला सक्षमीकरण - डॉ. विष्णू नामदेव लांडे	37
०७.	स्वातंत्र्य पूर्वकाळातील भारतातील महिला विषयक कायदे - प्रा. डॉ. बी. आर. तनपुरे	43
०८.	मुस्लीम महिलांचा राजकीय सहभाग - प्रा. डॉ. बबिता येवले	50
०९.	भारताच्या विकासात महिला सबलीकरणाचा प्रभाव - प्रा.डॉ. दयानंद उत्तमराव राऊत,	57
१०.	महिला शिक्षण आणि त्याचा महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम - प्रा. कु. पल्लवि रामेशराव देशमुख	62
११.	७३ वी घटना दुरुस्ती आणि महिला सक्षमीकरण - प्रा. डॉ. शरण शिवरुद्रप्पा निलंगेकर	65
१२.	महिला सबलीकरण एक सक्रिय प्रक्रिया - प्रा. रंजना अनक्षिणे	68
१३.	महिला सक्षमीकरणामधील समस्या व त्यावरील उपाययोजना - प्रा. डॉ. संकेत सुरेश काळे	73
१४.	नारी स्वतंत्रता का एक कड़वा सच - डॉ. फिरोज एस खान	79
१५.	सच के आईने में महिला सशक्तिकरण कल और आज - डॉ अनूप सिंह	82

16.	**Empowering Through Education: The Dynamic Link Between Women's Education and Economic Empowerment in India** - Vivek Sanjay Pawar,	85
17.	**Nayantara Sehgal : Feminist concerns seeking independent existence of women** - Dr.Prachi Sharad Patharkar,	98
18.	**Participation Of Women In Politics & Policy Making At Gross Root Level An Analysis** - U. Gangadhar,	103
19.	**Role of Government in Women Empowerment An Administrative Study** - Prof. Dr. J.U. Hatkar,	112
20.	**Sudha Murty: An Icon of Women Empowerment in 21st Century** - Dr Satyendra Gadpayale,	118
21.	**The Digital Gender Divide : Women's Access To Technology And Education.** - Anand Uttam Palaspagar, Dr. Sushant Dhanraj Chimne	122
22.	**The Role of Women's Education in Empowerment in India** - Dr. Deepak Subhash Waghmare,	129
23.	**Women Empowerment and Higher Education Perspectives, Challenges & Strategies** - M. Saraswathi	135
24.	**Women's empowerment with NEP 2020** - Shachi Shastri,	144
25.	**Women's Education and Media Representation: Challenges and Opportunities** - Dr . Prashant Diwakar Satpute,	153
26.	**Women's Education and Economic Development** - Dr. Ajay B. Patil	163

01 महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण

प्रा सुरेन्द्र हरीभाऊ किन्हीकर,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, जि अमरावती.
Mobile No. 9421786488
Email : skinhikar2@gmail.com

गोषवारा :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतातील महिला शिक्षण आणि राजकीय सक्षमीकरण या विषयावर प्रकाश टाकण्यात येत असून भारतीय महिलांचा शिक्षणाविषयी अभ्यास तसेच राजकीय सक्षमीकरणाचा सुद्धा अभ्यास करण्यात येत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या काळात खूप कमी स्त्रिया शिक्षण घेत होत्या. शिक्षणाकरीता मोजक्याच घराण्यातील स्त्रिया शाळांमध्ये प्रवेश घेत होत्या. तेव्हाची भारतातील सामाजिक परिस्थिती, चालीरीती, अंधश्रद्धा, बालविवाह, सतीप्रथा अशा जाचक अटींमुळे स्त्रिया घराबाहेर पडत नव्हत्या. त्यामुळे भारतातील बऱ्याचशा महिला या शिक्षणापासून वंचित राहिल्या. देशातील मोठ्या घराण्यातील स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली होती. आज बऱ्याच घराण्यातील स्त्रियांनी शिक्षण घेऊन सामाजिक, राजकीय कार्यात सहभाग घेतला. भारताच्या संविधान निर्मितीमध्ये सुद्धा स्त्रियांचा सहभाग होता. सामाजिक कार्यात सुद्धा या स्त्रिया कार्य करू लागल्या, राजकारणात सुद्धा भाग घेऊ लागल्या.शिक्षणामुळे स्त्री आपले विचार मुक्तपणे मांडू लागली. स्वातंत्र्यानंतर तर भारतीय संविधानामध्ये शिक्षणाचा मूलभूत अधिकारच सर्वांना दिल्या गेल्यामुळे देशातील स्त्रियांना शिक्षणाची दारेच खुली केली गेली. याचा परिणाम म्हणून भारतात सुशिक्षित स्त्रियांची संख्या दरवर्षी वाढू लागली. भारताच्या संसदेत व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात महिलांची संख्या कमी होती. मोजक्याच घराण्यातील महिला या राजकारणात सहभागी होत असत. त्यामुळे राजकीय दृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण झाले नाही.

महिला आरक्षण विधेयकाची मूळ कल्पना १९९३ मध्ये मंजूर झालेल्या घटना दुरुस्तीतून उद्भवली आहे. या घटना दुरुस्तीद्वारे ग्रामपंचायतीच्या सरपंचांची १/३ संख्या महिलांसाठी राखीव असल्याची तरतूद केली होती. महिला आरक्षण विधेयकाकडे लोकसभा आणि राज्य विधानमंडळामध्ये या प्रकारच्या महिला आरक्षणाचा विस्तार करण्यासाठी दीर्घकालीन योजना म्हणून पाहिले जाते. या कायद्यामुळे लोकसभा व

राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव आहेत. या कायद्यामुळे राजकारणात महिलांचा सहभाग वाढला व महिलांचे राजकीय सक्षमीकरण होण्यास मदत झाली.

प्रस्तावना :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांचे शिक्षण तसेच महिलांचे राजकीय सक्षमीकरण आणि स्वातंत्र्यानंतर महिलांचे शिक्षण व त्यांचे राजकीय सक्षमीकरण या पैलूंवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. आज भारतात स्त्रिया समाजातील विविध क्षेत्रात अव्वल स्थानी पोहचलेल्या असून त्या सक्षम बनलेल्या आहेत, मग ते सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक किंवा शैक्षणिक क्षेत्र असो. आज भारताच्या संसदेत व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला दिसू लागलेल्या आहेत. १९९३ च्या ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामीण भागातील महिलांचे राजकीय क्षेत्रात येण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते. परिणामी लोकसभेत सुद्धा स्त्रियांचे ३३ टक्के प्रमाण आहे. जी स्त्री घरापुरतीच मर्यादित होती. ती स्त्री आज देशाच्या उच्च पदावर विराजमान झालेली आपणास पहावयास मिळते. भारतीय संविधानाने जरी स्त्री-पुरुषांना समानतेचा मूलभूत अधिकार दिला असला तरी समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान दिलेले दिसते. शिक्षणामुळे स्त्रिया स्वतःच्या पायावर जरी उभ्या राहत असल्या तरी समाजात पाहिजे तसे मानाचे स्थान तिला अजूनही प्राप्त झालेले नाही.

महिला शिक्षण :

भारतात मुलांच्या बरोबरीने मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे की नाही यावर स्वातंत्र्यपूर्व काळात देशभर मोठा उहापोह झाला होता. समाजातील काही घटक मुलींच्या शिक्षणाच्या विरोधात होते. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाईंनी शिक्षणाला विरोध करणाऱ्या घटकाशी झगडून इ.स. १९४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा पुणे येथे सुरू केली. इ.स.१९२० मध्ये महर्षी वि.रा. शिंदे यांनी प्राथमिक शिक्षण मुलांप्रमाणेच मुलींसाठीही सक्तीचे करावे असा विचार मांडला. सर्व मुलींना शिक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी पुणे येथेच मोर्चा काढावा लागला. रमाबाई रानडे, जनाक्का शिंदे अशा अनेक महिला या मोर्चात सहभागी होत्या. सर्व मुलींपर्यंत किमान प्राथमिक शिक्षण तरी पोहोचावे यासाठी रस्त्यावर येत होत्या. तरी समाजातील काही घटकाचा त्यांना विरोध सुरू होता. अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळातील मुलींच्या शिक्षणासाठी अनेक संघर्ष समाजातील नेते मंडळी करत होती. स्वातंत्र्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानामध्ये सार्वजनिक जीवनात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क दिले. याचा परिणाम समाजामध्ये असा झाला की, स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची, शिक्षणाची संधी प्राप्त झाली. शिक्षणामुळे स्त्रियांना बरेच काही कळू लागले. स्त्रिया राजकारणात येऊ लागल्या. शिक्षणामुळे स्त्रियांचा विकास होण्यास मदत झाली. जी स्त्री घरादारापर्यंतच मर्यादित दिसत होती, आता ती शिक्षणामुळे घराबाहेर पडू लागली. स्त्रिया आपले स्वतंत्र विचार

समाजासमोर मांडू लागल्या.

राजकीय सक्षमीकरण:

महिलांचा राजकारणातील सक्रिय सहभाग हा नेहमीच चर्चेचा विषय राहिलेला आहे. भारतात अगदी आर्यांच्या काळापासून स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान आहे. ऋग्वेदात महिलांना राजकारणात स्थान असल्याचेही दर्शविले आहे. उपनिषद व पुराणकाळात ते कायम होते. परकीय आक्रमणानंतरही काही स्त्रिया भारतीय राजकारणात दिसतात. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक भारतीय स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर अनेक महिलांनी राजकारणात अनेक महत्त्वाची पदे भूषविली आहेत. तेराव्या शतकात राज्यकारभाराची सूत्रे महिलांच्या हाती गेल्याचे आपण पाहतो.

उदा. इ.स. १२३६ ते १२४० या काळात रजिया सुलताना, इ.स. सन १५२४ ते १५६४ मध्ये गोंडवाना संस्थानाची महाराणी दुर्गावती, १६ व्या शतकात चांदबिबी, १७ व्या शतकात राजकारणाला नवी दिशा देणारी जिजाबाई, करविरवासीनी महाराणी ताराबाई, इ.स. १७७६ ते १७९५ मध्ये अहिल्याबाई होळकर, इ.स. १७७८ ते १८२९ कर्नाटकातील कित्तूरची राणी चन्नम्मा, २० व्या शतकातील मादाम कामा, कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, अहिल्या रांगणेकर, कमल देसाई, सुचेता कृपलानी, बेगम एजाज रसुल पासून राजकुमारी अमृतकौर, श्रीमती दुर्गाबाई देशमुख दक्षिणानी वेलायुधन, अम्मो स्वामीनाथन, रेणुका रे, मालती चौधरी, पौर्णिमा चौधरी, राणी लक्ष्मीबाई, राणीअवंती बाई, बेगम हजरत महल इत्यादी स्त्रिया राजकारणात सक्रिय होत्या, भारतातील राजकारणातील महिलांचा सहभाग काळाच्या ओघात नि: संशय वाढला आहे.

स्वातंत्र्यानंतर स्त्री आणि पुरुष दोघांना समान राजकीय व नागरी हक्क प्रदान केले आहे. त्यामुळे स्त्रियांना राजकारणात येण्याची संधीच प्राप्त झाली. देशाचे पंतप्रधानपद, मुख्यमंत्रीपद, राष्ट्रपतीपद ,राज्यपालपद, मंत्रीपद, पक्षाध्यक्ष अशी अनेक पदे भारतातील महिलांनी उत्कृष्ठ पणे सांभाळल्याची उदाहरणे आपणास पहावयास मिळतात. यात सरोजिनी नायडू (राज्यपाल, मुख्यमंत्री), राजकुमारी अमृतसर (पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री), मीरा कुमार (लोकसभा सभापती), इंदिरा गांधी (पहिल्या पंतप्रधान), प्रतिभा पाटील (पहिल्या राष्ट्रपती), सुशीला नायर (विधानसभा स्पीकर), सरोजिनी नायडू (राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष) इत्यादी महिलांनी विविध राजकीय पदांवर कामे केली.

इ.स. १९६३ पासून भारतात १६ महिला मुख्यमंत्री झाल्या. १९७५ हे संयुक्त राष्ट्रसंघांनी 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' आणि इ.स. १९७५ – १९८५ ला 'महिला दशक' म्हणून घोषित केले. तेव्हापासून जगात महिला सक्षमीकरणाला बळ मिळाले. इ.स. १९७५ नंतरच्या काळात महिला वर्ष आणि विविध स्त्री सहभागाचा प्रभाव पुढील काळातील महिला विकासाला नवीन दिशा देणारा ठरला. इ.स. १९८८ मध्ये राजीव गांधी सरकारने

राजकीय संस्थांमध्ये ३३ टक्के जागांवर स्त्रियांची नेमणूक करावी असे सुचविले. ७३ आणि ७४ वी घटनादुरुस्ती केल्याने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज मध्ये ३३ टक्के आरक्षण हे जागा व पदांवर देण्यात आले. त्यामुळे भारतात दहा लाख स्त्रिया विविध पदांवर विराजमान झाल्या. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे संसदेतही स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण मिळावे, अशी मागणी महिला करू लागल्या. आता तर हे ३३% आरक्षण नको तर ५०% आरक्षण मिळावे. अशी मागणी विविध महिलांनी नेत्या व संघटना करू लागल्या. पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३% वरून ५०% आरक्षण देणारे पाचवे राज्य महाराष्ट्र ठरले.

१४ एप्रिल २०११ मध्ये महाराष्ट्र सरकारने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिवशी विधिमंडळात ठराव पारित केला. केंद्र सरकारने सुद्धा २०१६ पासून पंचायतराज मध्ये महिलांचे आरक्षण ३३ % वरून ५०% केले आहे. यामुळे संपूर्ण भारतात स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायतराज मध्ये महिलांना ५०% आरक्षण मिळाले. ५०% आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील महिला राजकारणात सहभाग घेऊ लागल्या. ५०% आरक्षणामुळे महिलांचे राजकीय सक्षमीकरण होण्यास सहाय्य झाले. चुल व मुल यापूरतीच मर्यादित असणारी स्त्री ही आता गावाच्या राजकारणात सरपंच, सदस्य, सभापती पदांपर्यंत पोहचू लागली. ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती ही महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाकरिता क्रांतिकारी पाऊल ठरले. ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे आदिवासी महिलांचे पंचायतराज संस्थेतील प्रमाण वाढले. आज सरपंच पदापासून तर देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत महिलांचा राजकीय सहभाग दिसून येत आहे. भारतातील अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांमध्ये महिलांना आमदार, खासदार, इतर लोकप्रतिनिधी म्हणून उमेदवारी दिली जात आहे. बऱ्याच महिला या निवडून देखील येत आहेत. त्यामुळे पक्षामध्ये सुद्धा महिलांचे प्रमाण वाढू लागले आहे.

देशाच्या १९५२ च्या पहिल्या लोकसभा निवडणुकीचा विचार करता ४९९ जागांपैकी २२ महिला सदस्य होत्या. त्यांचे एकूण प्रमाण ४.४ % इतके होते. हळूहळू लोकसभेत महिला सदस्यांचे प्रमाण कमी अधिक दिसू लागले. परंतु २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ५४२ सदस्य संख्या असलेल्या लोकसभेत ७६ महिला निवडून आल्या. त्यांचे प्रमाण १४.२% होते. भारतातील पहिल्या लोकसभा निवडणुकीचा विचार करता २०१९ च्या सतराव्या लोकसभा निवडणुकीत महिलांचे निवडून येण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते. तसेच देशाच्या १९५२ च्या मंत्री परिषदेत एकूण दोनच महिला मंत्री होत्या. देशातील इतर पक्षांच्या मंत्रिपरिषदेत महिला मंत्र्यांची संख्या ही वेगवेगळी असलेली दिसून येते.

१९९१,१९९९, २००४, २००९, २०१४ व २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महिला मंत्र्यांची संख्या ही थोडीफ्फार वाढलेली आहे. २०१९ च्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्री परिषदेत ११ महिला या मंत्री आहेत. यामध्ये स्वातंत्र्यानंतर

प्रथमच इतक्या जास्त महिला कॅबिनेट मंत्री पदावर आल्या. अशा प्रकारे महिलांचे राजकीय सक्षमीकरण झाल्याचे दिसून येते.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत झालेल्या सतरा निवडणुकांमध्ये मात्र हळूहळू महिलांचे उमेदवार म्हणून लोकसभेच्या निवडणुकीत निवडणूक लढविण्याचे प्रमाण वाढलेले आहे. पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील महिलांचा सहभाग दिवसेंदिवस वाढतच आहे. यावरून असे दिसून येते की, महिला या ग्रामीण भागापासून तर देशाच्या राष्ट्रीय राजकारणापर्यंत विविध पदांवर कार्य करीत आहेत. महिला सक्रिय राजकारणात आल्यामुळे त्यांचा परंपरागत सामाजिक दर्जा व भूमिकेमध्ये परिवर्तन होऊन त्यांचे सामाजिक स्थान उंचावले आहे. राजकीय सहभागामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्याचे पाहावयास मिळते. आत्मविश्वासामुळे कोणत्याही संकटावर मात करता येत असल्यामुळे त्यांचे सक्षमीकरण होते. देशातील काही महिला लोकप्रतिनिधी आपली भूमिका सक्षमपणे पार पाडत आहे. महिला आरक्षणामुळे समाजातील वंचित घटकाला सुध्दा राजकारणात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.

निष्कर्ष :

महिलांच्या सक्षमीकरणाकरीता शिक्षण हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात महिलांना समान हक्क दिल्यामुळे विकास झाला आहे. स्त्री सक्षमीकरणाकरीता राजकीय सहभाग देखील तेवढाच महत्त्वाचा आहे. राजकीय सहभागातून सत्ता प्राप्त होत असल्यामुळे प्रश्नांची सोडवणूक करता येते, निर्णय घेता येतात.

प्रस्तुत शोधनिबंधावरून असा निष्कर्ष काढता येतो की, आज स्त्रियांचे प्रश्न संपलेले नाही, अजूनही समाजातील त्यांची उपेक्षा थांबलेली नाही. समाजातील काही घटक स्त्रियांना राजकारणात येण्यापासून परावृत्त करीत आहे. समाजातील वंचित स्त्रियांचे आजही शोषण व उपेक्षा होत असताना दिसते. जर एखादी महिला उच्च राजकीय पदावर असली तर समाजात त्या महिलेची अवहेलना करताना आपल्याला दिसून येते. राजकारणात महिलांना कुटुंबाची साथ मिळणे आवश्यक आहे. आज समाजातील मोजक्याच घराण्यातील स्त्रिया राजकारणात सहभागी होताना दिसतात. अजूनही राजकारणाविषयी देशातील महिला पूर्णतः जागरूक झालेल्या नाही. निवडणुकीत जरी स्त्री मतदारांची संख्या वाढत असली तरी प्रत्यक्ष राजकीय पदावर स्त्रियांची संख्या कमी दिसते.

राजकारणातील स्त्रियांवर कुटुंबाचा प्रभाव आपणास पहावयास मिळतो. भारतातील संसदेमध्ये महिलांचे प्रमाण जगातील इतर देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. इंटर पार्लमेंटरी युनियन या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अहवालानुसार जगातील संसदेतील महिलांच्या प्रमाणाबाबत भारताचा क्रमांक १०८ वा लागतो. आज असे दिसून येते की, महत्त्वाच्या राजकीय पदांवर पुरुषांचीच मक्तेदारी राहिली आहे. संसदेच्या सभागृहात महिलांना प्रतिनिधित्व जरी मिळाले तरी निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान दुय्यम असल्याचे दिसून येते.

भारतात महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला असला तरी महिला राजकीय दृष्ट्या अजूनही पूर्णतः सक्षम बनला नाही.

संदर्भ :

१. Dr Chetana V Donglikar (75 years of independence and women in India) Volume - ll, Laxmi Book Publication

२. डॉ सुवर्णा सूर्यवंशी(महिला सबलीकरण) ऑरेंज बुक पब्लिकेशन, भिलाई, छत्तीसगढ २६ जानेवारी २०२१

३. डॉ भालेराव जे के, (सूप्रशासन) एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्यूटर्स, औरंगाबाद

४. प्रा डॉ.संजीव पगारे, ई–बुक एडिशन – जानेवारी २०२२

Publisher -MK INFODUTECH PVT. LTD. PUNE

५. दैनिक पुण्यनगरी, ३ मार्च २०१९, प्रवाह

६. योजना – अंक –२, सप्टेंबर २०१६, मराठी अंक

02 रमाबाई महादेवराव रानडे यांनी सेवासदन द्वारे स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले कार्य : ऐतिहासिक अभ्यास

डॉ नितीन उल्हासराव सराफ,
प्राध्यापक, इतिहास विभाग,
श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी जि अमरावती ४४४७०५.
मोबाईल क्र. ९४२२८८१११५
Email-id : nusaraf88@gmail.com

गोषवारा :

१९ व्या शतकात मुंबई इलाख्यात समाजसुधारणेचे वारे वाहू लागले व महाराष्ट्रात समाजसुधारकांची एक पिढीच जन्माला आली. या काळातील समाजसुधारकांनी अनेक समस्यांवर लक्ष केंद्रित केले, विशेषत: स्त्री शिक्षण. १९ वे शतक हे भारतीय स्त्री जीवनाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण शतक होते. २० व्या शतकामध्ये महिलांची कार्यक्षेत्रे जी विस्तारली त्यात त्यांनी स्वगतिकपणे जे यश संपादन केले, त्याची पायाभरणी त्या शतकाने केली होती. इंग्रजी शिक्षणामुळे इथल्या नवतरुणांना समाज सुधारण्याची, व्यक्ती स्वातंत्र्याची एक नवीन दृष्टी मिळाली, त्यातूनच स्त्री सुधारणांच्या चळवळीला सुरुवात झाली. स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा व्हावी, त्यांची प्रगती व्हावी, त्यांचे हक्क सुरक्षित रहावे, त्यांना न्याय, स्वातंत्र्य आणि पुरुषसमान स्थान मिळावे यासाठी अनेक समाजसुधारकांनी या शतकात कार्य केले, त्यासाठी आपले आयुष्य वेचले त्यापैकीच एक होत्या रमाबाई महादेव रानडे.

भारताच्या अजेंड्यावर महाराष्ट्रीय स्त्रियांचे योगदान प्रादेशिक भूगोल व इतिहास प्रभावित करून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय विकासाला नवी परिमाणे प्रदान करणे इतपत मूल्यात्मक ठरले आहे. स्त्रियांनी शिक्षण घेऊन स्वतःचा उद्धार करून आपल्या मुक्तीसाठी पुढे आले पाहिजे. स्त्रियांनी सुशिक्षित होऊन समाज हिताची व परोपकाराची कार्य हाती घ्यावी, असे प्रतिपादन आद्य भारत महिला परिषदेच्या व्यासपीठावर रमाबाईनी केले. ११ जुलै १९०८ रोजी मुंबई येथे सेवासदनची स्थापना झाली आणि रमाबाईनी संस्था सल्लागार समितीचे अध्यक्षपद स्वीकारले. याच सेवासदनाच्या माध्यमातून रमाबाईनी स्त्रियांच्या समस्या, अडचणी सोडवण्यासाठी, स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य केले. या शोधनिबंधाचा मुख्य विषय हाच आहे रमाबाईनी सेवासदनाद्वारे स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले कार्य.

प्रस्तावना :

रमाबाई रानडे यांची पूर्वाश्रमीचे नाव यमुना माधवराव कुर्लेकर. यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील मोजे देवराष्ट्रे येथे २५ जानेवारी १८६२ रोजी झाला. या काळात मुलींना शिक्षण देणे हे निषेध आणि रूढींविरुद्ध मानले जात होते आणि म्हणूनच आई-वडिलांनी रमाबाईला शिक्षण दिले नाही, त्या निरीक्षर राहिल्या. वयाच्या ११ व्या वर्षी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचेशी त्यांचा विवाह झाला. न्यायमूर्ती रानडे यांच्या पहिल्या पत्नीच्या मृत्यूमुळे व आई-वडिलांच्या आग्रहामुळे त्यांना हा दुसरा विवाह करावा लागला. आपली पत्नी निरक्षर असू नये यासाठी महादेवरावांनी रमाबाईना लिहिणे, वाचणे शिकविले, त्यावेळी महादेवराव हेच रमाबाईचे मुख्य आधारस्तंभ बनले होते. १६ जानेवारी १९०१ रोजी दीर्घ आजाराने न्यायमूर्तींचा मुंबई येथे मृत्यू झाला. त्यानंतर रमाबाईनी मुंबई सोडली व त्या पुण्याला स्थायिक झाल्या. एक वर्ष एकांतवासाचे जीवन त्या जगल्या पण त्यानंतर त्यांनी स्वतःला सावरले आणि आपले पूर्ण आयुष्य स्त्रियांच्या उद्धारासाठी वाहून घेतले. रमाबाईच्या कार्य व कर्तुत्वाला गती मिळाली ती न्यायमूर्तींच्या मृत्यूनंतर. रमाबाईनी उर्वरित आयुष्यात रानडेंच्या विचारास, कार्यास आणि ध्येयास अनुसरून समाजसुधारणेचे कार्य केले आणि त्यांच्या खऱ्या समाजकार्यास प्रारंभ झाला.

१९०२ मध्ये त्यांनी पुण्यातील आपल्या वाड्यात 'हिंदू लेडीज सोशल क्लब' ही संस्था स्थापन केली. तेथे त्या शिक्षणासोबतच स्त्रियांना व्यायसायिक शिक्षण सुद्धा देत होत्या. स्त्रियांमध्ये ज्ञान प्रसार आणि सामाजिक कर्तव्याची जाणीव निर्माण करणे हा या संस्थेचा मूळ उद्देशच होता. या माध्यमातून रमाबाईनी ग्रंथवाचन, शिवणकाम, मराठी व इंग्रजीचे वर्ग चालविणे असे अनेक उपक्रम चालविले. १९०४ मध्ये पुण्यातील येरवडा तुरुंगाच्या 'मानद अधीक्षक' पदावर त्यांची नियुक्ती सरकारने केली होती. याद्वारे कारागृहातील स्त्रियांच्या मनातील निराशा संपविण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम तिथे राबविले. धोंडो केशव कर्वे यांनी रमाबाईची नियुक्ती हिंगणे बुद्रुक येथील बालिकाश्रमाच्या कामावर लक्ष ठेवणाऱ्या स्त्रियांच्या कमिटीच्या अध्यक्षा म्हणून केली. डिसेंबर १९०४ मध्ये 'आद्य भारत महिला परिषदेचे अध्यक्षपद' रमाबाईनी भूषविले. त्यांचे परिषदेचे भाषण म्हणजे रमाबाईच्या भावी समाजकारणाची नांदीच होते. आर्य महिला समाज तसेच लेडी डफफरीन फंड कमिटीशी त्यांचा जवळचा संबंध होता.

सेवासदनच्या सल्लगार समितीच्या अध्यक्षा रमाबाई रानडे :

११ जुलै १९०८ रोजी मुंबई येथे सेवासदन या संस्थेची स्थापना झाली, रमाबाईनी संस्था सल्लागार समितीचे अध्यक्षपद स्वीकारले. या संस्थेसाठी निधी जमवण्यात स्वतः रमाबाईनी पुढाकार घेतला. पती निधनानंतर खचून न जाता त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजासाठी करावयाचे ठरवून सेवासदन संस्थेचे कार्य शेवटपर्यंत केले. सेवासदन या संस्थेचा हेतूच स्त्रीला आधार देऊन तिला स्वावलंबी करण्याचा होता त्यामुळे स्त्री

शिक्षण हे केवळ औपचारिक न राहता ते जीवनोपयोगी होऊ लागले.

अवघ्या एक वर्षात संस्थेने लक्षणीय प्रगती केली आणि काही दिवसातच गिडवाणी आणि मलवारी या सुधारक नेत्यांनी रमाबाई समोर एक नवीन प्रस्ताव मांडला. त्या प्रस्तावानुसारच पुण्यात सेवासदन सुरू करण्याचे नक्की ठरले. २ ऑक्टोबर १९०९ या दिवशी पुण्यात सेवासदनची स्थापना झाली आणि १९१७ मध्ये तिची स्वतंत्र संस्था म्हणून नोंदणी सुद्धा करण्यात आली. अवघ्या एका वर्षातच सेवा सदनच्या कार्याने पुण्यातील सुशिक्षित समाज प्रभावित झाला. पुण्यातील काही प्रतिष्ठित व्यक्ती, किर्लोस्कर नाटक मंडळी, काही बड्या संस्थानांनी सेवा सदनला आर्थिक मदत देणे सुरू केले.

सेवासदनद्वारे ग्रंथालय, वाचनालय, प्रार्थनागृह, शिक्षणवर्ग, विद्यार्थिनी वसतिगृह, मोफत दवाखाना, शिवणकाम वर्ग, इंग्रजी मराठी वर्ग, भरतकाम व यंत्रावर पायमोजे विणण्याचे वर्ग चालविले जाऊ लागले. यामध्ये संस्था सल्लागार समितीच्या अध्यक्ष म्हणून रमाबाईची महत्वाची भूमिका होती.

विद्यार्थींनींना व्यवसायाभिमुख शिक्षण :

समाजातील स्त्रियांचे स्थान बदलण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे, शिक्षणाने तिचा स्वतःचा आर्थिक विकास होतो, स्त्रियांच्या सशक्तीकरणामध्ये शिक्षण ही बाब अत्यंत अत्यावश्यक व जीवनावश्यक आहे. त्यासाठी त्यांनी मुर्लीना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे अशी मागणी केली त्याकरिता त्यांनी चळवळ देखील केली.

१९११ मध्ये सेवासदनतर्फे रुग्णपरिचर्या आणि प्रसूतिशास्त्राचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यांनी स्त्रियांनी नर्सिंगचे शिक्षण घ्यावे यासाठी पुढाकार घेतला. त्या काळात स्त्रियांनी नर्स होणे याकडे चांगल्या दृष्टीने पहिले जात नव्हते असे असले तरी स्त्रियांनी अधिकाधिक या व्यवसायाकडे वळावे यासाठी रमाबाई खूप प्रयत्न करीत होत्या.

स्त्रियांनी नर्सिंगचे शिक्षण घेऊन देशसेवा करावी तसेच व्यवसाय म्हणून या गोष्टीकडे पहावे असे रमाबाईचे मत होते. त्या काळात मात्र नर्सिंगच्या व्यवसायाकडे सेवा-सुश्रुषा या दृष्टीने पाहिले जात नव्हते. त्यामुळे स्त्रियांनी नर्स होणे या गोष्टीला समाजाचा मोठ्या प्रमाणात विरोध होता. रमाबाईनी नर्सिंगच्या शिक्षणाचा व व्यवसायाचा पाया घातला. त्यांच्या ह्या कामगिरीमुळे सेवासदन मधून नर्सिंगचे शिक्षण मिळू लागले. सेवासदनच्या विद्यार्थिनींना नर्सिंगचे शिक्षण मिळावे यासाठी रमाबाईनी ससून हॉस्पिटलचे सिव्हिल सर्जन कर्नल स्मिथ यांची मदत घेतली आणि हळूहळू नर्सिंगचा कोर्स सेवासदनमध्ये सुरू झाला. इ.स. १९११ च्या शेवटी शेवटी सेवासदनच्या पाच विद्यार्थिनी नर्सिंगचे शिक्षण घेत होत्या. पुण्यात १९१७-१८ मध्ये आलेल्या इनफ्लुएंजाच्या साथीच्या वेळी ससून हॉस्पिटलमध्ये तात्पुरते हॉस्पिटल उभे करण्याची वेळ आली, तेव्हा तातडीने रमाबाईनी सेवासदन मधल्या आपल्या नर्स तिथे मदतीसाठी पाठवल्या.

नर्सिंगच्या व्यवसायाकडे समाज आणि स्त्रिया यांचा बघण्याचा दृष्टिकोन चुकीचा होता, अशावेळी समाजातील लोकांचे देखील उद्बोधन केले. मुलींना नर्सिंगच्या शिक्षणासाठी प्रवेश द्यावा याकरिता समाजात ठिकठिकाणी मार्गदर्शन केले. मुलींनी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचनही करावे या हेतूने त्यांनी मुलींसाठी वाचनालय सुरू केले त्यावेळी अनेक समाजसुधारकांनी आपल्या जवळील अनेक पुस्तके या वाचनालयास भेट दिली, त्यातूनच सेवासदनचे वाचनालय, ग्रंथालय सुरू झाले.

शिक्षणाची व्यवस्था तर झाली परंतु मुख्य अडचण येत होती ती राहण्याची. त्यासाठी रमाबाईनी आपल्या वाड्यातच स्त्रियांकरिता वस्तीगृह सुरू केले. या वस्तीगृहात राहणाऱ्या स्त्रियांच्या राहण्याच्या आणि खाण्याचा संपूर्ण खर्च सेवासदनद्वारे करण्यात येऊ लागला या कामाबरोबरच स्त्रियांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि उपयुक्त, उन्नतीकारक अनेक केंद्र सेवासदन मार्फत सुरू करण्यात आले. रमाबाईच्या या कार्याची दखल महात्मा गांधींनी घेतली आणि १३ फेब्रुवारी १९१५ रोजी महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी यांनी पुणे सेवासदनाला भेट दिली होती त्यावेळी महात्मा गांधींनी रमाबाईच्या कार्यावर स्तुती सुमने उधळली.

सेवासदनचा जसा जसा कार्यविस्तार झाला तसा खर्चही वाढत गेला, हा सर्व खर्च कशापद्धतीने करावा ही समस्या सेवासदन व रमाबाईच्या समोर होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी मोठ्या-मोठ्या व्यक्तींनी संस्थेला देणग्या दिल्या, सरकारी ग्रँडसही मिळाल्या. अनेक नवीन प्रयोग त्यासाठी केले गेले.

फॅन्सी फेअरचे आयोजन :

आपण संस्थेत शिकणाऱ्या स्त्रियांच्या मदतीने एखादे फॅन्सी फेअर भरवू. या फॅन्सी फेअर मध्ये स्त्रियांनी तयार केलेल्या कला कौशल्याच्या वस्तू, शिवणकाम, विणकाम, जरीचे काम, रेशमाचे भरतकाम निरनिराळ्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्रीची योजना करावी असे ठरले. संस्थेच्या सर्व सदस्यांना ही योजना आवडली आणि संस्थेतील स्त्रिया यासाठी लगेच तयारीस लागल्या. मुंबई आणि पुणे येथे अशा प्रकारचे फॅन्सी फेअर भरविण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून संस्थेला तब्बल साडेतीन हजार रुपये उत्पन्न मिळाले, तीन दिवसीय फॅन्सी फेअर दणक्यात पार पडले. कला कौशल्याचे शिक्षण घेऊन अर्थार्जण करता येते हा विचार स्त्रियांच्या डोक्यात रुजविण्याचा रमाबाईचा प्रयत्न या फॅन्सी फेअर मुळे साध्य झाला यामुळेच स्त्रियांना स्वावलंबनाची दिशा मिळाली. रमाबाईच्या नेतृत्वाखाली सेवासदन ही सामान्य संस्था राहिली नाही. शाळा, वसतीगृह, नर्सिंग, विविध जीवनोपयोगी कलांचे शिक्षण या माध्यमातून स्त्रियांना स्वावलंबी बनवणारी ती यशस्वी प्रयोगशाळा झाली. रमाबाईनी स्वतःच्या जीवनातील दुःख पचवून आपले दुःख संपूर्ण स्त्री जातीचे दुःख आहे असा व्यापक दृष्टिकोन स्वतःच्या डोळ्यासमोर ठेवला. स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनवले, समाजात त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्त्रियांची प्रगती उन्नती

करायची असेल तर त्यासाठी स्त्रीने शिक्षित होणे गरजेचे आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

आपल्या पतीच्या निधनानंतर खचून न जाता त्यांचे कार्य जोमाने पुढे चालू ठेवणाऱ्या, जन्मभर लोकसेवेचा विचार करणाऱ्या रमाबाईनी आपल्या मृत्यूनंतरही ते कार्य असेच चालू ठेवले. त्यांनी आपल्या मृत्यू पत्राद्वारे आपले राहते घर आणि 'आमच्या आयुष्यातील आठवणी' या पुस्तकाचे सर्व हक्क सेवासदन संस्थेला देऊन टाकले. समाजातील सर्व स्तरांमधून त्यांच्या कार्याची पावती म्हणूनच त्यांचे अनेक सत्कार करण्यात आले. सत्कारांना उत्तर देताना, आपण केवळ आपल्या पतीची सावली बनण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्या विनम्रपणे सांगत. त्यांच्या कार्याची पावती म्हणूनच १५ ऑगस्ट १९६२ रोजी रमाबाईच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांचे छायाचित्र असलेले पोस्टाचे तिकीट पोस्ट खात्याने प्रकाशित केले.

समारोप :

आधुनिक समाजात शिक्षणामुळेच पुरुष-स्त्री असा भेद नष्ट होण्याची अपेक्षा आहे, रानड्यांच्या निधनानंतर रमाबाईनी त्यांच्या उदात्त जीवनाशी समरसता प्राप्त करून घेतली. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' ही जी आत्मकथा लिहिली, ती मराठीतील सुंदर साहित्य म्हणून मान्यता पावली. रमाबाईनी प्रतिनिधनानंतर स्त्रियांच्या सेवेस वाहून घेतले. स्त्रियांना व्यवसाय शिक्षण देणारी संस्था स्थापन केली, पुण्याच्या प्रख्यात 'सेवासदन' या विविध प्रकारच्या स्त्री शिक्षणाचे कार्य करणाऱ्या संस्थेच्या त्या प्रमुख प्रेरणास्थान होत्या. शासकीय पाठ्यपुस्तक समितीवरही चार वेळा त्या होत्या तसेच महिला संमेलनाचे अध्यक्षपदी त्यांनी भूषविले होते. भारतीय स्त्रियांसाठी त्यांनी केलेले कार्य हे महत्त्वपूर्ण मानले जाते.स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा व्हावी, त्यांची प्रगती व्हावी, त्यांचे हक्क सुरक्षित रहावे त्यांना न्याय, स्वातंत्र्य, पुरुष समान स्थान मिळावे या साठी त्यांनी समाजात कार्य केले. त्यांचा आणि सेवासदन चा ऋणानुबंध इतका घट्ट होता की त्यामुळेच दिनांक २६ एप्रिल १९२४ रोजी रमाबाई रानडे यांचे पुणे मुक्कामी सेवा सदनच्याच इमारतीत निधन झाले.

संदर्भ ग्रंथ :

१. रानडे, रमाबाई, आमच्या आयुष्यातील काही आठवणी अथवा स्वतःसंबंधी काही गोष्टी, वरदा प्रकाशन, तिसरी आवृत्ती, २०१२.

२. फाटक, न.र., न्यायमूर्ती म.गो. रानडे, नीलकंठ प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९६६.

३. विद्वांस, प्रा. माधव श्रीनिवास, श्रीमती रमाबाई रानडे-व्यक्ती आणि कार्य, मॅजेस्टिक प्रकाशन, ६ नोव्हेंबर १९८९.

४. खोले, विलास, रमाबाई महादेवराव रानडे – व्यक्तित्व आणि कर्तृत्व,

५. देशपांडे, कृ.प., सौ शुभदा देशपांडे, भारतीय मातृकथा, खंड ४ था, गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, डिसेंबर २०१३.

६. कठारे, डॉ अनिल, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, जून २०१३.

७. रोकडे, डॉ मोहन, भारतातील कर्तबगार महिला, साधना सेवा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०१३.

८. जोशी, तर्कतीर्थ, श्री लक्ष्मण शास्त्री (संपादक), मराठी विश्वकोश, खंड १४, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रथम प्रकाशन १९८९,

03 महिला सबलीकरण आणि प्रशासकीय कायद्यातील तरतूदी एक अभ्यास

डॉ. बालाजी कोंकटवार,
लाल बहादूरशास्त्री महाविद्यालय धर्माबाद.

गोषवारा

प्रस्तुत संशोधनात स्त्रियांच्या विकासासंदर्भात माहिती देण्यात आली असून, देशाचा विकास हा तेथील स्त्रिया हुशार, बुद्धिवान, कौशल्य पूर्ण असतील तर त्या देशाचा विकास होतो तसेच स्त्रियांना देखील प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले तर, त्या देशाचा विकास निश्चितच विकास होतो. असे प्रस्तूत संशोधनात विस्तृत विवेचन केले आहे.

प्रस्तावना :

'जागृती करायची आहे तर प्रथमतः महिलांमध्ये जनजागृती करा एकदा स्त्री जागृत झाली की कुटुंब जागृत होईल, गाव जागृत होईल आणि संपूर्ण देश जागृत होईल. पंडीत जवाहरलाल नेहरू'

देशाचा विकास साधायचा असेल तर कोणत्याही बंधनाशिवाय स्वतःचे निर्णय स्वतः घेऊन पुरूषांच्या बरोबरीने समान वागणूक मिळविण्याच्या दृष्टीने महिला सबलीकरण ही काळाची गरज आहे राज्यघटनेने सर्वांना समानतेचा हक्क दिला आहे त्याचबरोबर स्त्री पुरूष भेदाभेदही असू नये असेही घटनेमध्ये नमूद केलेले आहे असे असूनसुध्दा लिंगाधारित भेदांभेदीची पाळेमुळे अगदी प्राचीन काळापासून दिसून येतात.

महिला सबलीकरण व प्रशासकीय कायद्यातील तरतुदी :

महीला सबलीकरणाच्या बाबतीत प्रशासकिय कायद्यात अनेक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत घटनापीठाने अलिकडील काही वर्षांतमध्ये या संदर्भातील काही कलमांवर विस्तृत विवेचन केले आहे. हे विवेचन विविध कायदे तपासणी मध्ये अत्यंत सकारात्मक आहे. त्याच प्रमाणे उपयुक्तसुध्दा आहे. विशेषतः भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७६, जे बलात्कारासंबंधी आहे, कलम ३७७ जे पुरूषापुरुषांमधील अनैसर्गिक संबंध त्याचप्रमाणे समलिंगी संबंधांबद्दल आहे. त्याचप्रमाणे कलम ४९७ जे व्यभिचारासंबंधी आहे. सद्यपरिस्थितीतील या कलमांची उपयुक्तता यावर ही चर्चा केलेली आहे. कलम ४९७ अंतर्गत एखाद्या पुरुषाने एखाद्या माणसाच्या पत्नी बरोबर त्या माणसाच्या परवानगी शिवाय संबंध ठेवले तर संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला शिक्षा सुनावणी

जाते. लिंगभेदाधारित शिक्षेसाठी ही तरतुद दिसते. परंतु घटनेच्या कलम १४ आणि १५ नुसार हे उल्लंघन आहे. कारण एकतर अशा तरतुदीमध्ये स्त्री ही व्यैयक्तिक संपत्ती समजली जाते, आणि म्हणून जर संमतीने 'संबंध' प्रस्थापित केले असतील तर हा गुन्हा समजला जाणार नाही. आणि दुसरे म्हणजे हा गुन्हा त्या व्यक्तीचा समजला जातो जो पुरूष दुसऱ्याच्या पत्नीशी अनैतिक संबंध ठेवतो. यात ती स्त्री स्वतः बळी असल्याने शिक्षेस पात्र नाही. तिसरा मुद्दा असा की, १८६० मध्ये हा कायदा नंतर काहीही बदल अगर सुधारणा केली गेली नाही. १९७१ मधील ४२ व्या कायदा अहवालाच्या आणि २००३ मधला मालिमठ समितीच्या अहवाल लिंगभेद नाहीसा करण्याविषयी सुधारणा सुचवत असता त्यांच्याकडे डोळेझाक झालेली दिसते. कितीतरी न्यायालयीन निर्णयांत यांची संवैधानिक वैधता मानली गेली मात्र जोसेफ शाइन वि. युनियन ऑफ इंडिया यामध्ये या सुधारणा उजेडात आल्या. यादाव्यात सर्वोच्च न्यायालयात या तरतूदींच्या वैधतेला आव्हान दिले गेले. यामध्ये पीठाने असे निरीक्षण केले की, लिंगाधारित समानतेचा अभाव आहे. ४९७ मधील पतीच्या संमतीमुळे स्त्रीच्या स्वपरिचयाला बाधा येते. मात्र आता स्त्रीही पुरूषाइतकीची सबळ आहे हे समाजाने मान्य करण्याची गरज आहे. आणि कायद्यात नमूद केलेली ही तरतुद अप्रचलित वा पुरातन आहे. कलम ४९७ विवाह संस्थेला यामुळे बाधा आणू देत नाही, त्याच बरोबर जर का त्यातून काही पेच झाला तर आपल्या समाजातील उच्च परंपरा आणि विवाह संस्थांचे पावित्र्य यांना हानी पोहोचेल या दृष्टीने त्यावर पडदा टाकला जाईल. व्यभिचाराचा चमत्कारीपणा असा की १९५५ च्या हिंदू विवाह कायद्यामध्ये विवाह भंग करण्यासाठी पाया तयार करून देतो. कारण तो या कायद्यांतर्गत गुन्हा समजण्यात येतो.तसेच पुढील काही तरतूदी आहेत.

१) तिहेरी तलाक मधील तरतूदी :

सर्वोच्च न्यायालयासमोर चर्चेत असलेला महत्वपूर्ण मुद्दा असा की तत्काळ पध्दतीने दिला जाणारा तिहेरी तलाक. या पध्दतीतील तरतुदी मुस्लिम कायद्यातील तरतुदीचा भाग आहेत का? हा एक महत्वपूर्ण प्रश्न सर्वोच्च न्यायालयासमोर आहे. तलाक पध्दती, शिया मुस्लिम तिहेरी तलाक पध्दती, शिया मुस्लिम समाजामध्ये प्राचीन काळापासून चालत आलेली पध्दती आहे. प्रामुख्याने हनाफी स्कूलमध्ये ही प्रथा विशेषतः चालून आलेली आहे. या पध्दतीमध्ये मुसलमान व्यक्ती एकतर्फी तसेच कायमचा तीन वेळा तलाक, तलाक शब्द उच्चारून आपल्या पत्नीला घटस्फोट देतो. वर्षानुवर्षे या पध्दतीच्या तलाकमुळे मुसलमान महिलांना हानी पोहोचली आहे. या संदर्भात मुस्लिम व्यक्ती टेक्स्ट मेसेज करून, किंवा चेष्टा मस्करीने घेतलेला तलाक दोन्ही म्हणून वैध मानले जात असत तो तलाक प्रमाण मानला जात असे. राशिद अहमद वि. अनिसा खातून ए आय आर १९३२ पीसी २५ या दाव्यामधून एक अट अशी निष्पन्न झाली की, घटस्फोट घेताना ती व्यक्ती प्रौढ असावी. काही वेळा तर पत्नीसमोर शब्दोच्चारण केले नसतानाही आणि ज्याक्षणी पत्नीला या संदर्भात कळेल त्या क्षणापासून तो अंमलात आला असे समजण्यात येईल. उदा. पथाई वि. मोइददीन १९६२ केएलटी ७६३. असे असताना एका महत्वपूर्ण निकालामध्ये हिना आणि इतर वि.

उत्तरप्रदेश सरकार २०१७ आर सी आर सिव्हिल ३१३ यामध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, सबळ कारणाशिवाय तलाक हा शब्दोच्चारण करून त्यापूर्वी कोणतीही तडजोड केलेली नसेल तर हा विधियुक्त 'तलाक' मानला जाणार नाही. अशाच प्रकारचे निरीक्षण भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने शमिम आरा वि. उत्तरप्रदेश सरकार आणि इतर या खटल्यामध्ये असे म्हटले आहे की, तलाकची दखल अशा तऱ्हेने घेण्यात यावी की, त्यातील व्यक्तीवर अन्याय झाल्याची भावना असेल. असे असून सुध्दा तत्काळ तलाकाची दखल घ्यावीच लागेल. कारण मुस्लिम महिलेची तक्रार नसताना सुध्दा मुस्लिम पुरुषाला न्यायालयीन जाब विचारता येतो. हा कायदा मुसलमान महिलांना त्यांच्या हक्काविषयी प्रोत्साहित करण्याकरिता मुसलमान पुरूषांच्या हक्कांला आवडी निवडीला बाधा आणून त्यांच्यामध्ये भेदभाव करतो.

२) संपतीवरच्या हक्कासंबधी तरतूद :

संपत्तीवरचा हक्क आणि स्त्रियांचा स्वतःची संपत्ती असल्याचा हक्क या दोन विषयांवर न्यायालयाची उहापोह चालू आहे. या विषयावर न्यायालयीन घोषणा चालू आहेत. पुरवणी पत्रके येत आहेत, तसेच कायदेशीर कारवाई येत आहेत, तसेच कायदेशीर कारवाई देखील चालू आहे.

३) हिंदू वारसा हक्क कायदा :

हिंदू वारसाहक्क कायद्याच्या १९५६ च्या अधिसुचनेनुसार स्त्रियांना कुटुंबांच्या संपत्तीमध्ये हक्क असल्याचे स्पष्ट केले. हक्क माहेरी तसेच सासरी दोन्ही ठिकाणी असल्याचे स्पष्ट झाले आहे. यापूर्वी असे हक्क मर्यादित स्वरूपात असत. अनुसूचित जातींच्या कायद्यांनुसार त्याचप्रमाणे इतर विविध धार्मिक कायदद्यानुसार एखाद्या स्त्रीने समाजाबाहेरील व्यक्तीशी विवाह केला तर तिच्या स्वतःच्या संपत्तीतून त्याचप्रमाणे वडिलोपार्जित संपत्तीतून तिच्या संपत्तीविषयक हक्कांना बाधा आणता येत होती. छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट १९०८ मध्ये ज्या महिला समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह करतील त्यांचे आईवडिलांच्या संपत्तीतील हक्क संपुष्टात आले असे असे मानले जाईल.

४) पारशी कायदा :

पारसी कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, एखाद्या पारसी महिलेने समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह केला तर तिची धार्मिक ओळख पुसली जाई. त्याचप्रमाणे पारसी पुरुषाने समाजाबाहेरील महिलेशी विवाह केला तर त्यांच्या मुलांना पारसी समाजाचे हक्क मिळतात. परंतु पारसी महिलेने समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह केला तर तिच्या मुलांना पारसी समाजाचे हक्क मिळत नाहीत. एखाद्या पारसी महिलेने समाजाबाहेरील व्यक्तिशी विवाह केला तर तिला स्मशानभूमीत प्रवेशबंदी असते तसेच आईवडिलांच्या अंतिम कार्यालादेखील उपस्थित राहण्यास मज्जाव असतो. 'गुलरूख गुप्ता' या पारसी

महिलेने या प्रथेला गुजरात उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले. या संदर्भात समाजाचा निर्णय माननीय न्यायालयाने योग्य ठरविला. न्यायालयाने इतर सर्व समाजाच्या बाबतीतील प्रथा, परंपरांचा निरीक्षण करत उदा. ख्रिश्चन समुदाय, पारसी समुदाय वगैरे असे मत नोंदवले की महिलेच्या विवाहानंतर तिच्या लग्न झालेल्या नव-याच्या धार्मिक प्रथा परंपराबरोबर तिचे वर्तन असावे. याला पुढे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले जेव्हा एक पारसी ट्रस्ट या वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढीविरोधात न्यायालयात गेली आणि 'टॉवर आफ साइलेन्स' अर्थात मातापित्यांचे अंतिम विधी मध्ये उपस्थित राहण्यास समाजाबाहेर लग्न करून गेलेल्या मुलीस परवानगी मागण्यात आली. या दाव्यामध्ये त्या मुलीची धार्मिक ओळख पूर्णतः पुसून जाते का या प्रश्नावर खल करण्यात आला. यावर न्यायालयाने असे निरीक्षण जाहीर केले की, जर समाजाबाहेर विवाह करणारा कुणी पुरूष त्याची धार्मिक ओळख अबाधित ठेवू शकत असेल तर स्त्री का नाही ? कदाचित या बाबत असे म्हणता येईल की स्त्री विवाहबंधनात अडकताना आपली ओळख गहाण टाकते,ज्यामध्ये धार्मिक ओळखीचाही अंतर्भाव आहे.

५) न्यायालयीन कायद्यात सुधारणा :

भारतात बलात्काराच्या घटना वारंवार समोर यायला लागल्यानंतर माननीय न्यायालयाने कायद्यांमध्ये ब-याच सुधारणा करावयास सुरूवात केली. सन २०१३ च्या अगोदर बलात्काराची व्याख्या कलम ३७५ भारतीय दंड विधानानुसार अत्यंत त्रोटक होती. ज्यामध्ये केवळ लैंगिक संभोगाविषयी मत अंतर्भूत होते. मात्र अत्यंत प्रसिध्द अशी निर्भया बलात्काराचा दावा समोर आला आणि गुन्हे कायदा सुधारणा २०१३ बलात्कारविरोधी विधेयक उदयास आमध्ये आले ज्यामध्ये उपरोक्त संकल्पनेची व्याप्ती वाढवण्यात आली. ज्यामध्ये बळजबरीने बाह्य वस्तूंचा वापर अथवा शरीरात शिरकाव इत्यादींचा समावेश करविला आहे. सन २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या दाव्यातील ६ पैंकी ४ जणांना फ्फाशी सुनावली असून एक गुन्हेगार अल्पवयीन होता त्यामुळे क्रूरतेच्या सा-या मर्यादा पार करूनही त्याची सुटका तीन वर्षांनंतर झाली. अठरा वर्षे पूर्ण होण्याकरिता अवघे तीन महिने बाकी असल्यामुळे त्याची गणती बालगुन्हेगारांमध्ये करण्यात आली होती. या नैतरच्या प्रकरणात, अल्पवयीन मुलांच्या कामकाजासाठी बालसुरक्षा आणि संरक्षण कायदा २०१५ पारित करण्यात आला. या कायद्यानुसार १६ वर्षे किंवा त्यावरील व्यक्तिंनी घृणास्पद कायदे गुन्हा केल्यास - असा गुन्हा जो सात वर्षे वा अधिक शिक्षेसाठी पात्र असतो, अशा व्यक्तीला प्रौढ समजण्यात येऊन शिक्षेस पात्र ठरवण्यात यावे अशी तरतूद केली गेली. कठुआ येथे घडलेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणानंतर गुन्हेगारी दुरूस्ती कायदा २०१८ हा राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेनंतर अध्यादेश काढण्यात आला. ज्यायोगे बलात्कारासारख्या प्रकरणांमध्ये अधिक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे, त्यातही १६ वर्षांखालील मुलींसाठी याची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यात येईल.यामध्ये नोंद घेण्याजोगा भाग म्हणजे बलात्काराची व्याख्या कायद्यामध्ये बदल करूनसुध्दा

विवाहानंतरच्या बलात्कार हा बलात्कार समजण्यात येत नाही. मात्र मुलगी १५ वर्षांखालील असेल तर या विधानास अपवाद ठरतो. याबाबतची भूमिका लक्षात घेता या विरूध्द घेतलेली भूमिका आपाल्या समाजामध्ये विवाहसंस्थेला बाधा समाजामध्ये आणणारी आहे.

'भारतीय घटनेच्या प्रस्तावनेची सुरूवात अशी आहे की, आम्ही भारतीय जनता एकमुखाने ठराव करत आहोत की, आम्ही भारतीय सार्वभौम सामाजिक धर्मनिरपेक्ष लोकशाही जनता आणि धर्मनिरपेक्षता म्हणजे देशातील सर्व धर्मांना समान वागणूक असा होय. समान नागरी कायदा धर्मनिरपेक्षतेच्या आसाच्या केंद्रस्थानी बसविलेला खिळा आहे. अशाच तऱ्हेच्या आचारसंहितेची गरज वैयक्तिक कायद्यामध्ये प्रकर्षाने जाणवते कारण भारतामध्ये महिलांच्या बाबतीत केला जाणारा दुजाभाव. आणि म्हणून लिंगभेदाविरहित प्रवास गाठण्यासाठी आपल्याला बरीच मजल गाठावी लागेल. घटनेच्या कलम १४ मध्ये सर्व नागरिकांना समान कायद्याविषयी बोलते. मग गुन्हेगारी असो वा दिवाणी, सर्वांना सर्व समान कायदे आहेत. मात्र वैयक्तिक यास अपवाद ठरतात. महिला त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी न्यायालयाकडे वारंवार धाव घेतात. हे पाहून कायदेमंडळाला समान नागरी कायद्याबद्दलच्या अंमलबजावणीविषयी विचारणा होते जेणे करून स्त्रीपुरूष वैयक्तिक कायद्यांमध्ये समान पारडयात असतील. घटनेचे ४४ वे कलम अर्थात राज्य धोरण निर्देशक तत्वे, समान नागरी कायद्याचा उल्लेख करतात. 'नागरिकांच्या सुरक्षेसाठी राज्यांनी समान नागरी कायद्याचा संपूर्ण भारतवर्षात पुरस्कार व्हावा याकरिता पराकाष्ठा करावी'. मो. अहमद खान वि. शाहबानो आणि इतर या दाव्यात सर्वोच्च न्यायालय म्हणते की घटनेचे कलम १४ हे मृतपत्रच आहे. या मुद्दयावर कोणताही समाज मांजराच्या गळयात घंटा बांधू इच्छित नाही त्याचप्रमाणे अहेतुक सवलत घेण्यासही तयार नाही. समान नागरी कायदा आणण्याची राज्यांची जबाबदारी असून वैधानिक उत्तरदायित्व त्यांच्याजवळ आहे. मात्र कितीही अडचणी आल्यातरी राज्यघटनेस काही अर्थ असेल तर कुठूनतरी सुरूवात ही व्हावयास हवी. सरला मुद्गल वि. युनियन ऑफ इंडिया १९९५ मध्ये या समान नागरी कायद्याच्या गरजेबद्दल चर्चा घडली. याचे अंमलबजावणी फक्त अडचणीची आहे. खासकरून भारतासारख्या धर्म, जाती यांसारख्या सांस्कृतिक वैविध्याने नटलेल्या देशात हे कठीण भासते. धर्मस्वातंत्र्याला यामुळे बाधा येईल. शिवाय कितीही प्रगतशील असला तरी जनतेच्या रूकाराशिवाय कोणताच निर्णय बळजबरीने लादता येत नाही.

अशा तऱ्हेने भारतामध्ये गेल्या अनेक वर्षापासून बदल घडविण्याची गरज भासत आहे आणि यामध्ये भारताचे सर्वोच्च न्यायालय आपली विधायक भूमिका बजावत आहे. जुनाट कायद्यांना नवा आकार देत आहे. असे असून सुध्दा आपल्याला बरीच मोठी मजल मारावी लागणार आहे आणि ज्यामुळे महिलांना समाजामध्ये समान भूमिका मिळू शकेल.

संदर्भ :

१) महिला सशक्तिकरण और सुरक्षा विषयक चुनौतिया – निशू कुमार

२) महिला सक्षमीकरण और नारीवाद –पी. डी. शर्मा.

३) महिला सक्षक्तीकरण दशा और दिशा – योगेंद्र शर्मा

४) महिला सशक्तिकरण संपूर्ण पहल – कृष्णचंद्र चौधरी

५) कौटुंबिक हिंसाचार आणि महिला – रघुनाथ महाजन

५) योजना – २०१८

६) योजना सप्टेंबर – २०१६.

७) www. Mahila sakshaktikaran.com.

04 भारताच्या विकासात महिला सबलीकरणाचा प्रभाव

प्रा.डॉ. दयानंद उत्तमराव राऊत,
समाजशास्त्र विभाग प्रमुख
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय
खामगाव जिल्हा बुलढाणा
Mo. No. 8788125034 /98605870
E-Mail : dayanandraut45095@gmail.com

भारतात पूर्वी महिलांवर अनेक प्रकारचे निर्बंध होते. जसे की,सामाजिक ,धार्मिक, अध्यात्मिक आणि निर्णय प्रक्रियेत महिलांना सामावून घेतले जात नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र महिलांच्या सक्षमीकरणाला खरी सुरुवात झाली .भारतीय राज्यघटनेने महिलांना अनेक प्रकारचे अधिकार देऊन त्यांना पुरुषाबरोबर समानतेचा अधिकार दिला . यामुळेच महिलांच्या सक्षमीकरणाला स्वातंत्र्योत्तर काळातच सुरुवात झाली, असे म्हणायला काही वावगे ठरणार नाही. असे असले तरीही अजूनही भारतात महिलांचे सबलीकरण काही प्रमाणात झाले नसल्याचे दिसून येते .भारतात महिलाचे सक्षमीकरण करण्यासाठी सर्वप्रथम त्या सर्व राक्षसी विचारांना नष्ट करणे आवश्यक आहे. जे की ,त्यांच्या हक्काचे, मूल्याचे हनन करतात .जसे की, हुंडा पद्धत ,निरक्षरता ,लैंगिक हिंसाचार, असमानता ,भ्रूणहत्या, घरगुती हिंसाचार , वेश्यां व्यवसाय आणि मानवी तस्करी इत्यादी. या सर्व गोष्टी जरी महिला सक्षमीकरणात बाधा ठरत असल्या तरी ,भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकाराचा योग्य उपयोग करून महिला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, तंत्रज्ञान, अंतराळ, सांस्कृतिक, कृषी आणि कौटुंबिक क्षेत्रात ठसा उमटवून भारतातील विकासावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडत असल्याचे दिसून येत आहे.

स्वातंत्र्यानंतर महिलांच्या सक्षमीकरणाला खरी सुरुवात झाली असली तरीही महिलांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, अंतराळ ,सांस्कृतिक, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, कृषी आणि नोकरशाही आदी क्षेत्रात कर्तव्य सिद्ध करून भारताच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका निभावत असल्याचे दिसून येत आहे. हे सर्व महिला कशामुळे करू शकल्या तर ,त्यांना दिले गेलेले स्वातंत्र्य हे होय,मानव समूहात महिलांची संख्या अर्धी आहे. वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची मालकी,पतपुरवठा ,प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत महिलांना कमी संधी मिळते. तरीही मोठ्या प्रमाणात महिलांनी आपले कर्तृत्व पार पाडून सामाजिक ,आर्थिक, आणि राजकीय क्षेत्रात आपले कर्तव्य सिद्ध केले आहे. राजकिय दृष्टीने महिलांच्या संदर्भात विचार केल्यास लोकसभेच्या २०१९ च्या

निवडणुकीत ५६३ जागांपैकी ८२ जागांवर महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. आणि प्रभावीपणे देशाचे नेतृत्व देखिल करीत आहेत. २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या महिलांची संख्या फक्त ६१ होती. तर २००९ मध्ये लोकसभेत निवडून येणाऱ्या महिलांची संख्या ५८ होती यावरून लक्षात येते की, दिवसेंदिवस महिला राजकीय क्षेत्रात भरीव स्वरूपाचे कार्य करीत आहे .गेल्या पन्नास वर्षात सामाजिक क्षेत्रातही महिलांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. व सध्या करीत सुद्धा असल्याचे दिसून येत आहे .जसे की ,डॉ. लक्ष्मी गौतम (उत्तर प्रदेश),मेघा पाटकर(महाराष्ट्र) ,मदर टेरेसा, रिता सिंग, सिंधुताई सपकाळ, सावित्रीबाई फुले इत्यादी . आर्थिक क्षेत्रात सुद्धा महिलांनी आपले कर्तव्य सिद्ध केले आहे. जसे की,लक्ष्मी गौतम,इंद्रा नुयी, लीना नायर ,रोशनी नाडर ,जयश्री उल्हाल, रेवती अडवायथी, अरुणा जयंती ,चंदा कोचर ,शिखा शर्मा ,विनिता गुप्ता ,अशा कितीतरी महिला अर्थिक क्षेत्रात वर्चस्व गाजत असल्याचे दिसून येत आहे. भारताच्या सनदी नोकरशाहीत अनेक आयएएस आणि आयपीएस महिला अधिकारी व्यवस्थित भूमिका पार पाडत असून ,भारताच्या विकासात मोठ्या प्रमाणात योगदान देत आहेत. जसे की, किरण बेदी, अण्णा राजन मल्होत्रा ,स्मिता सबरवाल दुर्गाशक्ती नायपाल ,अरुणा सुंदराजन ,कांचन चौधरी भट्टाचार्य ,सृष्टी देशमुख , संथा नायर, आणि रजनी शिबल इत्यादी.

थोडक्यात म्हणजे, कौटुंबिक, आर्थिक ,राजकीय ,शैक्षणिक, सांस्कृतिक ,शेती, अंतराळात, तंत्रज्ञान आणि नोकरी आदी क्षेत्रात महिला सक्षमपणे काम करीत असून, देशाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देत आहेत.

अध्ययनाचा उद्देश एक :

१) महिला सक्षमीकरणाचे अध्ययन करणे

२) महिला सक्षमीकरणाचा भारतीय विकासावरील प्रभाव अभ्यासने.

महिला सक्षमीकरणाचा भारताच्या विकासावरील प्रभाव अभ्यासण्याच्या पूर्वी महिला सक्षमीकरण म्हणजे काय हे अभ्यासणे गरजेचे आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे काय :

'कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ,शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्राप्त करून देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री पुरुष असमानता नष्ट करणे. या प्रक्रियेला मायला सक्षमीकरण असे म्हणतात'.

महिला सक्षमीकरण आणि सामाजिक क्षेत्रावरील प्रभाव :

स्वातंत्र्यपूर्वक काळात महिलांवर अनेक प्रकारचे सामाजिक निर्बंध होते जसे की ,निर्णय प्रक्रिया, आर्थिक कार्य ,आध्यात्मिक कार्य, अदी प्रक्रियेमध्ये भाग घेऊ दिला जात

नव्हता .त्यामुळे महिलांचे कोणत्याच प्रकारचे सक्षमीकरण झाले नव्हते. महिला फक्त उपभोगाची वस्तू आहे असे मानले जायचे. तिचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' हेच होते.तिला शिक्षणाचा अधिकार नव्हता, पूजा अर्चा,धार्मिक दृष्टिकोनातून महिलांना अपवित्र मानण्यात आले होते. या उलट महिलाच्या सक्षमीकरणाला खरी सुरुवात भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर झाली. सामाजिक बंधने झुगारून मोठ्या संख्येने महिला सार्वजनिक ठिकाणी काम करून सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडत असल्याचे दिसून येत आहे.जसे की,घर सांभाळणे, मुलांचे पालन पोषण, शेतात काम करणे, नोकरी करणे , आणि निर्णय प्रक्रियेत योग्य निर्णय देणे इत्यादी.

महिला सक्षमीकरण आणि आर्थिक क्षेत्रावरील प्रभाव :

भारताच्या एकूण लोकसंख्या पैकी अर्थी संख्या ही महिलांची आहे .जेव्हा जास्त स्त्रिया काम करतात ,तेव्हा त्यांचा थेट परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होत असतो. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, सकारात्मक विकास परिणामाव्यतिरिक्त उत्पादकता वाढवीते.तसेच वैविध्य आणि उत्पन्न समानता वाढविते.सध्या भारतात अंदाजे ४३२ दशलक्ष महिला कार्यरत आहे .त्यापैकी ३४३ दशलक्ष महिला असंघटित क्षेत्रात काम करतात. मेकिंन्से ग्लोबल इन्स्टिट्यूशनच्या अहवालानुसार ,असा अंदाज आहे की ,महिलांना समान संधी देऊन भारत २०२५ पर्यंत आपल्या GDP मध्ये Uss ७७० अब्ज जोडू शकतो .काही महिला उद्योजकांनी अनेक प्रकारचे अडथळे तोडून स्वतःची ओळख प्रस्थापित केल्यामुळे, भारतीय स्टार्टअप दृश्यात लक्षणीय बदल होत आहे .उद्योग क्षेत्रात अनेक महिला आपले वर्चस्व गाजवून भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. अशा महिलांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील रोशनी नाडर, लीना नायर ,जयश्री उल्लाल, रेवती अरुणा,अरुणा जयंती, इत्यादी. या महिलांनी वेगवेगळ्या उद्योगाच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रभाव पडल्याचे दिसून येत आहे.

महिला सक्षमीकरण आणि राजकीय क्षेत्रावरील प्रभाव :–

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महिलांनी राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे सहभाग दर्शवून आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे .जसे की ,माता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, राणी रजिया सुलताना ,राणी चन्नम्मा इत्यादी .तर स्वातंत्र्योत्तर काळात इंदिरा गांधी, सोनिया गांधी, प्रतिभाताई पाटील, ममता बॅनर्जी, मायावती, जयललिता, सुषमा स्वराज ,निर्मला सीतारामन, इत्यादी. महिलांनी राजकीय क्षेत्रात प्रभाविपणे काम करून राजकारणात आपली स्वतःची वेगळी छाप निर्माण केली आहे. महिला सुद्धा एक चांगल्या स्वरूपाचे राजकारण करून भारताच्या राजकीय विकासात महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असल्याचे सिद्ध होत आहे.

महिला सक्षमीकरण आणि शैक्षणिक क्षेत्रावरील प्रभाव :

भारतातील अनेक महिलांनी कौटुंबिक जबाबदारी पार पाडून शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे कामगिरी केली आहे .उच्च शिक्षण घेऊन महिला शिक्षण क्षेत्रात आपली जबाबदारी चोखपणे पार पाडत असल्याचे दिसून येत आहे. वैद्यकीय शिक्षण घेऊन अनेक महिला डॉक्टर म्हणून रुग्णाची सेवा करीत आहेत .अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन अनेक महिला एक प्रभावी अभियंताचे काम करत आहे. त्याचबरोबर कलेक्टर, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, आयपीएस अधिकारी होऊन आपले कर्तव्य पार पाडत आहे. एवढेच नाही तर सीमावर्ती दलात आणि अंतराळात दैदित्यमान प्रगती करून भारताचे शिक्षण क्षेत्र उजाळून टाकत असल्याचे दिसत आहे. पूर्वी महिलांना कोणत्याच प्रकारचे अधिकार नव्हते .परंतु जेव्हा राज्यघटनेने पुरुषासारखेच महिलांना देखील अधिकार बाहाल केले .याचीच संधी घेऊन महिलांनी अनेक प्रकारचे शिक्षण घेऊन भारताच्या शिक्षण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे.

सारांश :–

भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात महिलाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पुरुषाच्या बरोबरीने महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करीत असल्याचे दिसून येत आहे. भारतातील अर्धी लोकसंख्या असलेल्या महिला वेगवेगळ्या क्षेत्रात दैदित्यमान कामगिरी करून, आपल्या नावाचा ठसा उमटवत आहे .भारताच्या तंत्रज्ञान ,क्रीडा ,अंतराळ आणि उत्पादन क्षेत्रात देखील आपला प्रभाव पाडला आहे .पूर्वी समाज व्यवस्थेत महिलांवर अनेक प्रकारचे निर्बंध होते. स्त्रियांना कोणत्याच प्रकारचा अधिकार नव्हता .सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून महिलांना कमी लेखले जात होते .परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मात्र राज्यघटनेने महिलांना पुरुष सारखेच अधिकार दिले. याच संधीचा फ्फायदा घेत अनेक महिलांना वेगवेगळ्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. सीमावर्ती भागात ,खेळायचा मैदानात देखील महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे .त्यामुळेच म्हटले जाते की, भारताच्या विकासात महिलांचे देखील योगदान असल्याचे दिसून येते. म्हणून महिला सक्षमीकरणाचा भारतीय विकासावर प्रभाव असल्याचे दिसून येते.

संदर्भ:–

१) आढाव विकास– महिला सबलीकरण व निरंतर शिक्षण, ज्ञान विस्तार विभाग पुणे.

२) डॉ. पाटील शोभा– स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे ,प्रथम आवृत्ती २००७ .

३) कडू मोहिनी– भारतीय राजकारणातील महिला, विजय प्रकाशन हनुमान गल्ली नागपूर, २०१८ .

४) अन्सारी ला. ए.- महिला और मानवाधिकार ,ज्योती प्रकाशन बरकत नगर जयपुर.

५) गुप्ता कमलेश कुमार- महिला सक्षमीकरण, बुक एन क्लेह जयपुर २००५.

६) कर्वे स्वाती -स्त्री शिक्षणाचे नवे क्षितिज ,प्रतिभा प्रकाशन पुणे .

05 महिला सबलीकरणाचे घटक आणि आर्थिक विकास

प्रा.दीक्षित साहेबराव ज्ञानोबा,
(लोकप्रशासन विभाग प्रमुख)
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदुर
ता आंबेजोगाई, जि. बीड

प्रस्तावना :

भारतीय समाज संरचनेत मध्ययुगीन काळापासून पुरुष सत्ताक पद्धतीने महिलांना सर्वच क्षेत्रात दुय्यम स्थान दिले आहे. स्वातंत्र्यत्तोर काळात राज्यघटनेने स्त्री पुरुष यांना समान व्यक्तिस्वातंत्र्य व अधिकार दिले आहेत. त्यामुळे महिलांना वैवाहिक, कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक घटकांमध्ये स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याचे अधिकार आहेत. तरीही पुरुषप्रधान विचारसरणी महिलांना समाज संरचनेच्या सर्वच क्षेत्रात दुय्यम स्थान देत आहे. महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, स्वातंत्र्यावर बंधने घातली जात आहेत. या बंधनामुळे महिलांचा विकासाला गती मिळाली नाही.

महिला व्यवसायात स्वावलंबी झाल्या तरच त्यांचे आर्थिक उत्पादन वाढेल. त्यांचा आर्थिक दर्जा व स्थिती सुधारेल. त्या आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होतील. महिला व्यवसायाभिमुख झाल्या तर समाज, राष्ट्र यांचा आर्थिक विकास घडून येईल. या दृष्टिकोनातून केंद्र व राज्य शासन स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था महिला सबलीकरण करिता वेगवेगळ्या योजना राबवीत आहेत.

महिला सबलीकरण म्हणजे 'महिलांना विविध क्षेत्रांमध्ये पारंगत करून स्वावलंबी बनविणे होय'. महिलांचे सबलीकरण घडवून आणण्याकरिता शासनाने महिला करिता सर्वच क्षेत्रात आरक्षणाची तरतूद केली आहे. तसेच महिला सबलीकरणावर मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्चाची तरतूद केली जात आहे. तसेच महिला संरक्षण आणि हक्क यासंबंधी कायदे केले जात आहेत. महिला सबलीकरणाचे स्वरूप व उद्देश आणि सुविधाद्वारे आर्थिक विकासाची प्रक्रिया या घटकांचे अध्ययन करण्याकरिता पुढील प्रमाणे संशोधनाची उद्दिष्टे मांडण्यात आली आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) महिला सबलीकरणाचा अर्थ व स्वरूप समजून घेणे.

२) महिला सबलीकरणाच्या घटकांचे अध्ययन करणे.

३) महिलांचा आर्थिक सबलीकरणाची स्थिती अभ्यासणे.

४) महिला सबलीकरणातून आर्थिक विकास अभ्यासणे.

उद्दिष्टांच्या पूर्ततेकरीता खालील प्रमाणे गृहीतकांची मांडणी करण्यात आली.

गृहीतके :

१) महिला सबलीकरणांमध्ये अनेक घटकांचा समावेश आहे.

२) महिला सबलीकरणात अनेक अडथळे आहेत.

३) महिला सबलीकरणातून आर्थिक विकास घडवून येत आहे.

उपरोक्त गृहीतकांच्या पडताळणी करिता खालील प्रमाणे संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनाच्या सत्य संकलनाकरिता द्वितीय स्त्रोता मधील प्रकाशित व अप्रकाशित स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे. प्रकाशित स्रोतांमध्ये संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, शासनाचे अहवाल इत्यादीचा वापर करण्यात आला. तर अप्रकाशित स्त्रोतांमध्ये एम.फिल., पीएच.डी.चे प्रबंध, खाजगी संस्थाचे अहवाल, इंटरनेट यांचा अवलंब करण्यात आला. सदरील शोधनिबंधाच्या मांडणी करिता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे.

विषय प्रतिपादन :

समाज संरचनेचे घटक आणि राष्ट्रीय विकास या प्रक्रियेमध्ये महिला आणि पुरुष यांचा समान सहभाग असेल तरच विकासाला गती मिळते. परंतु पुरुष सत्ताक पद्धतीने महिलांना दुय्यम स्थान दिले आहे. त्यामुळे राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत अपेक्षाप्रमाणे महिलांचा सहभाग दिसून येत नाही. विकास प्रक्रियेत महिलांचा सहभाग अल्प असल्यामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाची गती मंद स्वरूपात आहे. महिलांचा सर्वांगीण विकास घडवून यावा, राष्ट्रीय विकासामध्ये महिलांचा सहभाग वाढावा याकरिता समाज सुधारक, लोकप्रतिनिधी, शासन, स्वयंसेवी व सेवाभावी संस्था, महिला सबलीकरनारिता वेगवेगळ्या योजना व उपक्रम राबवित आहेत. ह्या योजना व उपक्रम पुढील प्रमाणे नमूद करता येतात.

अ) महिला सबलीकरणाचे घटक

१) महिला सबलीकरणाचे कायदे :

महिलांच्या हक्काचे संरक्षण आणि महिलांना अधिकार देण्याकरिता हिंदू विवाह कायदा, संमती विवाह कायदा, वारसा हक्क कायदा, घटस्फोट कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, पोटगीचा कायदा, गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसा प्रतिबंधक कायदा इत्यादीची स्थापना केली आहे. या कायद्यामुळे महिलांना व्यक्ती स्वातंत्र्य व कौटुंबिक, वैवाहिक, आर्थिक स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत आहे.

२) महिला आर्थिक विकासाच्या योजना :

कामधेनु योजना, महिला सक्षमीकरण योजना, जिजामाता महिला आधार विमा योजना, महिला व्यावसायिक प्रशिक्षण योजना, विधवा व निराश्री महिला अर्थसहाय्य योजना, बचत गट अनुदान योजना इत्यादी योजना द्वारे महिलांना आर्थिक सहाय्यता केली जात आहे. या योजनामुळे महिला वेगवेगळ्या व्यवसायाची स्थापना करून स्वतःचे आर्थिक उत्पन्न निर्माण करीत आहेत.

३) महिला आर्थिक सबलीकरणाचे उपक्रम :

महिलांचा आर्थिक विकास घडवून यावा याकरिता शासन आणि स्वयंसेवी संस्था सेवाभावी संस्था यांच्याद्वारे राबविले जात असलेल्या उपक्रमात व्यावसायिक प्रशिक्षण तांत्रिक उपक्रम उपकरणे खरेदी विक्री व दुरुस्ती उपक्रम बचत गटाद्वारे सहभागी व्यवसाय कुठे उद्योग शेती जोड व्यवसाय व्यापार इत्यादी उपक्रम राबविले जात आहेत या उपक्रमाचा लाभ घेऊन महिलांनी स्वतःचे उद्योग व्यवसाय स्थापन केले आहेत या उद्योग व्यवसायातून त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे.

४) शासकीय व निमशासकीय क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये आरक्षण :

शासनाने महिलांचे आर्थिक सबलीकरण घडून यावे या दृष्टीने शासकीय व निमशासकीय क्षेत्रातील नोकरीमध्ये ३३% आरक्षणाची तरतूद केली आहे. या आरक्षणामुळे शिक्षित महिलांना हक्काची नोकरी मिळत आहे. नोकरी करणाऱ्या महिलांना पगार मिळत असल्यामुळे त्या आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होत आहेत. त्यांचा अर्थ संस्थांशी संपर्क वाढत आहे. नोकरी करणाऱ्या महिलांच्या कौटुंबिक सामाजिक आर्थिक दर्जा उंचावत आहे.

५) महिलांना आर्थिक सवलत :

महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्याकरिता शासन महिलांना शैक्षणिक फीस मध्ये सवलत देत आहे. एस.टी. प्रवास तिकिटामध्ये सवलत दिली आहे. शासकीय रुग्णालयात मोफत सुविधा दिली जात आहे. मुलींना वेगवेगळ्या योजनाद्वारे आर्थिक मदत केली जात आहे. महिलांना लघु उद्योग, कुटीर उद्योग, व्यापार या करिता कमी दरात कर्जपुरवठा केला जात आहे. या आर्थिक सवलतीमुळे महिलांचा आर्थिक दर्जा उंचावत आहे.

६) महिलांना अल्प दरात अर्थसाह्य :

महिलांचे आर्थिक सबलीकरण घडून यावे, महिलांनी लघुउद्योग, कुटीर उद्योग, व्यापार करावा याकरिता शासन अल्प दरात व्यवसायाकरिता कर्ज देत आहे. तसेच विविध मंडळे. संस्था ही महिलांना उद्योग व्यवसायाकरिता अल्प दरात कर्ज पुरवठा करीत आहेत. या आर्थिक सहाय्यतेमुळे महिला मेस, व्यापार, दुकानदारी, कुटीर उद्योग करीत आहेत. व्यावसायिक महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढल्यामुळे त्या आर्थिक दृष्टीने स्वावलंबी बनल्या आहेत.

७) महिलांना मोफत व्यावसायिक प्रशिक्षण :

महिलांना उद्योग, व्यवसाय करून आर्थिक दृष्टीने स्वावलंबी बनावे याकरिता शासन व्यवसायाचे मोफ्फत प्रशिक्षण देत आहे. यामध्ये मच्छी पालन. कुक्कुट पालन, रेशीम उद्योग, पार्लर, व्यापार, दुकानदारी, मेस, व्यवसाय, अगरबत्ती व्यवसाय, मसाले व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, शेती आंतरपीक, पशुपालन, फुल उद्योग, टेलरिंग, नक्षीकाम इत्यादी मोफ्फत व्यावसायिक प्रशिक्षणामुळे महिलांनी लघुउद्योग सुरू केले आहेत. त्यांना रोजगाराची उपलब्धता झाली आहे. त्या कुटुंबाचा मुलांचा आणि स्वतःचा खर्च स्वतः भागवीत आहेत.

८) महिलांना रोजगार पुरवठा :

शासन महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्याकरिता महिलांना रोजगार उपलब्ध करून देत आहे. यामध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत शासकीय कामांमध्ये ५० टक्के काम महिलांना दिले जात आहे. गरजू महिलांना काम आणि दाम योजने अंतर्गत महिलांना रुग्णालय, शासकीय आश्रम, बालसुधारग्रह, निराधार ग्रह, अंगणवाडी यामध्ये स्वयंपाक करणे, जेवणाचे डबे पुरविणे ही कामे दिली जात आहेत. राशन दुकान, आरोग्य सुविधा यामध्ये महिलांना कामे दिली जात आहेत. या रोजगार पुरवठ्यामुळे महिलांना रोजगाराची उपलब्धता होऊन त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. त्यांना कुटुंब समाज आणि अर्थसंस्था सन्मानाची वागणूक देत आहेत. शासन स्वयंसेवी व सेवाभावी संस्था यांच्याद्वारे महिलांचे आर्थिक सबलीकरण घडून येत आहे. महिला आर्थिक सबलीकरणामुळे त्या आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होत आहेत. त्या स्वतः आर्थिक खर्च व आर्थिक गुंतवणुकीचे निर्णय घेत आहेत. महिला आर्थिक सबलीकरणामुळे महिला समाज आणि राष्ट्र यांचा आर्थिक विकास घडवून येत आहे.

ब) महिला सबलीकरणाद्वारे आर्थिक क्रिया

१) पतसंस्था मध्ये आर्थिक गुंतवणूक :

महिलांचे आर्थिक सबलीकरण होत असल्यामुळे त्यांचे आर्थिक उत्पादन वाढत

आहे. त्या आपले आर्थिक उत्पादन, बँक खाते, भविष्य नियोजन निधी, संचिती, जीवन विमा, बँकेत ठेव इत्यादी मध्ये गुंतवित आहेत. महिलांनी केलेले आर्थिक गुंतवणूक ही शासनाला आर्थिक विकास योजना करिता वापरता येत आहे.

२) नवनवीन उद्योगाची निर्मिती :

महिलांचे आर्थिक सबलीकरण घडून आल्यामुळे त्या नवनवीन उद्योगांची निर्मिती करीत आहेत. त्यामध्ये भाजीपाला खरेदी-विक्री, मेस व्यवसाय, पार्लर, खाद्यपदार्थ दुकान, कापड दुकान, व्यापार, यांत्रिक वस्तू दुरुस्ती, मसाले विक्री इत्यादी या नवनवीन उद्योग निर्मितीमुळे हुशार, कुशल महिलांना रोजगाराची उपलब्धता होत आहे. यातून आर्थिक विकासाला गती मिळत आहे.

३) उद्योग व्यवसायाला चालना :

महिला आर्थिक सबलीकरणामुळे शेतीला जोड व्यवसाय पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मच्छी पालन, रेशीम उद्योगांना गती मिळत आहे. या उद्योगातून रोजगाराची उपलब्धता होत आहे. तसेच उद्योगांमध्ये हातकाम, नक्षीकाम, विणकाम, वाद्य दुरुस्ती, भरतकाम, पारंपारिक व्यवसाय इत्यादीचा विकास घडवून येत आहे. या उद्योगातून आर्थिक उत्पादनाची निर्मिती होत आहे.

४) सामाजिक विकासाला गती :

महिलांचे आर्थिक सबलीकरण घडून येत असल्यामुळे त्यांचे राहणीमान उंचावले आहे. त्यांचा सामाजिक सहभाग वाढला आहे. त्यांना समाजात सन्मान मिळत आहे. समाजात महिला पुरुष यांचा समान दर्जा निर्माण होत आहे. सामाजिक आचार-विचार यामध्ये परिवर्तन घडवून येत आहे. महिला सामाजिक विकास प्रक्रियेत स्वतः सहभागी होऊन अन्याय, अत्याचाराच्या विरुद्ध लढा देत आहेत. त्यामुळे समाजात शांतता प्रस्थापित होऊन कायद्याचे नियम रुजले जात आहेत. या सामाजिक विकासातून राष्ट्रीय प्रगती घडून येत आहे.

५) राष्ट्रीय विकासाला गती

महिला सबलीकरणाद्वारे महिलांचा आर्थिक विकास घडून येत नाही. तर त्यांचे कुटुंब, समाज, समुदाय यांचाही विकास घडवून येत आहे. महिला आर्थिक सबलीकरणामुळे विविध घटकात विकास घडवून आल्यामुळे राष्ट्राचा सामाजिक. राजकीय. आर्थिक घटकातही विकास घडून येत आहे. राष्ट्राचा विविध घटकात विकास घडून आल्यामुळे राष्ट्रीय विकासाला गती प्राप्त होत आहे.

अध्ययनाचे महत्त्व :

सदरील अध्ययन महिला आर्थिक सबलीकरणाची संबंधित असून या ध्यानाद्वारे

महिला आर्थिक सबलीकरणाचे घटक त्यांचे स्वरूप आणि उद्दिष्टे स्पष्ट होतात. तसेच महिला आर्थिक सबलीकरणाचा दृष्टिकोन दिशा आणि स्थिती स्पष्ट होते. महिलांच्या आर्थिक सबलीकरणाची गती समजण्यास सहाय्यभूत ठरते.

निष्कर्ष :

१) महिला आर्थिक सबलीकरणावर शासन स्वयंसेवी संस्था सेवाभावी संस्थांनी भर दिला आहे.

२) महिला आर्थिक सबलीकरणाच्या योजना, कायदे आणि आर्थिक तरतूद प्रभावी राबविली जात आहे.

३) महिला आर्थिक सबलीकरणातून नवनवीन उद्योग, व्यवसायाची निर्मिती होत आहे.

४) महिला आर्थिक सबलीकरणामुळे महिलांची वित्तीय संस्थात आर्थिक गुंतवणूक वाढली आहे.

५) महिला आर्थिक सबलीकरणामुळे राष्ट्रीय विकासाला गती मिळत आहे.

सारांश :

महिलांच्या सशक्तिकरणात आर्थिक स्वावलंबन हा घटक महत्त्वाचा आहे. महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्याकरिता शासन स्वयंसेवी व सेवाभावी संस्था यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. महिला सबलीकरणातून समाज, समुदाय आणि राष्ट्र यांच्या विकासाला गती प्राप्त झाली आहे सत्य स्वीकारणे अपरिहार्य आहे.

संदर्भसूची :

१) गंदेवार एस. एस. 'समाजशास्त्रीय संशोधन पद्धती' अरुणा प्रकाशन, लातूर २००२

२) ठाकूर सुंदरसिंह गुलाबसिंह 'समाजशास्त्र' निर्मल प्रकाशन, नांदेड २००६

३) योजना मासिक, डिसेंबर २०१५

४) लोकराज्य मासिक, नोव्हेंबर २०१६

५) दैनिक लोकमत दिनांक १३/०९/ २०१७

६) सुनिता बोर्डे/संतोष खडसे, 'ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया' शुभम प्रकाशन, नागपूर २००२

७) https//mr.wikipedia.

८) https//www.artofliving.org.project

06 सावित्रीबाई फुले यांची कविता आणि महिला सक्षमीकरण

डॉ. विष्णू नामदेव लांडे ,
मराठी विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, वाशीम जि. वाशीम
Mob.-9822319415
Email- vishnulande1@gmail.com

सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या सामाजिक कार्याला पावलोपावली व तितक्याच तोलामोलाची साथ दिली. तत्कालीन काळातील स्त्रिया व शूद्र यांची अवस्था पशूपेक्षाही वाईट होती. या काळातील स्त्रियांना अतिशय दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात असे. स्त्रियांचे जीवन फक्त चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित होते. अशा बंदिस्त चौकटीतील स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी सावित्रीबाई फुले यांनी पुरेपूर प्रयत्न केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडण्यास, शिक्षण घेण्यास मज्जाव होता, अशा काळात महात्मा फुले यांनी पुण्यातील भिडे वाड्यात १८४८ रोजी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या शाळेमध्ये स्त्रियांना प्रत्यक्ष शिकविण्याचे काम सावित्रीबाई यांनी पार पाडले. हे कार्य करीत असताना त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला, परंतु त्यांनी या संकटांची पर्वा मात्र कधीच केली नाही. स्त्री व शूद्रांनी मनुष्य म्हणून स्वाभिमानाने जीवन जगावे, यासाठी त्यांनी सदोदित प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा काढली. बालहत्या प्रतिबंधक गृह चालविले. कामगारांसाठी रात्रशाळा चालविली. गरीबांसाठी अन्नछत्रे सुरू केली. समाजातील अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. आपल्या दत्तक मुलाचा आंतरजातीय विवाह घडवून आणला. सोबतच उच्चवर्णियांच्या वर्चस्ववादी मानसिकतेला वेळीवेळी कडाडून विरोध केला. सावित्रीबाई फुले यांनी ज्याप्रकारे सामाजिक कार्य केले, त्याचप्रमाणे त्यांनी काव्यफुले', बावनकशी सुबोध रत्नाकर' यासारख्या काव्यग्रंथांचीही निर्मितीही केली. त्यांच्या एकूणच कवितेतून स्त्री-शूद्र यांनी सक्षम व्हावे, यासाठी त्यांनी पुरेपूर प्रयत्न केले आहेत, त्याबाबतचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येईल.

सावित्रीबाई फुले यांनी त्यांच्या ब्रह्मवंत शेती' या कवितेतून समाजाची विषम रचना करणाऱ्या धर्मग्रंथावर, स्मृती ग्रंथावर टीका केली. या कवितेत त्यांनी शेतीला ब्रह्म आणि आणि अन्नाला परब्रह्म मानले. तर दुसरीकडे मात्र या शेतकऱ्यांच्या बळावर पंचपक्वान्न झोडणाऱ्या अंहकारी, वर्चस्ववादी व्यवस्थेचा खरपुसून समाचार घेतला आहे. जे शेतकरी

विद्या घेऊन शेती करतात, त्यांनाच ही ज्ञानवंत शेती सुखी करीत असल्याचा युक्तिवाद त्यांनी व्यक्त केला आहे. 'मनू म्हणे' या कवितेतून त्यांनी उच्च वर्णियांच्या दुटप्पी प्रवृत्तीवर प्रहार केलेला दिसून येतो. बाळास उपदेश या कवितेतून त्यांनी कोणतेही काम करण्यास दिरंगाई करू नये, आळस करू नये, ते काम वेळच्या वेळीच पूर्ण करावे अशी स्पष्ट शिकवण दिली आहे. त्यामुळेच या कवितेतून

करणे काम आजी ते। आताच कर खेचुन।

जे दुपारी करायचे । ते आताच कर जाऊन ।(पृ. ७३)

अशाप्रकारे काम करण्याविषयीची तत्परता त्यांनी दर्शविली आहे. कोणतेही कार्य करण्यास पुढचा क्षण निवडण्याऐवजी, आहे त्याच क्षणाची निवड करून त्यास प्राधान्य द्यावे असेही त्यांना वाटते.

शूद्रांचे दु:खणे' या कवितेतून त्यांनी शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले आहे. या कवितेतून

शूद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षणाचा मार्ग हा ।

शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हटते पहा ।।(पृ. ६९)

अशी साध्या सोप्या भाषेत शिक्षणाची महत्ती त्यांनी सांगितली आहे. शिक्षणामुळे माणसामध्ये मनुष्यत्व निर्माण होते, तर शिक्षणामुळेच माणसातील पशुत्वही हटविता येत असल्याची स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली आहे.

श्रेष्ठ धन' या कवितेतून त्यांनी विद्या हेच श्रेष्ठ धन मानले आहे. मानसाच्या जीवनात इतर धनांपेक्षा फक्त विद्या हेच धन त्यांना सर्वश्रेष्ठ वाटते, याविषयी त्यांनी

विद्या हे धन आहे रे । श्रेष्ठ साऱ्या धनाहून ।

तिचा साठा जयापरी। ज्ञानी तो मानती जन।। (पृ.७२)

अशी स्पष्ट भूमिका त्यांनी आपल्या कवितेतून घेतलेली दिसून येते. यावरून शिक्षणाविषयी सावित्रीबाईना कसी ओढ होती, त्याचा प्रत्यय येताना दिसून येतो.

अंधश्रध्दा, बुवाबाजी, जादू-टोणा यासारख्या थोतांडाचा त्यांनी स्पष्टपणे विरोध केलेला दिसून येतो. स्त्री वर्ग यासारख्या गोष्टींना मोठ्याप्रमाणात महत्व देत असतो. परंतु सावित्रीबाई फुले यांनी मात्र त्यास स्पष्टपणे विरोध केलेला दिसून येतो. नवस' या कवितेतून

धोंडे मुले देती। नवसापावती ।

लग्न का करिती।नारी-नर (पृ. ७४)

असा रोकठोक सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. हिंदू धर्मातील देव-देवतांवरही अशा परखड शब्दांत त्यांनी हल्ला केलेला दिसून येतो. दगडाला शेंदूर फासून

त्याचा देव तयार केला जातो, म्हसोबा–खेसोबा यासारख्या भयंकर देवावर भाव ठेवला जातो, नवस करून बकऱ्यासारख्या प्राणीमात्राचा जीव घेतला जातो यासारख्या कितीतरी अघोरी व खुळचट कल्पनांना त्यांनी कडाडून विरोध केला आहे. एकप्रकारे त्यांनी यातून विवेकवादी व विज्ञानवादी अशी विचारधारा समाज मनात रूजविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

शूद्र या शब्दाचा अर्थ' सांगतांना त्यांनी या शब्दासाठी नेटिव्ह' हा इंग्रजी पर्यायी शब्द योजिलेला आहे. म्हणजेच या देशातील शूद्र हे मूळचे नागरिक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशातील हे मूळ नागरिक हेच खरे भारतीय व पराक्रमी असल्याचे त्यांना वाटते. पुढेचालून या पराक्रमी लोकांचेच वंशज हे शूद्र म्हणून संबोधल्या गेल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बळीचे स्तोत्र' या कवितेतून त्यांनी बळीराजाची थोरवी अधोरेखित केली आहे. बळी या राजाच्या राज्यातील सर्व प्रजा ही सुखी, समाधानी, आनंदी असल्यानेच, अशा राजाचे स्तोत्र हे सामान्य जण हे गात असल्याचे त्यांना वाटते. या कवितेतून स्त्री– शूद्रांनी आपल्या दास्यातून मुक्त व्हावे अशी प्रेरणा त्यांनी देण्याचा प्रयत्न केला आहे.

इंग्रजी शिका' या कवितेतून त्यांनी शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले आहे. इंग्रजानी शिक्षण हे सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न केला. यापूर्वी भारत देशात शिक्षण हे फक्त उच्चवर्णियांपुरतेच मर्यादित होते, इतरांना मात्र शिक्षण हे घेता येत नव्हते. परंतु इंग्रजांनी मात्र उच्चवर्णियांनाच नव्हे तर, शिक्षणाची दारे सर्वासाठी खुली केली. त्यांनी शिक्षण हे सार्वत्रिक केल्याने, त्यांच्याविषयी आदरभाव सावित्रीबाईच्या कवितेतून व्यक्त होताना दिसतो. शिक्षणामुळे माणसांत स्वावलंबन रूजते, मनुष्य उद्योग प्रपंच करावयास लागतो. विद्या नसल्यामुळे इतर प्राण्यांची प्रगती होऊ शकली नाही. आपल्या देशातही शिक्षण हे सार्वत्रिक स्वरूपाचे दिले न गेल्याने, आपली प्रगती झाली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शिक्षणामुळे स्त्री, शूद्र नव्हे तर सर्व मानवांच्या दु:खाचे निराकरण करता येते, यावर त्यांचा विश्वास होता. इंग्रजांनी शिक्षणाची संधी सर्वांना प्राप्त करून दिल्याने, त्या संधीचे सर्वच भारतीयांनी सोने करावे असे त्यांना वाटत असे.त्यामुळेच

इंग्रजी शिकूनि। जातीभेद मोडा।

भटजी भारूडा। फेकुनिया।। (पृ. ७५)

अशी स्पष्ट भूमिका त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. इंग्रजांनी माणसाला माणूसकी प्राप्त करून दिली. त्यामुळेच सावित्रीबाई आपल्या कवितेतून इंग्रजी शिका असा आग्रह धरताना दिसतात. इंग्रज व्यवस्थेने शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने, त्याचे वर्णन त्यांनी 'इंग्रजी माऊली' असे केले आहे.या कवितेतून–

इंग्रजी माऊली । तोडते पशुत्व।

देई मनुष्यत्व । शुद्र लोका।। (पृ.७३)

शिक्षणामुळे माणसाच्या वाट्याला येणारी हीनतेची वागणूक कमी होत असल्याचा विश्वास त्यांनी दर्शविला आहे. शिकणेसाठी जागे व्हा' या कवितेतून शूद्रातिशूद्रांनी परंपरेची गुलामगिरी तोडण्यासाठी जागे व्हावे असे त्यांना वाटते. एकीकडे मनुस्मृतीसारख्या ग्रंथांनी शूद्रांना शिक्षण घेण्यास मज्जाव केलेला होता, तर दुसरीकडे इंग्रजांनी मात्र शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुले केले. अशा स्थितीत सर्वांनी शिक्षण घेऊन आपला उत्कर्ष करावा असे त्यांना मनोमन वाटते. अशी संधी हजारो वर्षे भारतीयांना प्राप्त झाली नसल्याने, त्या संधीचे सोने करावे असेही त्यांना वाटते.

मुलाबाळांना आपण शिकवू। आपण सुध्दा शिकू ।

विद्या घेऊनी ज्ञान वाढवून। नीतिधर्म ही शिकू। (पृ. ७६)

असा संदेश त्यांनी दिला आहे. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांसाठी मौलिक असे कार्य केल्याने त्यांच्याविषयी निर्मलकुमार फडकुले यांनी 'महाराष्ट्राच्या स्त्री जीवनाला आकार देणारी एक रचनात्मक शक्ती' (पृ.३२) अशा शब्दांत त्यांच्या कार्याची महत्ती अधोरेखित केला आहे.

भारत देशात वर्षानुवर्षे स्त्री-शूद्रांचा शिक्षणाचा अधिकार नाकारल्यामुळे, ते परावलंबी झाले असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्यामुळेच त्यांनी 'शूद्राचे परावलंबन' या कवितेतून

ज्ञानाचे नसती डोळे। म्हणोनि न दिसे दुःख।

स्वावलंबी नसे शूद्र। स्विकारती पशू सुख । (पृ. ७७)

ज्ञान नसल्यामुळेच स्त्री-शूद्रादिकांच्या जीवनात दुःख आल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अज्ञानामुळे मानसाच्या जीवनात परावलंबन आल्याने, अशा माणसाला सुखाची हाव निर्माण होत नाही. जीवनातील दुःखालासुध्दा ते आपले सुखच मानायला लागतात. अज्ञानामुळेच त्यांच्यात स्वाभिमान आला नाही, त्यामुळेच असे लोक पशूसारखे अपमानास्पद जीवन जगताना दिसून येतात. या कवितेतून त्यांनी स्त्री-शूद्रांनी आपली जैसे थे ही प्रवृत्ती झटकून देण्याचे आवाहन केले आहे.

पाच मुर्लीचे पाच गट' या सामुहिक संवाद पद्यातूनही त्यांनी शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. या पाच गटापैकी पहिल्या गटातील पाच मुर्लीना आपण शाळेत जाऊन ज्ञान अर्जित करावे असे वाटते. परंतु दुसऱ्या गटातील मुली मात्र त्यास विरोध करून, शाळेत नुसती कटकट असल्याने, एकमेकींना फुगडी खेळण्याची साद घालतात. तर अन्य गटातील मुर्लीना मात्र आपण शाळेत न जाता घरी परत जाऊन आपल्या आईला घरकामात मदत करावी असे वाटते. यापैकी एक गट शाळा, फुगडी की घरकाम या पेचातून सुटका करण्यासाठी घरी जाऊन आईचा सल्ला घेण्याचे ठरवितात. अशावेळी त्यांची

आई मात्र

अभिमानाने जगण्यासाठी शिकून घ्या जा शाळेला ।
मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे घ्या चला।
जा शाळेला जा शाळेला ।(पृ.८२)

असे म्हणताना दिसते. माणसाने प्रथमता शिक्षण घेण्याचे काम करावे, त्यानंतर खेळावे व त्यानंतर आई-वडीलांच्या घरकामास मदत करावी असे त्यांना वाटते. यावरून सावित्रीबाईच्या कवितेतून शिक्षणाविषयीची तळमळ अधोरेखित होताना दिसते. 'सगळ्या मिळून' या कवितेतूनही त्यांनी अशाचप्रकारची शिक्षणाची महत्ती अधोरेखित केली आहे. शिक्षणासाठी कुठल्याही प्रकारची कुरकूर, आळस करू नये. अज्ञान, दारिद्य व गुलामगिरीची बेडी तोडण्यासाठी प्रत्येकाने शिक्षण घ्यावे असे त्यांना वाटते. 'अज्ञान' हा आपला एकच शत्रू असल्याने, त्याला पळवून लावणे हेच आपले कर्तव्य असल्याचे त्यांना वाटते. याविषयी

एकच शत्रू असे आपला । काढू पिटुन मिळुनी तयाला। (पृ.८४)

असेही सावित्रीबाई फुले म्हणताना दिसून येतात. माणसाचा अज्ञान हा एकमेव शत्रू आहे, त्याच्याशिवाय दुसरा शत्रूच नसल्याचे त्यांना वाटते. अज्ञानामुळेच माणसांची अधोगती झाली. पराभवही अज्ञानामुळेच पचवावा लागला असल्याचे सावित्रीबाई कवितेतून स्पष्ट करतात.

ज्योतिबा' या कवितेतून महात्मा फुले यांच्या कार्यकतृत्वावर प्रकाश टाकला आहे. त्यांनी स्त्री-शूद्रांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी कसे प्रयत्न केले, त्याबाबतचा उहापोह केला आहे. सिद्धता' या कवितेतून त्यांनी स्त्री-शूद्रांच्या गुलामगिरीवर प्रकाश टाकला आहे. स्त्री-शूद्रांचे दास्य नष्ट करून त्यांच्यात समता, बंधुभाव, ऐक्य निर्माण करण्यासाठी सावित्रीबाईनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. माझी जन्मभूमी' या कवितेतून त्यांनी आपल्या माहेराचे वर्णन केलेले दिसून येते.

पेशवाई' या कवितेतून तत्कालीन काळातील स्त्री-शूद्रांची शोचनिय स्थिती अधोरेखित केली आहे. तत्कालीन काळात स्त्री व शूद्रांचा अतोनात छळ होत होता. वर्चस्ववादी व्यवस्थेने त्यांना सतत पशूवत वागणूक दिली. त्यामुळे त्यांनी गुलामी वृत्तीचा निषेद नोंदविण्याचे काम प्रस्तुत कवितेतून केलेले दिसून येते.

आंग्लाई' या कवितेतून इंग्रज राजवटीचे वर्णन करण्यात आले आहे. इंग्रजांच्या राजवटीत स्त्री-शूद्रांना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. इंग्रजानी तत्कालीन व्यवस्थेतील दरोडेखोरी, खुन करण्याची प्रवृत्ती, चौर्य काम करण्यास बंदी घातली. एवढेच नव्हे तर अशा अपप्रवृत्तीकडे वळणाऱ्या लोकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले, असल्याचे दिसून येते.

तेच संत' या कवितेमधून त्यांनी संत कोणाला म्हणावे याबाबतची लक्षणे सांगितली आहेत. याबाबत –

सुख दुःख काही । स्वार्थपणा नाही।

परहित पाही। तोचि थोर । (पृ. ६०)

अशा उदात्त, निस्वार्थी, परहिताची तळमळ असणाऱ्या व्यक्तींनाच त्यांनी संत म्हणून संबोधले आहे. जे ज्याप्रमाणे बोलतात व त्याचप्रमाणे जे कृती करतात, अशाच स्त्री पुरूषांना त्यांनी पूजनीय मानले. दुसऱ्याची सेवा करणे हेच ज्या ज्या व्यक्ती महत्वाचे मानतात, अशाच व्यक्ती त्यांना वंद्य वाटत असल्याचेही त्यांनी कवितेतून सूचित केले.

एकूणच सावित्रीबाई फुले यांच्या कवितेवरून असे निदर्शनास येते की, त्यांनी स्वातंत्र्य, समता, मानवतेचा पुरस्कार केलेला दिसून येतो. त्यांनी शोषण करणाऱ्या वर्चस्ववादी व्यवस्थेवर प्रखरपणे टीका केली आहे. स्त्री–शूद्रांनी शिक्षणाच्या प्रवाहात येऊन आपल्या अंधकारमय जीवनापासून दूर जाण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांना मनोमन वाटत असल्याचे दिसून येते. त्यांच्या एकूणच कार्यातून व काव्यरचनेमधून स्त्री, शूद्र–अतिशूद्र यांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्याची तळमळ दिसून येते. त्यांच्या वेदनेविषयी त्यांना कळवळा वाटतो. याशिवाय त्यांनी धार्मिक ढोंगबाजी, कर्मकांड, बुवाबाजी, अंधश्रध्दा, पुरोहिताची दलाली यासारख्या गोष्टींना प्रखरपणे विरोध केला दिसून येतो. त्यांचे हे एकूणच कृत्य स्त्री–शूद्रांना सक्षम करणारे असल्याचे दिसते. त्यांनी त्या काळात परंपरागत मानसिकतेच्या समाजाचा विरोध पत्करून, बंडखोर अशी पावले उचलल्यामुळेच, आजच्या काळातील स्त्री–शूद्र यांच्या वाट्याला काहीसे स्वाभिमानाचे, माणूसकीचे जीवन वाट्याला आलेले दिसून येते.

संदर्भ ग्रंथ

१) सावित्रीबाई फुले समग्र वायय, (संपा. डॉ. मा.गो.माळी), महाराष्ट्र राज्य आणि साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

२)सावित्रीबाई फुले काल आणि कर्तृत्व, (संपा. डॉ. मा.गो.माळी), महाराष्ट्र राज्य आणि साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

07 स्वातंत्र्य पूर्वकाळातील भारतातील महिला विषयक कायदे

प्रा. डॉ. बी. आर. तनपुरे,
इतिहास विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

ब्रिटिशांच्या भारतातील प्रवेशापूर्वी तसेच मुस्लिम राजसतेपूर्वी भारतातील राजांच्या राज्यकारभाराचा प्रमुख आधार हा स्मृतीग्रंथ होता. इस्लामिक राज्यकर्त्यांच्या काळात इस्लामी प्रजेकरिता तो शरीयत होता. मात्र असे असले तरी भारतातील राजसत्ताही अनियंत्रित स्वरूपाची होती. राज्यकर्त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने नव्हती, धर्मशास्त्रांची बंधने केवळ नैतिक बंधने होती. मात्र ब्रिटिशांच्या आगमणानंतर किंवा ब्रिटिशांच्या भारतातील सत्तास्थापनेनंतर भारतामध्ये खऱ्या अर्थाने कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले. भारतामध्ये ब्रिटिशसत्ता प्रस्थापित होण्याचा काळ हा विविध प्रदेशामध्ये वेगवेगळा आहे, तर संपुर्णपणे भारत ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली कधीही गेला नाही, असे असले तरी भारताच्या त्याही भागावर ब्रिटिशांचा प्रभाव अपरिहार्यपणे पडलाच. ब्रिटिश पाश्चात्याचे प्रतिनिधी होते आणि भारतीय समाजापेक्षा ब्रिटिश समाज हा निश्चितच आधुनिक होता. त्यामुळे ब्रिटिशांसोबतच भारतामध्ये आधुनिकतेचे वारे वाहू लागले ब्रिटिश समाज मुक्त समाज होता, तर भारतीय हे विविध जातीपातीच्या बंधनात बंदीस्त होते. ब्रिटिश आणि भारतीय समाजात हा मुख्य भेद होता.

ब्रिटिश अमंल भारतामध्ये सुरू झाल्यानंतर प्रारंभिक काळात भारतीय समाजात असणाऱ्या विविध घातक, अमानुष रूढी, परंपरा मोडीत काढण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला. अर्थात त्यामुळे त्यांना रूढीवादी भारतीयांकडून विरोधही झाला. ब्रिटिशांची याबाबत भारतीयांशी पहिली चकमक उडाली ती सतीबंदीच्या संबंधाने ब्रिटिश अमंलाच्या प्रारंभिक काळात ब्रिटिशांनी भारतीयांना न दुःखावता सतिप्रथा निर्मुलनाचा प्रयत्न केला. मात्र हळूहळू अशा प्रयत्नांमुळे सतिप्रथेचे निर्मुलन अशक्य असल्याची प्रखर जाणीव त्यांना झाल्याने त्यांनी या बाबत कायदा करून कठोर पावले उचलली सती हा शब्द साध्वी या शब्दाचा पर्यायी शब्द असला तर रूढार्थाने पतीच्या शवासोबत अग्निला समर्पित होणारी स्त्री या अर्थाने हा शब्द वापरला जातो. सती म्हणजे पतीव्रता स्त्री असाही एक अर्थ आहे. पतीच्या शवासोबत सती जाण्याचा प्रकार याच अर्थाने आहे. शिवाय शंकराची पत्नी पार्वती हिचेही एक नाव सती आहे. तिने आपल्या पित्याच्या घरीआपल्या पतीचा झालेला अपमान सहन न झाल्याने यज्ञकुंडात उडी घेऊन जीव दिला होता. यातूनही या प्रथेचा जन्म झाला असावा

असे वायुपुराणातील कथनावरून वाटते.१ स्त्री वर पतीच्या जीवंतपणी तर अधिकार असतोच; परंतु पतीच्या निधनानंतर ही तिच्यावरील पतीचा हक्क संपृष्टात येत नाही असाच एकप्रकारे सतीप्रथेचा अर्थ होता. सतीप्रथेच्या मुळाशी अनेक कारणे होती. ज्यामध्ये धार्मिक कारणाने स्त्रिया सतीजात. सती जाणाऱ्या स्त्रीला समाजात मरणोत्तर मानाचे स्थान प्राप्त होत होते. तिला देवतेचा दर्जा प्राप्त होत होता. पतीवरील निष्ठेपोटी, पतीवरील अतिव प्रेमापोटीही स्त्रिया सती जात असत. पुढील काळात सती प्रथाही ऐच्छिक न राहता ती अनिवार्य बनविल्या गेली. सतीप्रथेचा संबंध प्रतिष्ठेशी जोडला गेला. वास्तविक सतिप्रथेचा वेदकाळात पुरावा मिळत नाही. उलट ऋग्वेदामध्ये पतीनिधनानंतर त्याच्या विधवेने पतीच्या निधनानंतर त्याच्या लहान भावाशी विवाह केल्याचे उदाहरण मिळते. विधवेकरिता त्याकाळात विधवाविवाहाला नियोगाचा पर्याय उपलब्ध होता. मात्र उत्तरवैदिक काळापासून या सतिप्रथा वाढत गेली आणि ती वैदिक जीवनाचा एक भाग बनला. सतिप्रथेचे उदात्तीकरण करण्यात आले. घराण्याची प्रतिष्ठा म्हणून स्त्रिया सती जात होत्या. ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत या प्रथेला विकृत वळण लागलेले होते. अनेकदा सती जाण्याकरिता स्त्रियावर दबावसुद्धा आणला जात होता.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर या प्रथेला आळा घालण्यासाठी ब्रिटिशांचे प्रामाणिक प्रयत्न सुरू झाले. मात्र इंग्रजांना स्थानिक लोक दुःखावले जाणार नाहीत याची काळजी घेणे भाग होते. न्यायव्यवस्थेची पुनर्रचना करतांना एल्फिन्स्टनने त्याप्रकारची पुरेपूर काळजी घेतली होती. सतीप्रथेमध्ये असलेली सक्ती कमी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, मात्र त्यांनी यासाठी अप्रत्यक्ष प्रयत्न केले. पुण्याचा कलेक्टर असलेल्या हेन्री डंडास राबर्टसन यांने सती जाण्यास बाध्य करणे हा सदोष मनुष्य वधाचा गुन्हा असल्याचे जाहीर केले. त्यांने यासाठी वेदशास्त्रसंपन्न लोकांची सभा घेऊन सतीसाठी लाकडी मंडप न उभारता गवती मंडप उभारण्याबाबत आग्रह धरला.२ ब्रिटिशांनी या प्रकारे सतिप्रथेच्या सक्तीला विरोध केला. गवतीमंडपाचा पर्याय आल्यावरसतीजाणाऱ्यास्त्रिाब्रिटिशांचाकायदा काय आहेतेसमाजावून सांगूनजर एखादी स्त्री सतीजात असेल आणि सरणातून परत येत असेल तर तिला जातीबहिस्कृत करण्याची नवी शक्कल प्रतिगामी लोकांनी लढवली.३ अर्थात ब्रिटिशांच्या कायद्याला पळवाटा शोधण्याचे कार्यभारतीय प्रतिगामी लोक करत होते. बंगाल मध्ये राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथा बंदव्हावी यासाठी तळमळने प्रयत्न केले. त्यांनी आपल्या वहिनींनाच सती जातांना पाहिल्यामुळे या प्रश्नाची तीव्रता त्याच्या लक्षात आलेली होती. गव्हर्नर लॉर्ड विल्यम बेटिकलाही या प्रथेच्या स्वरूपाने आश्चर्याचा धक्का बसला होता. वर उल्लेख आलेल्या राबर्टसन या अधिकाऱ्याने १) नवऱ्याच्या मरणाचे अत्यंतिक दुःख, २) सतीचा होणारा गौरवपूर्ण उल्लेख आणि ३) पतीच्या निधनाने पुर्णपणे निराधार झाल्याची जाणीव व समाजात विधवेला मिळणारी हीन दर्जाची वागणूक४ ही काही महत्वपूर्ण कारणे सतिप्रथेच्या मुळाशी असल्याचे म्हटले होते. सतीबंदीची बाब बेटिंक पूर्वीच्याही गव्हर्नरांच्या विचाराधिन होती, मात्र बेटिंकच्या काळात ०७ डिसेंबर १८२८ रोजी या प्रथेवर

बंदी घालण्याचा निर्णय झाला व ४ डिसेंबर १८२९ रोजी कायद्याद्वारा सती हा फ्फौजदारी गुन्हा ठरविला गेला. सुरूवातीला बंगालमध्ये पारीत करण्यात आलेल्या या कायद्याच्या क्षेत्रात ०२ फ्फेब्रुवारी १८३० रोजी मद्रास व मुंबई प्रांतसुद्धा आले. ब्रिटिशांसाठी सती प्रथेचा साक्षीदार होणे भयावह बाब होती. मात्र या कायद्याला कट्टर सनातनी लोकांनी न्यायालयात आव्हान दिले व प्रकरण प्रिव्हीकौंसील पर्यंत गेले. मात्र प्रिव्ही कौंसीलने सती बंदीवरील सनातनी लोकांचे अपील फ्फेटाळून लावले.

सतीप्रथे प्रमाणेच विधवाविवाहाचा प्रश्न भारतीय समाजात स्त्रियांच्या दृष्टीकोनातून एक गंभीर प्रश्न होता. पूर्ववैदिककाळात विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार मान्य केला गेला होता. याशिवाय या काळात नियोगासारखी प्रथा अस्तित्वात होती. मात्र पुढे विधवांचा पुनर्विवाहाचा अधिकार नाकारला गेला आणि नियोग प्रथा अनैतिक मानली गेली. एका अर्थाने समाजान विधवांचा जगण्याचा अधिकारच अमान्य केला. विशेषतः स्मृती ग्रंथामध्ये विधवांना विवाहाचा अधिकार नाकारला गेला. ब्रिटिशकाळापर्यंत विधवांना विवाहाचा अधिकार नाकारलेलाच होता. विधवांनी विवाह केल्यास त्यांच्या होणान्या संततीला कायदेशीर अधिकार प्राप्त नव्हते. ही संतती अनौरस समजली जात होती. विधवा मग ती कोणत्याही वयात विधवा झालेली असली तरी तिला आपला संपूर्ण आयुष्याचा काळ हा वैधव्यातच घालवावा लागत होता. समाजात बालविवाहाची प्रथा अस्तित्वात असल्यामुळे बालविधवांचा प्रश्न अतिशय जटील असा प्रश्न बनलेला होता. लहान मुली वयात येण्याच्या आधीच त्यांचे विवाह केले जात आणि जर दुर्दैवानेत्यांच्या पतीचे लवकरच निधन झाले, तर लग्न म्हणजे काय हे कळायच्या आतच त्यांना वैधव्य येत असे; मात्र समाजाने त्यांना पुनर्विवाहाचा अधिकार नाकारला होता. मात्र अशा बालविधवांचे पाऊलचुकले की समाज त्यांना दुषणे द्यायलाही तयार असे. बंगाल मध्ये थोर समाज सुधारक पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवांच्या हलाखीच्या परिस्थितीवरील उत्तर म्हणून पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. हिंदू धर्मशास्त्रानुसार विवाह हा एक संस्कार होता आणि त्यामुळे धर्मशास्त्रांनी विवाह विच्छेदाला आणि पुनर्विवाहाला परवानगी नाकारली होती. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार नाकारतांना काही कारणे दिली जात असत त्यामध्ये महत्वाचे कारण हे दिले जात असे की, विवाहामध्ये वधुपितावराला कन्यादान करीत असतो आणि कोणते ही दान हे केवळ एकदाच देता येते. दुसरे असे की कन्यादानाचा अधिकार केवळ वधुपित्यालाच असतो. पित्याच्या अनुपस्थितीत भ्राता, पितामह, मातामह वा मातेलाही कन्यादान करता येत होते;५ परंतु तरीही दान मात्र एकदाच करता येत होते. हिंदू धर्मात सगोत्र विवाहासबंदी असल्याने व विवाहानंतर पतीचे गोत्र हेच पत्नीचे गोत्र बनते. एखाद्या स्त्रिचा पुनर्विवाह करावयाचा झाल्यास तिचा विवाह कोणत्या गोत्रात करावा हा प्रश्न उपस्थित होत होता. शास्त्रकारांनी स्त्री-पुरुषांनी अव्यभिचारीपणे एकमेकांशी जीवनभर वागावे अशा प्रकारची अपेक्षा पती- पतीकडून केली होती. शास्त्रांमध्ये विविध परिस्थितीत एखाद्या स्त्रीने पुनर्विवाह केला, तर तिला काय म्हणावे हे सांगीतले आहे; परंतु

स्त्रिलापतीचा त्याग करून किंवा पतीच्या पश्चात पुनर्विवाह करण्याची परवानगी मात्र नाकारली आहे. संकट प्रसंगी राजहितास्तव पती नपुंसक असेल तर राजद्रोही असेल तर संतती होत नसेल तर अशावेळी स्त्रियांना दुसरा विवाह करण्याचा अधिकार देण्यात आला होता.६ मात्र हा अधिकारवरील परिस्थिती पुरताच मर्यादित होता. स्त्री पराकोटीची परावलंबी बनविण्यात आली होती. योनीशुचितेला अत्यांतिक महत्व देण्यात आले होते. ब्रिटिशकाळ येता येता बालविवाहाच्या अनिष्ठ प्रथेमुळे समाजात बालविधवांचा प्रश्न जटील बनला होता. त्यामुळेच १९ व्या शतकात हा प्रश्न ऐरणी वर आला. कंपनी काळातच ब्रिटिश सरकारने कायद्याच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्याचा निर्णय घेतला. कारण या काळात विधवांचे जीणे अतिशय हालाकीचे झाले होते. विधवांना सामान्य स्त्रियांच्या पंगतीस बसू दिले जात नसे. त्यांना आभूषणे वापरता येत नसत, त्यांना केशवपनाची सक्ती होती, त्यांना एकवाढी जेवन करावे लागत होते. ७ कंपनी सरकार २५ जुलै १८५६ रोजी हिंदू विधवाविवाह प्रतिबंध निवारक कायदा आणला. या कायद्याने हिंदू विधवांना दुसरा विवाह करण्याकरिता कायदेशीर परवानगी मिळाली. मात्र या कायद्याने ज्या विधवांना पुनर्विवाह करावयाचा आहे अशा विधवांना केवळ पुनर्विवाह करण्यासाठी परवानगी मिळाली. त्यांच्या वर सरकार पुनर्विवाह करण्यासाठी दबाव आणू शकत नव्हते. सरकार या तऱ्हेने विधवांचे दुःख कमी करण्यासाठी धावून आले खरे; परंतु या कायद्याने विधवांच्या आयुष्यात मोठी क्रांतीआली असे काही घडले नाही. या कायद्याचे एकच फ्फ़लीत समोर आले, ते म्हणजे ज्या विधवांना पुनर्विवाह करण्याची इच्छा आहे अशा विधवांना पुनर्विवाह करण्यास परवानगी तेवढी मिळाली. त्यांच्या पुनर्विवाहानंतर झालेल्या संततीला पूर्वी नसलेला औरस संततीचा दर्जा मिळाला. मात्र या कायद्या नंतर हिंदू धर्मात फ्फ़ारमोठी क्रांती आली आणि सर्वत्र पुनर्विवाह होऊ लागले असे काही झाले नाही. उलट ज्या लोकांनी या कायद्याचा आधार घेऊन पुनर्विवाह केले अशा लोकांना समाजाच्या जाचाचा सामना करावा लागला. प्रसंगी पुनर्विवाहीतांना आत्महत्या कराव्या लागल्या.८ सरकारलाही या कायद्याचा फ्फ़टका बसला. या कायद्यानंतर १८५७ चा उठाव झाला. त्याच्या काही प्रमुख कारणांमध्ये कंपनी सरकारने सतीबंदी आणि विधवा प्रतिबंध निवारक कायदा यासारख्या काही समाज सुधारणाविषयक कायद्यांचाअर्तभावहोता. त्यामुळे पुढील काळात ब्रिटिश राजवट ताकही फ्फ़ुंकून पितांना दिसली.

वरील महिला विषयक कायद्याव्यतिरिक्त १८७२ मध्ये रजिस्टर मॅरिज ॲक्ट आला. या कायद्याने कोणत्याही स्त्री –पुरुषांना कोणत्याही धर्माच्या स्त्री–पुरुषांशी विवाह करण्याची अनुमती मिळाली. मात्र यामध्ये एक अट होती. अशाप्रकारे विवाह करणाऱ्या लोकांना आपण कोणत्याही धर्माशी संबंधीत नसल्याचा वचननामा लिहून द्यावा लागत होता. यामुळे हा कायदाही एकप्रकारे निरुपयोगीच होता.

भारतीय समाजात विधवांची जी समस्या होती तिच्या मुळाशी भारतीय समाजात असलेला बालविवाह हे एक महत्वाचे कारण होते. भारतीय समाजातील सर्व धर्मातील

मुलींच्या विवाहाचे वय जे भारतीय दंडसंहिता १९६० मध्ये १० वर्षे दिलेले होते. मात्र यातही दहा वर्षे हे विवाह वय नव्हते, ते केवळ संभोग संमतीचे वय होते. म्हणजे याही वेळेस बालविवाहाला कायदा आडवा येत नव्हता. हे विवाह वय वा संगती वय वाढवून १२ वर्षे करण्यासाठी ब्रिटिशांनी एक विधेयक आणले होते. संगतिवयाचा कायदा म्हणून ते प्रसिद्ध आहे. भारतातील शेट बेहरामजी मेहरवानजी मलबारी नावाच्या सद्गृहस्थान व्हाईसराय लॉर्ड रिपनकडे बालविवाह व सक्तीचे वैधव्य या दोन विषयावरील टिपणे सादर केली होती व त्यावर कायदा करण्याची सरकारला विनंती केली होती. व्हाईसरायने ही टिपणे प्रांतिक सरकारे आणि नामवंत भारतीय पुढा–याकडे पाठवून त्यांची या विषयावर प्रतिक्रिया विचारली. या टिपणामध्ये लहान बालिकेशी विवाह करणाऱ्या तरुणांना सरकारी नोकरीपासून परावृत्त करण्याविषयीची शिफ्फारस यात करण्यात आलेली होती. या टिपणावर देशभरातून प्रतिक्रिया उमटल्या. मुंबई प्रातांत या टिपणांच्या बाजूने ६८ व तर टिपणांच्या विरोधात ४७ लोकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या. मलबारी यांनी विधवांच्या बाबतीत दिलेल्या सूचनालोकांना पसंद पडल्या नाहीत. एक तर ते हिंदू नव्हते आणि हजारो वर्षाच्या संस्काराच्या विरोधात जाण्यास लोक तयार नव्हते. लोकांनी ही टिपणे अव्यवहार्य ठरविलीत महात्मा फ्फुले यांनी मुलाचे वय १९ व मुलीचे वय ११ असावे अशी सूचना केली होती. प्राचार्य गो. ग. आगरकर यांनी तर विवाहवय १० वरून १२ वर आणण्या पेक्षाही प्रौढ वयाचा आग्रह धरला होता.१० अखेर या टिपणांना होणारा विरोध लक्षात घेता मलबारींची ही टिपणे सरकारने निकालात काढली.११ संमतिवयाच्या कायद्याला सनातन वर्गाने विरोध केलात्या पाठीमागे एक महत्त्वाचे कारण हे ही होते की, जर हे विधेयक पारीत झाले तर त्याकाळी झालेले जवळजवळ सर्वच विवाह हे अवैध ठरले असते. आपल्या मताला किंमत मिळत नाही हे पाहिल्यावर मलवारींनी इंग्लंडमध्ये जावून या बिलाबाबत जागृती केली. यातच हरिमोहन नावाच्या ३० वर्षाच्या युवकाने त्याच्या ११ वर्ष वयाच्या पत्नीसोबत जबरीने संभोग केल्याने ती मरण पावल्याची घटना घडली. अनेक सुधारकी विचारांच्या लोकांनी आणि त्यांच्या बायकांनीही याविधेयकाचे समर्थन केले. सरकार या विधेयकाच्या गिषाने आपल्या सामाजिक प्रश्नांमध्ये ढवळाढवळ करण्याची संधी शोधत आहे अशी रानातनी वर्गाला भीती वाटत होती. या बिलावर कायदे मंडळात सांगोपांग चर्चा झाली. या चर्चेला उत्तर देतांना व्हाईसरायने विकृत चाली बंद करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. धर्मा पेक्षा नीती जास्त श्रेष्ठ आहे' असे म्हणून या कायद्याचा दुरूपरोग होणार नाही याबद्दल सरकार अत्यंत दक्ष राहील असे आश्वासन दिले.१२ अखेर लोकांचा विरोध डावलून सरकारने सरकारने हे विधेयक सौम्य स्वरूपात पारीत केले.

यापुढच्या काळात संसदेत विवाहवय हे १२ वरून १४ वर्ष करावे या अर्थाचे बिल १९२२ आले होते मात्र ते ३६ विरूद्ध ५४ मतांनी पराभूत झाले. १९२५ मध्ये सर अलेक्झांडर मुडीमन यांचे बील आले ज्यात विवाहितेसाठी संगतीवय १३ वर्ष व विवाहबाहय संबंधात ते १४ वर्ष करण्यात आले होते. यावेळी सरकारची भूमिकाच संशयास्पद होती. १९२७ मध्ये

प्रसिद्ध सारडा बिल आले. हे बिल राय बहादूरना. हरविलास सारडा यांनी आणले. मात्र त्यापूर्वी जरठ कुमारी विवाहावरील 'शारदा' हे नाटक येवून गेले होते व लोकांच्या मनात इतके ठसले होते की, त्याच विषयावरील हे बिल सारडा यांनी आणले ते 'शारदा बिल' या नावानेच प्रसिद्ध झाले. सारडा' आणि 'शारदा' या नामसाधर्म्याचा तो एक परिणाम होता. मदन मोहन मालविय, बेंजीना या सारख्या सभासदांनी हे बिल सर्वच धर्मियांसाठी लागू करण्यात यावे असे विचार मांडले. अखेर मुलाचे विवाह वय १८ व मुलीचे विवाह वय १४ ठरवून हे बिलपारीत झाले. यापुढच्या काळात स्त्रिया अधिक जागृत झाल्या. त्याच्याकडून स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार मिळावा यासाठी मागणी होऊ लागली. भारतीय दंड संहितेतील ४८८ हे पोटगीचे कलम ३१२ हे गर्भपाता विषयीचे कलम अशा प्रकारची कलमे स्त्रियांना संरक्षण देणारी कलमे होती. एप्रिल १९३७ मध्ये वारसा हक्काचे बिल आले. या कायद्याने विधवेला नवऱ्याच्या स्वकष्टार्जित मालमत्तेत वारसाधिकार प्राप्त झाले. १९२० नंतर स्त्रियांकरिता पारीत झालेल्या कायद्यांचे वैशिष्ट्य हे होते की, यापूर्वीच्या कायद्या प्रमाणे हे सरकारच्या पुढाकाराने बनलेले कायदे नव्हते तर भारतीय जनप्रतिनिधींच्या पुढाकाराने बनलेले कायदे होते. मात्र तितकेच या वेळी सरकार उदासिन होते.. जो जोश, उत्साह सरकारने यापूर्वीचे स्त्री विषयक कायदे पारीत करतांना दाखविला होता तोसरकारचा उत्साह आता मावळला होता. मात्र भारतीयांचा याबाबतीला उत्साह मात्र वाढला होता. शिवाय यापूर्वीच्या विधेयकाच्या वेळी पुरुषांनी स्त्रियांच्या हक्कांकरिता पुढाकार घेतला होता मात्र आता स्त्रियांशी गोठया प्रमाणात जागृत झाल्या होत्या. एकूणच स्वातंत्र्यपूर्वकाळात १९ शतकाच्या तुलनेत २० व्या शतकाच्या मध्यामध्ये स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती घडून आली होती आणि याकाळात स्त्रियांकरीता कायदे बनविण्याच्या प्रक्रियेला सरकरच्या सहकार्या शिवाय वेग आला होता.

संदर्भ :

१) वायुपुराण १०.२७

२) कीर धनंजय महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पा. आ. २०१२ पृ. १०८.

(३) समते प्रतिभा, स्त्रीप्रश्नांची चर्चा एकोणिसावे शतक. पद्यगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. मार्च २००५. पृ. १९७

४) रानडे रमाबाई, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, वरदा प्रकाशन, पुणे, प्र. आ. मे २००२, पृ. ४१,

५) नवरे कृष्णास्त्र (संपा) निर्णयरिधु पू. ३००.

(६) अर्थशास्त्र अध्या. ३.२.४८,

७) खरे वासुदेव गोविंद, नाना फडणीसाचे चरित्र, १९२७. पृ.३३०/

(इ) मालशे रा. ग. आपटे नंदा, संपादक: विधया विवाह चळवळ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई, प्र. आ. १९७८, पृ. ४०.

९) देशपांडे कमलाबाई, स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल, मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पुणे १९६०. पृ.१३५.

१०) गणेपप्रभाकरप्रधान (संपा.), आगरकरलेखसंग्रह, साहित्य अकादेमी, पुनर्रगुदण २०१३. पृ. ८०

११) लता डफ, आगरकरांची पत्रकारिता एक धगधगता निखारा, विजय प्रकाशन, नागपूर २००५. पृ.४६.

१२) कमलाबाई देशपांडे, स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल, मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पुणे १९६०. पृ.१८२.

08 मुस्लीम महिलांचा राजकीय सहभाग

प्रा. डॉ. बबिता येवले,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
अमरावती
इ-मेल : bpyeole@gmail.com

सारांश –

भारतात मुस्लीम अल्पसंख्यांक आहेत मुस्लीम महिलांना अल्पसंख्याकातील अल्पसंख्यांक असा दुहेरी फटका बसतो. असे आढळते की भारतीय राजकरणात मुस्लीम महिला मागासलेल्या नसून दुर्लक्षीत असल्याचे आढळते. भारतात मुस्लीम महिलांचा राजकीय सहभाग अत्यंत नगण्य असून त्याची सर्वाधीक महत्वाचे कारने मुस्लीम महिलांची शैक्षणिक स्थिती, धर्माची सनातनी व कर्मठ मानसिकता, पितुसत्ताक संस्कृती, त्यातून राजकीय सहभागाच्या अल्पशा संधी, महिलांचे आर्थिक परावलंबीत्व, सामाजिक मागासलेपण, महिलांची अजागरूकता, कौटुंबिक जबाबदारी इ. आढळतात.

मुस्लिम महिलांच्या राजकीय सहभागात वाढ व्हावी यासाठी या महिलांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याची गरज आहे. कौटुंबिक पाठबळ, आर्थिक स्वावलंबन, आरक्षाणाऐवजी स्वच्छेने वावरण्याचे स्वातंत्र्य, अघोषित वर्चस्वापासून मुक्तता होण्यासाठी आत्मविश्वास वाढविण्यास पोषक वातावरण, राजकीय पक्ष, कुटुंब, समाज यांच्याकडून राजकीय सहभागाची संधी व प्रशिक्षणाची मुस्लीम महिलांना नितांत आवश्यकता आहे.

की–वर्डसब – अल्पसंख्यांक समुदाय, संसद, राज्यविधीमंडळ, कॅबीनेट, सांसदीय समित्या, राजकीय नेतृत्व, राजकीय सहभाग.

प्रस्तावना –

२०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येत एकूण मुस्लीम संख्या १४.३% आहे. भारतात हिंदू धर्मानंतर मुस्लीम धर्मियांची संख्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२१ पर्यंत भारतात मुस्लीम २०९ दशलक्ष होते. सर्वच घटक राज्यात मुस्लीम धर्मियांची संख्या अधिक आहे. भारतात एकूण लोकसंख्येच्या हे प्रमाण १४.३% आहे. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा मुस्लीम देश आहे भारतातील बंदूसंख्याक मुस्लीम सुनी आहेत. १३% शीया आहेत. मुस्लिमांची सर्वाधिक संख्या उत्तर प्रदेशात मध्ये आहे.

आधुनिक युगात जगातील ९०% राष्ट्रांनी लोकशाही स्वीकारलेली आहे. धर्मवंश

जात, लिंग, पंथ, वर्ण या आधारांवर भेदभाव नाकारणे व देशातील सर्वच घटकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रवाहात शामिल करून घेण्यावर लोकशाही उभारलेली असते. जगातील काही राष्ट्र सोडता आज बहुतांश राष्ट्रात स्त्रियांना पुरुषांच्या समक्ष अधिकार बहाल करून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आलेला आहे.

भारतीय संविधानामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या मूल्यावर आधारित भेदभाव विरोधी लोकशाहीची हमी दिलेली आहे. पण प्रत्यक्षात अल्पसंख्याक विशेषत: मुस्लिमांचा सहभाग कमी आहे.

२०२३ नुसार भारताची एकूण लोकसंख्या १४० कोटी पेक्षा अधिक आहे आहे. यात पुरुष ५१.६% व महिलांचे प्रमाण ४८.४% इतके आहे. महिलांमध्ये मुस्लीम महिलांची संख्या ६.९% आहे.

आपल्या संविधानाने अधिकाराव्दारे सर्व नागरिकांना सक्षम करण्याची हमी दिलेली आहे विशेषत: महिला सक्षमीकरणावर भर देवून वेळोवेळी कायदे तयार करण्यात आले, धोरणे आखण्यात आले, केंद्र व राज्य पातळीवर वेगवेगळी धोरणे आखून स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो पण प्रत्यक्षात विचार करता याबाबी कागदोपत्रीच राहतात. व्यवहारात हे अंतर तसेच दिसते किंबहुना अधिक जाणवते. विशेषत; महिला सक्षमीकरणाच्या बाबत मुस्लीम महिलांना याचा दुहेरी फटका बसतो एकतर त्या महिला म्हणून गौण स्थान मिळवते व त्यातही महिलांमध्ये जे विभिन्न प्रवर्ग आहेत त्यात मुस्लिमांच्या वाट्याला किती उपलब्धी येणार..?

असे निदर्शनास येते की, न्यू रिसर्च सेंटरच्या अभ्यासानुसार भारतात मुस्लीम लोकसंख्येचा वाटा १९५१ ,अद्जे सी,आरे १०% जपता २०११, अंदाजे १४% व २०२० मध्ये १५% वाढला पण राजकीय प्रक्रियेत गेल्या १५ वर्षात तो १०% पेक्षा अधिक वाढला नाही.१

शोधलेखाचा उद्देश –

प्रस्तुत शोधलेखाचा उद्देश भारतातील मुस्लीम महिलांच्या राजकीय सहभागाचे अध्ययन करणे हा आहे. राजकीय क्षेत्रात मुस्लीम महिलांच्या सहभागाचे अध्ययन करता केंद्र व घटक राज्ये स्तरावर मतदार, प्रतिनिधी, राजकीय नेतृत्व, (केंद्र + घटक राज्ये मं. मं.) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, सांसदीय समित्या, राजकीय पक्ष स्तरावर शासनाच्या विविध रचना व पदे इ. मध्ये महिलांचा सहभाग, तो कमी असण्याची कारणे व उपाय यावर विस्तृत विवेचन करणे हा शोधनिबंधाचा मुख्य हेतू आहे.

१९५२ ते २०२२ पर्यंत विविध प्रकारच्या राजकीय संस्थामध्ये मुस्लीम महिलांचा सहभाग दर्शविणार तक्ता.

विभिन्न पदे	एकुण महिला	मुस्लीम महिला	%
लोकसभा प्रतिनिधी	६१०	२४	२०.६%
राज्यसभा प्रतिनिधी	-	१५	-
केवळ वर्तमान राष्ट्रपती	-	-	००
उपराष्ट्रपती	-	-	००
केंद्रीय कॅबिनेट	-	-	-
घ. रा. कॅबिनेट	-	-	-
विविध सांसदीय समित्या	०७	-	-
घटकराज्य	३३५	१७	५.०७%
स्तरावरील प्रतिनिधित्व	-	-	-

स्त्रोत - https://www.basiness-standard,muslim

संसदेत महिलांचा सहभाग –

संसदेत मुस्लीम महिला निर्वाचीत होण्याची आकडेवारी अभ्यासली असता असे निदर्शनास येते की, १९५२ पासून आजपर्यंत हे प्रमाण लोकसभेत ४ च्या वर गेलेले नाही.२ २०१४ साली निर्वाचीत ऐकूण ५४१ पैकी ५२ महिला आहेत त्यात मुस्लीम महिलांचे प्रमाण ३ आहे जे प्रमाण एकूण निर्वाचीत महिलांच्या तुलनेत ३९% आहे तर राज्य सभेत हेच प्रमाण ३० पैकी ४ आहे.

राज्य विधीमंडळात मुस्लीम महिलांचा सहभाग –

राज्याच्या विधीमंडळामध्ये चित्र फ्फारसे वेगळे आहे. सद्या केवळ आसाम विधान सभेत सर्वाधिक महिला म्हणजे १४ महिला निवडून आलेल्या आहेत त्यात केवल एक महिला मुस्लीम सदस्य आहे.३

राजकीय प्रमुख म्हणून सहभाग –

भारताचा राष्ट्रपती म्हणून १९५२ पासून आजपर्यंत केवळ दोन महिलांना संधी मिळाली ज्यात एकही महिला मुस्लीम नाही. उपराष्ट्रपती व प्रधानमंत्री या पदावर मुस्लीम महिलांची संख्या शून्य आहे. नजपा हेपतुल्ला या २०१४ मध्ये उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत उभ्या राहिल्या पण निवडून येवू शकल्या नाहीत. त्यांनी १० पैकी ४ वेळा राज्यसभेच्या उपसभापती म्हणून नेतृत्व केलेले आहे.२०१९ च्या नरेंद्र मोदी सरकारमध्ये २४ कॅबिनेट मंत्रामध्ये केवळ ३ महिला आहेत पण त्या मुस्लीम नाहीत. २०१४ च्या मोदी सरकारमध्ये एकुण ११ कॅबिनेट मंत्री महिला होत्या त्यापैकी अल्पसंख्यांक व्यवहार मंत्री नजमा हेपतुल्ला या एकट्या मुस्लीम कॅबिनेट मंत्री होत्या.

केंद्रीय कॅबिनेट स्तरावरील मं.मं.त महिला प्रतिनिधींचे प्रमाण सुरुवाती पासूनच कमी आढळते ज्यात मुस्लीम महिला नाहीतच. पं. जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रीमंडळात

१९४७ च्या हंगामी सरकार केवळ राजकुमारी अमृत कौर या एकमेव मंत्री होत्या. दुसऱ्या सरकारमध्ये एकही महिला मंत्री नव्हती तिसऱ्या मं.मं.त डॉ. सुशील अय्यर या कॅबिनेट मंत्री होत्या. लाल बहादूर शास्त्री मं.मं.त तीन महिला मंत्री होत्या इंदिरा गांधींच्या कार्यकाळात १९६७-७१, १९७१-१७७७ आणि १९८० ते १९८४ या दरम्यान एकही महिला कॅबिनेट मंत्री नव्हती दुसऱ्या व तिसऱ्या मंत्रीमंडळात केवळ चार महिलांना राज्यमंत्री पदे बहाल करण्यात आलेली होती ज्यात एकही मुस्लीम महिला नव्हती. राजीव गांधी व अटल बिहारी मं.मं.त कॅबिनेट मंत्री म्हणून प्रत्येकी एका मुस्लीम महिलेचा समावेश होता. मन मोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यु. पी मध्ये सरकारच्या दोन्ही कार्यकाळात प्रत्येकी १० महिला मंत्री होत्या. पण यामध्ये मुस्लीम महिलांचे प्रमाण शून्य आहे.४

१९५२ ते २०२२ पर्यंत ४७ स्त्रीया विविध सरकारच्या मं.मं.त राज्यमंत्री राहिल्या त्यात केवळ एक महिला मुस्लीम होते हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. घटक राज्य स्तरावर वर्तमान परिस्थितीत संपूर्ण भारतात केवळ ३ मुस्लीम महिला राज्यात मंत्री पदावर आहेत. रझिया सुल्ताना (पंजाब) निलोफर काफील आणि रजिया सुल्ताना (तामिळनाडू) अर्थात सर्व घटक राज्ये मिळून ४१ महिला मंत्र्यांपैकी अनुसूचित जाती जमातीमधील एकुण ६ व मुस्लीम ३ इतके नगण्य प्रमाण अल्पसंख्यांक महिलांचे आढळले.५

सांसदीय समित्या –

केंद्रातील संसद आणि राज्य पातळीवरील विधान सभेत ज्या समित्या असतात त्यांचे दोन भाग असतात. स्थायी समिती व तदर्थ समिती सद्या केंद्रातील लोकसभेत एकुण३६ समित्या आहेत त्यापैकी तीन समित्यांचे अध्यक्ष गैर मुस्लीम महिला आहेत. राज्य सभेतील १२ स्थायी समित्यांपैकी एकाही अध्यक्ष पदावर मुस्लीम महिला नाही.६

राजकीय पक्ष स्तरावर –

पक्षस्तरावर महिलांच्या सहभागाचे अध्ययन करता असे आढळते की भारतामध्ये विभिन्न राजकीय पक्षात महिलांना त्यातही मुस्लीम महिलांना पक्षाकडून मिळणारी संधी कमी आहे. केवळ स्थानिक प्रशासनात मिळणाऱ्या आरक्षणामुळे मुस्लीम महिलांचा विचार राजकीय पक्षाकडून केला जातो पण एकूण केंद्रस्तरावर लोकसभेचा अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की मुस्लीम महिलांना निवडणुकी साठी राजकीय पक्षाकडून कमी संधी मिळते. बऱ्याचदा त्या अपक्ष म्हणून निवडणूक लढवितात व अपयशी होतात. खालील **तक्त्यावरून ते स्पष्ट होते :–**

लोकसभा	मुस्लीम महिला उमेदवार	अपक्ष मुस्लीम महिला
७ वी	९	०६
८ वी	७	०५
९ वी	११	०९
१० वी	१४	०६
११ वी	३७	३२
१२ वी	१५	०९
१३ वी	२६	११
१४ वी	२१	०६

स्त्रोत – https://www.basiness-standard,muslim

वरील टक्यातील ११ व्या लोकसभा निवडणुकीत एकूण भारतातून ३७ मुस्लीम महिला खासदार पदासाठी उमेदवार होत्या पण केवळ ५ मुस्लीम महिलांना विविध पक्षाकडून तिकीट मिळाले व ३२ महिला अपक्ष उभ्या राहिल्या. एकूण ३७ पैकी केवल २ मुस्लीम महिला निर्वाचीत झाल्यात.

वेगवेगळे राजकीय पक्ष मुस्लीम मतदारांकडे 'व्होट बँक' म्हणून पाहत असले तरी मुस्लीम महिलांना उमेदवारी देण्याबाबत राजकीय पक्ष उदासीन असतात या महिलांना अनुसूचित जाती व जमातीच्या क्षेत्रात उमेदवारी देतात. मुस्लीम भागात उमेदवारी देण्याचे टाळतात असे आढळून येते.

वरील प्रमाणे मुस्लीम महिलांच्या राजकीय सहभागाच्या स्थितीचे अध्ययन केल्यानंतर पुढील निष्कर्ष निघाले.

१) मुस्लीम महिलांचा राजकीय सहभाग सर्वच स्तरावर अतिशय कमी आणि नगण्य आढळतो हे वरील अध्ययनावरून सिद्ध होते.

२) मुस्लीम महिलांच्या कमी राजकीय सहभागाला सनातनी व कर्मठ मानसिकता पितृसत्ताक संस्कृती, महिलांचे सामाजिक मागासलेपण, आर्थिक परावलंबित्व, महिलांची निरक्षरता व अजागरूकता कारणीभूत असल्याचे आढळते.

३) विविध राजकीय पक्षांकडून मत बँक म्हणून मुस्लीम महिलांकडे पहिले जाणे परंतु त्यांना संधी देवून विविध पदाच्या जबाबदाऱ्या त्यांच्याकडे कमी सोपवल्या जातात. काँग्रेस व भा.ज.प सारख्या मोठ्या राजकीय पक्षानाही मुस्लीम महिलांची स्थिती वेगळी नाही.

४) मुस्लीम महिलांचा राजकीय सहभाग कमी असण्याला त्यांच्या शैक्षणिक स्थितीचा परिणाम आढळतो मुस्लीम महिलांचे साक्षरता प्रमाण २०११ च्या सेन्सेस रिपोर्ट नुसार केवळ ५१.९% आहे.

५) मुळातच कार्यकारी किंवा शासकीय विभागात महिलांकडे केवळ अधिक वेळा महिला

व बालकल्यान यासारखी महिलांशी निगडीत खाती सोपविली जातात. सरकारमध्ये सुषमा स्वराज्य किंवा निर्मला सितारमन यांचा अपवाद वगळता जबाबदारीची व आव्हानात्मक खाती महिलांकडे सोपविली जात नाही मुस्लीम महिलांकडे अल्पसंख्यांक खात्या सारखे खाते सोपविली जातात. यांवरून राजकारणात मुस्लीम महिला मागासलेल्या नसून दुर्लक्षित असल्याचे आढळते.

६) पुरुषाभिमुख समाजातील कट्टर व रूढीवादी मानसिकतेमुळे मुस्लीम महिला सामाजिक दृष्टीने मागासलेल्या, आर्थिक दृष्टीने वंचित व राजकीय दृष्ट्या उदासीत झालेल्या आढळतात. नुकताच द. भारतात हिजाब समर्थित व हिजाब विरोधी तणाव वाढलेला होता. तामिळनाडू, कर्नाटक या राज्यात झालेल्या स्थानिक स्वयंशासनाच्या निवडणूकांमध्ये हिजाबचे समर्थन करणाऱ्या पक्षांचे ९०% उमेदवार निवडून आले आणि हिजाब विरोधी घोषणा देणारे पक्ष पराभूत झाले. यावरून असा निष्कर्ष निघतो की मुस्लीम समुदायातील बऱ्याच महिला सुद्धा पुरुषाप्रमाणेच रुढीवादी व सनातनी असल्यामुळे त्यांना तिहेरी तनक प्रतिबांधित, हिजाब प्रतिबंधित कायदे नको आहेत. त्यांचा परिणाम त्यांच्या राजकीय सहभाग वर होतांना आढळतो.

वरील अध्ययनावरून असे निदर्शनास येते की, १९५२ पासून आजपर्यंत राजकरणात मुस्लीम महिलांचा सहभाग अत्यल्प राहिलेला आहे. तो वाढावा यासाठी पुढील सूचना सुचवलेल्या आहेत.

सूचना –

१) मुस्लीम महिलांचा नगण्य राजकीय सहभाग पाहता एक उपाय योजना अशी आहे. की त्यांना कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक पाठबळाची नितांत आवश्यकता आहे कुटुंब आणि समाजाची सनातनी, रूढीवादी व कर्मठ मानसिकता बदलवण्याची गरज आहे ती बदलवण्यासाठी मुस्लीम महिलांचे आर्थिक सबलिकरण होणे आवश्यक आहे. हे सबलिकरण होण्यासाठी त्यांना नोकरी किंवा नोकरीत आरक्षण अपेक्षित नाही तर स्वच्छेने वावरण्याचे स्वातंत्र्य असावे. सामाजिक व कौटुंबिक स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त व्हावी त्यांना आवडणारा एखादा छंद व्यवसाय म्हणून जोपासण्यासाठी त्यांना सामाजिक स्तरातून प्रेरणा मिळावी समाजात वावरतांना अघोषित वर्चस्वापासून त्याची मुक्तता होण्याची गरज आहे.

२) केवळ मुस्लीम पक्षांनीच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांनी मुस्लीम महिलांना पक्षानी अग्रक्रम द्यावा. त्यासाठी सर्वच पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात बदल करून एक धोरण आखावे . त्यांच्याकडे केवळ मतदार व्होट बँक म्हणून न पाहता तर निर्णय निर्धारक म्हणून पाहावे. मुस्लीम महिलांना राजकीय पक्षांकडून उमेदवारी मिळण्याचे प्रमाण वाढले तर भारतातील मुस्लीम अल्पसंख्याक गटाचा राजकीय पक्षाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू शकतो.

३) मुस्लीम महिलांना पक्षांकडून संधी मिळाल्यास त्यांचे निर्वाचीत होण्याचे व विविध राजकीय पदे भूषविण्याचे प्रमाण वाढेल परिणामत: शासकीय निर्णय घेणे, जी.आर, शासनाच्या धोरणातील त्रुटी, स्वत:चे अधिकार व हक्क या संबंधीचे शिक्षण त्यांना मिळेल, त्यांच्या जाणीव प्रगल्भ होतील व आत्मभान येईल.

४) राजकारणातून मुस्लीम महिलांचे दुर्लक्षीतपण कमी करण्यासाठी मुस्लीम महिलांनी स्वत: प्रयत्न करण्याची गरज आहे. सनातनी कट्टर व रूढीवादी चौकटीतून बाहेर पडण्याची नितांत गरज आहे. एकदम क्रांती करणे त्यांच्या कडून अपेक्षित नाही परंतु कुटुंबातील मुख्य स्त्रीने आपल्या कुटुंबातील लेकी – सुनांना शिक्षणाची, समाजात मिसळण्याची, सामाजिक क्रियांमध्ये शामिल होण्याची, कौटुंबिक बंधनात शिथीलता आणून थोडे मोकळेपणाने जगू देण्याची परवानगी दिली, त्यासाठी पुरुषांची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न केले तर हे काही प्रमाणात शक्य होईल. समाजकारणातून हळूहळू महिला राजकारणात येतील त्यांची सामाजिक स्वीकृती वाढेल.

५) मुस्लीम महिलांच्या राजकीय सहभागासाठी मुस्लीम नेतृत्वांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. सामान्यत: शिक्षण होण्याचे प्रमाण कमी, मजबूत महिला संघटना, नागरी समाज, मुस्लीम स्वयंसेवी संस्था यांचेकडून मुस्लीम महिलांचे संघटन, जाणीव जागृतीसाठी वारंवार उद्बोधन, शिक्षता प्रशिक्षता कार्याचे आयोजन होण्याची गरज आहे. महिलांकडून महिलांचे समुपदेशन झाल्यास मुस्लीम महिलांना राजकीय क्षेत्र नवखे वाटणार नाही व त्यांचा सहभाग वाढेल.

६) मुस्लीम महिलाच्या साक्षरतेचे प्रमाण वाढण्यासाठी त्यांच्या शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे मुस्लीम अल्पसंख्याकांचे जास्त प्रतिनिधी राजकीय प्रक्रियेत सहभागी झाले तर अल्पसंख्यांकाच्या कल्याणाला अधिक प्राधान्य दिले जाईल व असा वर्ग अपेक्षित राहणार नाही.

संदर्भ –

1) https://www.basiness-standard,muslim women are 6.9% of population.

2) The H$indu date/zero Muslim MPs in many states…… www.thehindu.com

3) Muslim women in Indian politics, olofdemocracy.org

4) https//www.istor.org, political participation of Muslim women by S. Shukla

5) Muslim women in Indian politics, olofdemocracy.org

६) तत्रैव

09 भारताच्या विकासात महिला सबलीकरणाचा प्रभाव

प्रा.डॉ. दयानंद उत्तमराव राऊत,
समाजशास्त्र विभाग प्रमुख
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय
खामगाव जिल्हा बुलढाणा
Mo. No. 8788125034 /98605870
E-Mail : dayanandraut45095@gmail.com

भारतात पूर्वी महिलांवर अनेक प्रकारचे निर्बंध होते. जसे की,सामाजिक ,धार्मिक, अध्यात्मिक आणि निर्णय प्रक्रियेत महिलांना सामावून घेतले जात नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र महिलांच्या सक्षमीकरणाला खरी सुरुवात झाली .भारतीय राज्यघटनेने महिलांना अनेक प्रकारचे अधिकार देऊन त्यांना पुरुषाबरोबर समानतेचा अधिकार दिला . यामुळेच महिलांच्या सक्षमीकरणाला स्वातंत्र्योत्तर काळातच सुरुवात झाली, असे म्हणायला काही वावगे ठरणार नाही. असे असले तरीही अजूनही भारतात महिलांचे सबलीकरण काही प्रमाणात झाले नसल्याचे दिसून येते .भारतात महिलाचे सक्षमीकरण करण्यासाठी सर्वप्रथम त्या सर्व राक्षसी विचारांना नष्ट करणे आवश्यक आहे. जे की ,त्यांच्या हक्काचे, मूल्याचे हनन करतात .जसे की, हुंडा पद्धत ,निरक्षरता ,लैंगिक हिंसाचार, असमानता ,भ्रूणहत्या, घरगुती हिंसाचार , वेश्यां व्यवसाय आणि मानवी तस्करी इत्यादी. या सर्व गोष्टी जरी महिला सक्षमीकरणात बाधा ठरत असल्या तरी ,भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकाराचा योग्य उपयोग करून महिला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, तंत्रज्ञान, अंतराळ, सांस्कृतिक, कृषी आणि कौटुंबिक क्षेत्रात ठसा उमटवून भारतातील विकासावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडत असल्याचे दिसून येत आहे.

स्वातंत्र्यानंतर महिलांच्या सक्षमीकरणाला खरी सुरुवात झाली असली तरीही महिलांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, अंतराळ ,सांस्कृतिक, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, कृषी आणि नोकरशाही आदी क्षेत्रात कर्तव्य सिद्ध करून भारताच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका निभावत असल्याचे दिसून येत आहे. हे सर्व महिला कशामुळे करू शकल्या तर ,त्यांना दिले गेलेले स्वातंत्र्य हे होय,मानव समूहात महिलांची संख्या अर्धी आहे. वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची मालकी,पतपुरवठा ,प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत महिलांना कमी संधी मिळते. तरीही मोठ्या प्रमाणात महिलांनी आपले कर्तृत्व पार पाडून सामाजिक ,आर्थिक, आणि राजकीय क्षेत्रात आपले कर्तव्य सिद्ध केले आहे. राजकिय दृष्टीने महिलांच्या संदर्भात विचार केल्यास लोकसभेच्या २०१९ च्या

निवडणुकीत ५६३ जागांपैकी ८२ जागांवर महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. आणि प्रभावीपणे देशाचे नेतृत्व देखिल करीत आहेत. २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या महिलांची संख्या फक्त ६१ होती. तर २००९ मध्ये लोकसभेत निवडून येणाऱ्या महिलांची संख्या ५८ होती यावरून लक्षात येते की, दिवसेंदिवस महिला राजकीय क्षेत्रात भरीव स्वरूपाचे कार्य करीत आहे .गेल्या पन्नास वर्षात सामाजिक क्षेत्रातही महिलांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. व सध्या करीत सुद्धा असल्याचे दिसून येत आहे .जसे की ,डॉ. लक्ष्मी गौतम (उत्तर प्रदेश),मेघा पाटकर(महाराष्ट्र) ,मदर टेरेसा, रिता सिंग, सिंधुताई सपकाळ, सावित्रीबाई फुले इत्यादी . आर्थिक क्षेत्रात सुद्धा महिलांनी आपले कर्तव्य सिद्ध केले आहे. जसे की,लक्ष्मी गौतम,इंद्रा नुयी, लीना नायर ,रोशनी नाडर ,जयश्री उल्हाल, रेवती अडवायथी, अरुणा जयंती ,चंदा कोचर ,शिखा शर्मा ,विनिता गुप्ता ,अशा कितीतरी महिला अर्थिक क्षेत्रात वर्चस्व गाजत असल्याचे दिसून येत आहे. भारताच्या सनदी नोकरशाहीत अनेक आयएएस आणि आयपीएस महिला अधिकारी व्यवस्थित भूमिका पार पाडत असून ,भारताच्या विकासात मोठ्या प्रमाणात योगदान देत आहेत. जसे की, किरण बेदी, अण्णा राजन मल्होत्रा ,स्मिता सबरवाल दुर्गाशक्ती नायपाल ,अरुणा सुंदराजन ,कांचन चौधरी भट्टाचार्य ,सृष्टी देशमुख , संथा नायर, आणि रजनी शिबल इत्यादी.

थोडक्यात म्हणजे, कौटुंबिक, आर्थिक ,राजकीय ,शैक्षणिक, सांस्कृतिक ,शेती, अंतराळात, तंत्रज्ञान आणि नोकरी आदी क्षेत्रात महिला सक्षमपणे काम करीत असून, देशाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देत आहेत.

अध्ययनाचा उद्देश एक :

१) महिला सक्षमीकरणाचे अध्ययन करणे

२) महिला सक्षमीकरणाचा भारतीय विकासावरील प्रभाव अभ्यासने.

महिला सक्षमीकरणाचा भारताच्या विकासावरील प्रभाव अभ्यासण्याच्या पूर्वी महिला सक्षमीकरण म्हणजे काय हे अभ्यासणे गरजेचे आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे काय :

'कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ,शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्राप्त करून देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री पुरुष असमानता नष्ट करणे. या प्रक्रियेला मायला सक्षमीकरण असे म्हणतात'.

महिला सक्षमीकरण आणि सामाजिक क्षेत्रावरील प्रभाव :

स्वातंत्र्यपूर्वक काळात महिलांवर अनेक प्रकारचे सामाजिक निर्बंध होते जसे की ,निर्णय प्रक्रिया, आर्थिक कार्य ,आध्यात्मिक कार्य, अदी प्रक्रियेमध्ये भाग घेऊ दिला जात

नव्हता .त्यामुळे महिलांचे कोणत्याच प्रकारचे सक्षमीकरण झाले नव्हते. महिला फक्त उपभोगाची वस्तू आहे असे मानले जायचे. तिचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' हेच होते.तिला शिक्षणाचा अधिकार नव्हता, पूजा अर्चा,धार्मिक दृष्टिकोनातून महिलांना अपवित्र मानण्यात आले होते. या उलट महिलाच्या सक्षमीकरणाला खरी सुरुवात भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर झाली. सामाजिक बंधने झुगारून मोठ्या संख्येने महिला सार्वजनिक ठिकाणी काम करून सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडत असल्याचे दिसून येत आहे.जसे की,घर सांभाळणे, मुलांचे पालन पोषण, शेतात काम करणे, नोकरी करणे , आणि निर्णय प्रक्रियेत योग्य निर्णय देणे इत्यादी.

महिला सक्षमीकरण आणि आर्थिक क्षेत्रावरील प्रभाव :

भारताच्या एकूण लोकसंख्या पैकी अर्थी संख्या ही महिलांची आहे .जेव्हा जास्त स्त्रिया काम करतात ,तेव्हा त्यांचा थेट परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होत असतो. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, सकारात्मक विकास परिणामाव्यतिरिक्त उत्पादकता वाढवीते.तसेच वैविध्य आणि उत्पन्न समानता वाढविते.सध्या भारतात अंदाजे ४३२ दशलक्ष महिला कार्यरत आहे .त्यापैकी ३४३ दशलक्ष महिला असंघटित क्षेत्रात काम करतात. मेकिंन्से ग्लोबल इन्स्टिट्यूशनच्या अहवालानुसार ,असा अंदाज आहे की ,महिलांना समान संधी देऊन भारत २०२५ पर्यंत आपल्या GDP मध्ये Uss ७७० अब्ज जोडू शकतो .काही महिला उद्योजकांनी अनेक प्रकारचे अडथळे तोडून स्वतःची ओळख प्रस्थापित केल्यामुळे, भारतीय स्टार्टअप दृश्यात लक्षणीय बदल होत आहे .उद्योग क्षेत्रात अनेक महिला आपले वर्चस्व गाजवून भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. अशा महिलांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील रोशनी नाडर, लीना नायर ,जयश्री उल्लाल, रेवती अरुणा,अरुणा जयंती, इत्यादी. या महिलांनी वेगवेगळ्या उद्योगाच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रभाव पडल्याचे दिसून येत आहे.

महिला सक्षमीकरण आणि राजकीय क्षेत्रावरील प्रभाव :–

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महिलांनी राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे सहभाग दर्शवून आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे .जसे की ,माता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, राणी रजिया सुलताना ,राणी चन्नम्मा इत्यादी .तर स्वातंत्र्योत्तर काळात इंदिरा गांधी, सोनिया गांधी, प्रतिभाताई पाटील, ममता बॅनर्जी, मायावती, जयललिता, सुषमा स्वराज ,निर्मला सीतारामन, इत्यादी. महिलांनी राजकीय क्षेत्रात प्रभाविपणे काम करून राजकारणात आपली स्वतःची वेगळी छाप निर्माण केली आहे. महिला सुद्धा एक चांगल्या स्वरूपाचे राजकारण करून भारताच्या राजकीय विकासात महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असल्याचे सिद्ध होत आहे.

महिला सक्षमीकरण आणि शैक्षणिक क्षेत्रावरील प्रभाव :

भारतातील अनेक महिलांनी कौटुंबिक जबाबदारी पार पाडून शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे कामगिरी केली आहे .उच्च शिक्षण घेऊन महिला शिक्षण क्षेत्रात आपली जबाबदारी चोखपणे पार पाडत असल्याचे दिसून येत आहे. वैद्यकीय शिक्षण घेऊन अनेक महिला डॉक्टर म्हणून रुग्णाची सेवा करीत आहेत .अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन अनेक महिला एक प्रभावी अभियंताचे काम करत आहे. त्याचबरोबर कलेक्टर, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, आयपीएस अधिकारी होऊन आपले कर्तव्य पार पाडत आहे. एवढेच नाही तर सीमावर्ती दलात आणि अंतराळात दैदित्यमान प्रगती करून भारताचे शिक्षण क्षेत्र उजाळून टाकत असल्याचे दिसत आहे. पूर्वी महिलांना कोणत्याच प्रकारचे अधिकार नव्हते .परंतु जेव्हा राज्यघटनेने पुरुषासारखेच महिलांना देखील अधिकार बाहाल केले .याचीच संधी घेऊन महिलांनी अनेक प्रकारचे शिक्षण घेऊन भारताच्या शिक्षण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे.

सारांश :–

भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात महिलाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पुरुषाच्या बरोबरीने महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करीत असल्याचे दिसून येत आहे. भारतातील अर्धी लोकसंख्या असलेल्या महिला वेगवेगळ्या क्षेत्रात दैदित्यमान कामगिरी करून, आपल्या नावाचा ठसा उमटवत आहे .भारताच्या तंत्रज्ञान ,क्रीडा ,अंतराळ आणि उत्पादन क्षेत्रात देखील आपला प्रभाव पाडला आहे .पूर्वी समाज व्यवस्थेत महिलांवर अनेक प्रकारचे निर्बंध होते. स्त्रियांना कोणत्याच प्रकारचा अधिकार नव्हता .सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून महिलांना कमी लेखले जात होते .परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मात्र राज्यघटनेने महिलांना पुरुष सारखेच अधिकार दिले. याच संधीचा फ्फायदा घेत अनेक महिलांना वेगवेगळ्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. सीमावर्ती भागात ,खेळायचा मैदानात देखील महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे .त्यामुळेच म्हटले जाते की, भारताच्या विकासात महिलांचे देखील योगदान असल्याचे दिसून येते. म्हणून महिला सक्षमीकरणाचा भारतीय विकासावर प्रभाव असल्याचे दिसून येते.

संदर्भ:–

१) आढाव विकास– महिला सबलीकरण व निरंतर शिक्षण, ज्ञान विस्तार विभाग पुणे.

२) डॉ. पाटील शोभा– स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे ,प्रथम आवृत्ती २००७ .

३) कडू मोहिनी– भारतीय राजकारणातील महिला, विजय प्रकाशन हनुमान गल्ली नागपूर, २०१८ .

४) अन्सारी ला. ए.– महिला और मानवाधिकार ,ज्योती प्रकाशन बरकत नगर जयपुर.

५) गुप्ता कमलेश कुमार– महिला सक्षमीकरण, बुक एन क्लेह जयपुर २००५.

६) कर्वे स्वाती –स्त्री शिक्षणाचे नवे क्षितिज ,प्रतिभा प्रकाशन पुणे .

10 महिला शिक्षण आणि त्याचा महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम

प्रा. कु. पल्लवि रामेशराव देशमुख
गृह-अर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड जि.वाशिम

शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत होतो,माणूस घडतो म्हणूनच शिक्षण घेणे आवश्यक आहे. मुलींच्या शिक्षणाची दारे सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांनी १८४८ मध्ये उघडली.आणि स्त्री शिक्षणाचे प्रणेते बनले स्त्री शिक्षण हे मुली आणि स्त्रियांसाठी अतिआवश्यक आहे.स्त्री शिक्षणा संबंधीच्या समस्या आणि वादविवादांच्या गुंतागुंतीच्या संचाचा एक संपूर्ण शब्द आहे याला वारंवार मुलींचे शिक्षण किंवा स्त्री शिक्षण असे म्हटले जाते. स्त्री शिक्षणामुळे महिलांना जगण्याचा मार्ग मोकळा होतो शिक्षण या शब्दाकडे माणसाचा तिसरा डोळा म्हणून बघितले जाते. मुली आणि स्त्रियांच्या शिक्षणातून असमानता गुंतागुंतीची आहे स्त्रिया आणि मुलींना शाळेत प्रवेश करण्यासाठी स्पष्ट अडथळ्यांना तोंड द्यावे लागते मुलींच्या शिक्षणात गुंतवणूक केल्याने समुदाय देश आणि संपूर्ण जग बदलते .ज्या मुली शिक्षण घेतात त्यांची तरुणायात लग्न होण्याची शक्यता कमी असते आणि निरोगी उत्पादक जीवन जगण्याची शक्यता जास्त असते.शिक्षणामुळे त्या जास्त उत्पन्न मिळवतात, त्यांच्यावर सर्वात जास्त परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये सहभागी होतात आणि स्वतःसाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी चांगले भविष्य तयार करतात.

मुलींच्या शिक्षणामुळे अर्थव्यवस्था मजबूत होते आणि विषमता कमी होते हे अधिक स्थिर लवचिक समाजामध्ये योगदान देते जे सर्व व्यक्तींना मुले आणि पुरुषासह त्यांची क्षमता पूर्ण करण्याची संधी देतात पण मुलींचे शिक्षण हे शाळेत जाण्यापेक्षा जास्त आहे हे मुलींना सुरक्षित वाटणे बद्दल आणि त्यांनी निवडलेल्या विषयांमध्ये आणि करिअरमध्ये पाठिंबा देण्याबद्दल देखील आहे ज्यामध्ये त्यांच्या सहसा कमी प्रतिनिधित्व केले होते. एक स्त्री जर शिकली तर पूर्ण कुटुंब शिक्षित होते असे म्हटले जाते .महिलांच्या शैक्षणिक पातळी सुधारणा केल्याने तरुण स्त्रियांच्या आरोग्यावर आणि आर्थिक भविष्यावर स्पष्ट प्रभाव पडतो ज्यामुळे त्यांच्या संपूर्ण समाजाच्या भविष्यात सुधारणा होते. ज्या बालकांच्या मातांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे त्यांचा बालमृत्यू दर ज्यांच्या माता निरक्षर आहे त्यांच्या तुलनेत अर्धा आहे .जगातील सर्वात गरीब देशांमध्ये ५०% मुली माध्यमिक शाळेत जात नाही तरीही संशोधनात असे दिसून आले आहे की मुलींच्या शाळेतील प्रत्येक अतिरिक्त वर्ष त्यांच्या जीवन उत्पन्नात १५ टक्के वाढ करते. स्त्री शिक्षण सुधारणे आणि अशा प्रकारे महिलांची कमाई क्षमता त्यांच्या स्वतःच्या मुलांची जीवनमान सुधारते कारण स्त्रिया त्यांच्या कुटुंबात पुरुषापेक्षा जास्त उत्पन्न गुंतवतात तरीही मुलींच्या शिक्षणात अनेक अडथळे कायम आहेत.

स्त्री शिक्षणामुळे आरोग्य आणि कुटुंबातील व्यक्तींचे आरोग्य याबद्दलची जागरूकता

वाढते आजच्या या धकाधकीच्या जीवनात शरीर आणि मन यांचा मेळ बसविणे अवघड झाले आहे. शरीर व मन मानवी अस्तित्वाच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत मनाच्या व्यवहारावर शरीराचे व्यवहार जास्त अवलंबून असतात .मानसिक स्वास्थ सध्याच्या परिस्थितीमध्ये खूप आवश्यक आहे आरोग्य हीच संपत्ती आहे असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे.मनस्थिती जर चांगली असेल तर परिस्थिती बदलता येते नाहीतर सगळेच बिघडत चालते.सध्याच्या परिस्थिती मध्ये मानसिक ताणताणाव जास्त वाढत चालला आहे.नको त्या गोष्टीचा ताण मनुष्य घेताना दिसतोय आणि त्याचा शरीरावर वाईट परिणाम होताना दिसतोय.

सकस आहार शरीरातील दोष धातूंचे संतुलन भूक चांगली लागणे ,पचन होने ,सुरळीत उत्सर्जन होणे शिवाय आत्मा मन आणि इंद्रियांची प्रसन्न अवस्था म्हणजे स्वस्थ निरामय अवस्था आहे. जागतिक आरोग्य संघटना यांनी आरोग्याची व्याख्या केलेली आहे की शारीरिक, मानसिक, सामाजिक स्वास्थ म्हणजे आरोग्य होय. यावरून असे लक्षात येते की आरोग्य महत्त्वपूर्ण घटक आहे .अन्न तारी अन्न मारी या उक्तीप्रमाणे आहारच नियंत्रण आणि आहारात रोगाला आमंत्रण आहे.

आपण अन्न कशाकरिता घेत असतो.

शारीरिक पोषण चांगले व्हावे म्हणून जीवन जगण्याकरिता हवा पाणी आणि त्यानंतर गरज आहे ती अन्नाची .आईच्या गर्भाशयात देखील अन्नावरच गर्भाचे पोषण होत असते आहार समतोल नसेल तर दोष निर्माण होत असतात . शारीरिक क्रिया सुरळीतपणे चालण्याकरिता आपण अन्न घेत असतो.

ऊर्जा निर्मिती

दिवसभर आपण काम करीत असतो त्याकरिता ऊर्जेची गरज असते ही ऊर्जा आपल्याला अन्नपदार्थापासून मिळत असते.चालणे, बोलणे, झोपणे, धावणे, पोहणे अशा अनेक शारीरिक क्रिया करण्याकरिता आपल्याला उर्जेची गरज असते व हि उर्जा आपण अन्न ग्रहण करून मिळवीत असतो.

शरीराची झीज भरून काढणे व नवीन पेशींची निर्मिती करणे

शरीराच्या दिवसभराच्या हालचालीतून पेशी वृद्ध होतात त्यांची जागा नवीन पेशी निर्माण होतात रोज नियमित आहार घेतल्याने वजन कमी होत नाही मात्र दोन दिवस अन्न ग्रहण केले नाही तर एक दोन किलो वजन कमी झाल्याचे लक्षात येते आणि म्हणून व्यवस्थित सात्विक आहार असल्यास योग्य आरोग्य लाभते.

रोगप्रतिकारशक्ती वाढणे

सात्विक आहार असेल वेळेवर घेतला जात असेल तर कुठल्याही प्रकारचा आजार सहजासहजी होत नाही.शिळे अन्न, फ्फास्ट फ्फूड हे घेतल्यास आरोग्याला हानिकारक आहे.

आहार आणि मन

उदरभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म.केवळ पोट भरणे नव्हे तर जेवण हे यज्ञ कर्म आहे. साधे व चवदार जेवण नक्कीच मनाला आनंद देऊन जाते. आहारातून मनावर संस्कार होतात मनाची

जडणघड होते मानसिक विकास होतो .योग्य आहार आचार विचार व्यवहार चिंतन म्हणून स्वभाव वर्तणूक यांचा परस्पर संबंध आहे जसे खाल्ले तसे मन होते.

सकस आहाराचे महत्त्व

सात्विक संतुलित संपूर्ण सकस आहार मनुष्याला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य देते. लठ्ठपणा, कॅन्सर ,बीपी यासारखे शारीरिक व अनेक आजारापासून लढण्याची ताकद देते. चिंता ,तणाव, अशांती व आस्वाद याचे मुख्य कारण सध्याची जीवनशैली आहे. योग्य आहार घेतल्यास या सर्वांपासून बचाव होऊ शकतो सकस आहार घेणाऱ्या व्यक्तीचा शरीर विचार व जीवन पूर्ण शुद्ध सात्विक असते दिवसातून दोन वेळा योग्य सात्विक आहार मिळण्यासाठी फळांचा ज्यूस सलाद भाजी इत्यादी घ्यायला हवेत.

आहाराचे शिक्षण जर स्त्रीला माहिती असेल तर कुटुंबातील व्यक्तीच्या तब्येतीची काळजी ती योग्य रित्या घेऊ शकते.शिक्षणाच्या माध्यमातून योग्य आरोग्य लाभू शकते.

संदर्भ :

१) पोषण आणि आहारशास्त्र – त्रिवेणी फ्फ़रकाडे ,सुलाभा गोंगे

२) Swaaminathan,M. - Essential Food & Nutrition.

३) Joshi.S.A. - Nutrition & Dietetics.

४) Mahajani S.- Aaharshastrachi Multatve.

11

७३ वी घटना दुरुस्ती आणि महिला सक्षमीकरण

प्रा. डॉ. शरण शिवरुद्रप्पा निलंगेकर,
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

जगाच्या एकूण ८१० कोटी लोकसंख्येपैकी ४९.५८% लोकसंख्या ही महिलांची आहे. तर भारताच्या बाबतीत एकूण लोकसंख्येपैकी हे प्रमाण ४८.४१% इतके आहे. याचाच अर्थ जवळपास अर्धी लोकसंख्या ही महिलांची असून सुद्धा अल्पसंख्याका सारखी त्यांची स्थिती दिसून येते कारण आजही जगातील १९३ पैकी बहुतांश देशात महिला सक्षमीकरणावर कार्य चालू आहे. म्हणजेच अजूनही महिला हा घटक विशेषत: भारतात सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक दृष्टीने उपेक्षित मागास दुर्लक्षित केला गेलेला दिसून येतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात संघराज्य व्यवस्थेचा स्वीकार करून कल्याणकारी राज्याचे धोरण राबविण्याचे ठरविले गेले. केंद्र व राज्यस्तरावरून होणारे विकासाचे प्रयत्न अपुरे आहेत हे लक्षात येताच पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या पातळीवरून विकासाचे प्रयत्न व्हावेत याकरिता बलवंत राय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १९५१ ला समिती नेमली. या समितीने अहवालात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची शिफारस केली. महाराष्ट्रात नाईक समितीच्या शिफारसीने १९६१ ला त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. पण केंद्र व राज्य सहकार्याची या संस्थाप्रति अनास्था, दुर्लक्ष, वेळेवर या संस्थेच्या निवडणुका न होणे, यांना वेळेवर निधी उपलब्ध करून न देणे, या नानाविध कारणामुळे या स्थानिक संस्था मरणासन्न अवस्थेत पोहोचल्या. त्यामुळे साहजिकच या संस्थांच्या बळकटीकरणाकडे लक्ष देणे गरजेचे होते. याच विचारातून १९८६ ला राजीव गांधींच्या राजवटी पासून शासन स्तरावर या संदर्भाने हालचाली सुरू झाल्या व याला मुहूर्त स्वरूप डिसेंबर १९९२ ला ७३ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून प्राप्त झाले.

या घटनादुरुस्तीने खया अर्थाने महिलांचा राजकारणातील सहभाग वाढविण्यास मदत झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण या घटना दुरुस्तीने या स्थानिक संस्थाना कायदेशीर घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला. विशेषत: या घटना दुरुस्ती मध्ये महिलांनी या स्थानिक संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण प्रतिनिधित्व सदस्य आणि पदाधिकारी स्तरावर मान्य करून खऱ्या अर्थाने लोकशाहीचे विकेंद्रीकरण केले असेच कौतुकाने म्हणावे लागेल.

सामान्यपणे ७३ वी घटना दुरुस्ती ही ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणणारी ठरली. ज्यामुळे या संस्थांना घटनात्मक प्राधान्य स्वतंत्र वित्त आयोग निवडणूक आयोग त्याचबरोबर महिला सक्षमीकरणासाठी ३३ टक्के आरक्षण व २००१ ला ५० टक्के महिला आरक्षणाची तरतूद ही बाब निश्चितच भविष्यासाठी मौलाचा दगड ठरली असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

या दुरुस्तीमुळे खालील बाबतीत प्रामुख्याने खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण घडून आलेले दिसून येते.

महिलांचा वाढता राजकीय सहभाग :–

महिलांसाठी आरक्षित जागा ठेवल्यामुळे साहजिकच साक्षर/ निरक्षर या परिघातून आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेतून महिला बाहेर पडून स्थानिक संस्थांमध्ये सदस्य, पदाधिकारी म्हणून आपल्या चिवट वृत्तीच्या आधारे कामाचा ठसा उमटवून लागल्या.

लोकशाहीचे खऱ्या अर्थाने केंद्रीकरण :–

लोकांनी लोकांसाठी म्हणजे फक्त पुरुषांनी पुरुष व स्त्रियांसाठी नव्हे तर पुरुष व स्त्री प्रतिनिधींनी पदाधिकाऱ्यांनी देशातील तमाम नागरिकांसाठी चालवलेली व्यवस्था म्हणजे लोकशाही शासन व्यवस्था अशी लोकशाहीची नवीन व्याख्या बनवून तो दृश्य स्वरूपात आणून खऱ्या अर्थाने लोकशाहीचे विकेंद्रीकरण महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून झाले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

महिलांच्या समस्यांना प्राधान्य:–

महिला प्रतिनिधी मुळे महिला अत्याचारास विरोध महिला व बालविकास विकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी महिलांच्या आरोग्य विषयक समस्या व जागृती यावर भरीव काम झालेले दिसून येत आहे.

स्त्री शक्तीचा उपयोग:–

स्थानिक संस्थामध्ये सद्यस्थितीत महिलांना ५० टक्के आरक्षण उपलब्ध करून दिल्यामुळे खऱ्या अर्थाने देशातील ४९% महिला लोकसंख्येला प्रतिनिधी मिळून स्त्रीशक्ती उपयोगात आणण्यास मदत झाली. स्त्री प्रतिनिधींचा स्त्रियांच्या समस्या प्रती असलेला दृष्टिकोन खऱ्या अर्थाने कामाला येऊन स्त्रियांच्या समस्या सुचण्यास मदत झाली असे म्हणता येईल.

नारी शक्तीचा सन्मान:–

स्त्रियांना स्थानिक संस्था मध्ये प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे खऱ्या अर्थाने नारीशक्तीचा सन्मान होऊन समाजात स्त्रियांचा मान सन्मान वाढला. उच्च पदाधिकारी पदावर महिला प्रतिनिधी विराजमान झाल्यामुळे स्त्री जातीचा सन्मान वाढला. पदाबरोबर अधिकार प्राप्त झाल्यामुळे सहाजिकच स्त्री प्रतिनिधींनी त्या अधिकाराचा वापर सक्षमपणे करून दाखवला. त्याचे कार्यप्रति असलेले समर्पण, चिकाटी ,भ्रष्टाचार मुक्त प्रशासन या गुणामुळे स्त्रीया आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत.

मागास प्रवर्गातील महिलांना संधी:–

खुला प्रवर्गातील महिलांबरोबरच मागास प्रवर्गातील(SC, ST, NT, VJNT, OBC, SBC) महिला प्रतिनिधी स्थानिक संस्थांमध्ये मुख्य पदावर विराजमान झाल्या. त्या निरक्षर असून सुद्धा अनुभवाच्या आधारे त्या व्यवस्थितपणे आपली जबाबदारी सांभाळताना दिसून येत आहे रोजंदारीवर जुनी भांडी करून संसार सांभाळणाऱ्या महिलांना खऱ्या अर्थाने आरक्षणामुळे डोळ्यात

आनंद अश्रू यावेत असा मानसन्मान या पदावर आल्यामुळे मिळाला सहाजिकच ख ्या अर्थाने समाजातील या खालच्या स्तरातील लोकांना सामावून घेतल्यामुळे लोकशाही प्रक्रियेमध्ये राजकारणात या लोकांचा सक्रिय सहभाग वाढला त्यातूनच त्यांचा विकास झाला असे म्हणावे लागेल.

लोकशाही वरचा विश्वास वाढला :–

स्थानिक संस्थांमध्ये महिलांना प्रतिनिधित्व दिल्यामुळे त्या राजकीय दृष्ट्या सक्रिय झाल्या स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे धैर्य आत्मविश्वास त्यांच्या जागृत झाला त्यामुळे सहाजिकच लोकशाहीची मूल्य जोपासली गेली लोकशाही वरचा त्यांचा विश्वास वाढला असे म्हणता येईल.

स्त्रियांचे कुटुंबातील समाजातील महत्त्व वाढले:–

स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे त्यांचे मनोबल उंचावले त्या प्रशासकीय दृष्ट्या साक्षर बनल्या निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढला त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना स्वतःच्या कुटुंबात समाजात मानसन्मान मिळाला यातून त्यांना काम करण्याची ऊर्जा प्राप्त झाली.

वरील प्रमाणे खऱ्या अर्थाने स्त्री विकासास चालना मिळाली. स्त्रियांचे स्थान राजकीय दृष्ट्या सक्षम बनले स्त्री शक्तीचा परिचय सर्वांना झाला निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढला असे असले तरी काही प्रमाणात दोषपूर्ण झालं त्यांच्या कार्याला दिसून येते ती म्हणजे त्यांच्या कार्यात त्यांच्या पतीचा होणारा हस्तक्षेप होय अजूनही तो होतो आहे हा दोष दूर झाला तर खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण झाले असे म्हणता येईल.

संदर्भ ग्रंथ

१) स्थानिक शासन डॉ.टी.एन.गायकवाड

२) भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था – डॉ. बैनाडे व डॉ.शिरसाट

३) उच्चतर लोकप्रशासन – डॉ. बी. एल. फ्फडिया

४) दैनिक पुण्यनगरी

५) दैनिक लोकसत्ता

ISBN : 978-81-965458-1-9 Year : 2023

12 महिला सबलीकरण एक सक्रिय प्रक्रिया

प्रा. रंजना अनक्षिणे
मा.सु.पा. कला, विज्ञान व कै.पां. ठा.
वाणिज्य महाविद्यालय मानोरा
मो. ९४०३४७४९०२

प्रस्तावना :–

महिलांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारणे, आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क आणि अधिकार प्राप्त करुन देणे हा महिला सबलीकरण प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे.

राजकिय क्षेत्रातील दुर्गुणाचा नाश करण्याकरीता निकोप राजकीय क्षेत्रात प्रवेश करणे हा महिला सबलीकरणाचा उद्देश आहे. स्वतःची सकारात्मक प्रतिमा तयार करणे व नकारात्मक गोष्टींवर ताबा मिळवणे हे आहे.

गृहीतके :–

१. महिला पुरुषांच्या बरोबरीने विकास आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करुन देणे महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेत अपेक्षित आहे.

२. महिलांना आर्थिक समता, हक्क, अधिकार, निर्णय, कर्तव्य, स्वअस्तित्व याची जाणीव व्हावी.

३. महिला सबलीकरण हा पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय, सामाजिक अधिकार मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर चालविलेला संघर्ष आहे.

४. सर्व क्षेत्रातील महिलांना त्यांची ओळख व सामर्थ्य याची जाणीव करुन देणे.

५. महिलांचे संघटन मजबूत होण्याकरिता आणि महिला वरील अन्याय, अत्याचार, गुन्हेगारी दूर होण्याकरिता महिलांचे सबलीकरण आवश्यक आहे.

६. संपूर्ण समाज सुखी, समाधानी, आनंदाने व जबाबदार म्हणून कार्य करण्याकरिता सबलीकरण आवश्यक आहे.

संशोधनाचे सिंहावलोकन :–

महिलांच्या अनेक समस्या आहेत. आजही समाजातील महिलांचे स्थान दुयम दर्जाचे आहे. ग्रामीण भागात आजही स्त्री ही दुसऱ्याच्या घरी जाणार आहे हे पक्का समझ आहे. लहान

वयातच लग्न व नंतर शिक्षणाच नावच नाही. त्यामुळे शिक्षण आणि एकंदरीत स्त्रियांच्या विकासावर मर्यादा पडत आहेत. भारत सरकारने १९७१ मध्ये स्त्रियांच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी समिती नेमली. त्या समितीने अहवालातील निष्कर्षात स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या भीषण परिस्थितीवर प्रकाश टाकला. त्याचा परिणाम स्त्रियांच्या आंदोलनकारी गटांचा उदय झाला. या गटांचे उद्दिष्टे महिलांचा दर्जा उंचावणे हे होते.

संकलन :–

स्त्री शिक्षण घेवू लागली. घराबाहेर पडली तरी तिचे पूर्वीचे समाजातील स्थान फ्फारसे बदलले नाही. स्त्री स्वातंत्र्याच्या नावाखाली तिचे अर्थार्जन सुरु झाले पण म्हणून तिची घरातली जबाबदारी काही कमी झाली नाही. काम करणाऱ्या स्त्रीकडून घरातल्या कामाबरोबरच बाहेरच्या कामाचीही जबाबदारी वाढली. तिची ओढाताण होऊ लागली. स्त्री बाहेर कितीही मोठ्या यशस्वी असली तरीही तिने घरातल्या जबाबदाऱ्याही पार पाडल्याच पाहिजेत ही सर्वसामान्य प्रथा मध्यमवर्गात अजूनही दिसतेच. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानवविकास अहवालात यासंबंधी काही आश्चर्यकारक माहिती समोर आली आहे. घरकाम आणि नोकरी असे दोन्ही क्षेत्रात काम करणारी स्त्री सर्वसाधारणपणे पुरुषापेक्षा जास्त काम करते. काही विकसनशील देशातील ग्रामीण भागातील स्त्री ही पुरुषांपेक्षा टक्के जास्त काम करते.

सबलीकरण ही एक प्रक्रिया आहे व यामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

१. समाजामधील संसाधनांचा उपयोग करण्याकरिता महिलांना समानसंधी.

२. ध्वचार व प्रत्यक्ष कृती करतांना लिंग भेदभाव न करणे.

३. हंसाचारापासून मुक्ती.

४. आर्थिक स्वातंत्र्य.

५. सर्व महत्वाचे निर्णय घेण्याच्या समित्यांमध्ये महिलांना सहभागी करुन घेणे.

६. जीवनाशी संबंधित बाबींच्या निवडीकरिता पूर्णपणे स्वातंत्र्य.

महिला संबलीकरण हे सामाजिक न्याय व समानता यांच्याशी जोडले गेलेले आहे. समाजामध्ये समान वागणूक मिळणे ही एक महिला सबलीकरणाकरिता प्रमुख गरज आहे. सबलीकरणामुळे महिला राजकारणामध्ये सक्रिय सहभागी होतील. आर्थिकदृष्टीने घटक म्हणून काम करतील, अशा प्रकारे स्वावलंबी होतील.

सबलीकरण ही एक सक्रिय अशी प्रक्रिया आहे, ज्यामुळे महिलांना स्वतःची वेगळी ओळख पटेल व त्यांचे सर्व क्षेत्रातील महत्वपूर्ण स्थान कळेल. समक्ष महिलांची एक सकारात्मक स्वप्रतिमा तयार होते ब स्वतःसंबंधी, कुटुंबासंबंधी व समाजासंबंधी निर्णय घेण्यात सक्रिया सहभाग नोंदवतात. महिला सबलीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामुळे महिलांना संसाधनांवर मोठया प्रमाणात नियंत्रण ठेवता येते व घरासंबंधी समाजासंबंधी आणि राष्ट्रासंबंधी निर्णय घेण्यावरदेखील नियंत्रण ठेवता येते. अशाप्रकारे सबलीकरण ही एक सक्रिय अशी बहुआयामी प्रक्रिया आहे, ज्यामुळे सर्व क्षेत्रातील महिलांना त्याची ओळख व सामर्थ्य याची जाणीव करुन देते.

सबलीकरणामुळे घर, समुदाय समाज व राष्ट्र यांच्या संबंधीचे ज्ञान व संसाधने व निर्णय प्रक्रिया यावर नियंत्रण करण्याकरिता महिलांना सहभागी करुन घेतले जाते. सबलीकरणाचे मार्ग पुढील प्रमाणे आहेत.

१. शिक्षण

२. आरोग्य व आहार

३. आर्थिक स्वातंत्र्य

४. कायदेविषयक जागरुकत

५. विविध संस्थाचेसाहय

६. इंटरव्हेशन प्रोग्राम्स

महिला सबलीकरण व विविध क्षेत्रामध्ये महिलांना मिळणाच्या संधी यांचा घनिष्ट संबंध आहे. ही क्षेत्रे पुढील प्रमाणे आहेत. शिक्षण, आरोग्य, आर्थिक व राजकीय सहभाग ह. महिला सबलीकरणाचे ध्येय गाठण्याकरीता सरकारने विविध नवीन कायदे केले. याशिवाय विविध योजना आणि कार्यक्रम आखले ब अंमलात आणले. त्याप्रमाणे विकास नियोजन प्रक्रियेत महिलांना समाविष्ट करुन घेतले. अशाप्रकारे महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांचे आध्यात्मिक, राजकिय, सामाजिक व आर्थिक सामर्थ्य वाढवणे, यामध्ये त्यांच्या स्वतःच्या क्षमतासंबंधी त्यांचा आत्मविश्वास विकसित करण्याच्या अधिकारांचा समावेश आहे. सबलीकरणामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

- स्वतः निर्णय घेण्याचे सामर्थ्य.
- योग्य निर्णय घेण्यासाठी माहिती व इतर साधने उपलब्ध असणे.
- समुहिक निर्णय घेतांना दृढ निर्णय घेण्याची योग्यता...
- निवड करण्यासाठी विस्तृत पर्याय असणे.
- परिवर्तन घडवून आणण्याच्या योग्यतेबाबत सकारात्मक विचारसरणी.
- लोकशाही पध्दतीने इतरांचे दृष्टिकोन बदलण्याची योग्यता.
- अखंड व स्वपुरस्कृत विकास प्रक्रिया व परिवर्तनात सहभाग घेणे..
- वैयक्तिक किंवा सामुहिक सामर्थ्यामध्ये सुधारणा घडवण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची योग्यता.
- स्वतःची सकारात्मक प्रतिमा तयार करणे व नकारात्मक गोष्टीवर ताबा मिळवणे.

महिला सबलीकरण : एक दृष्टिक्षेप :–

१. जगातील १ बिलियन निरक्षरांपैकी ६७ टक्के महिला आहेत.

२. जगातील १.३ बिलियन गरीब लोकांमधील ७० टक्के महिला आहे.

३. जगातील संसदेमध्ये केवळ ११ टक्के स्त्रिया आहेत.

४. गेल्या शतकामध्ये केवळ २४ महिला सरकार मधील शासकीय उच्चपदावर होत्या.

५. जगातील १.३० दशलक्ष बालकांमधील २ / ३ मुली शाळेत जात नाहीत.

६. विकसनशील देशामधील ५५ टक्के ग्रामीण महिला अन्नधान्य उत्पादनाचे काम करतात.

७. जगातील ९३ देशांमध्ये महिलांना मंत्रिपद मिळालेले नाही.

८. जगातील ५० देशांमध्ये शासन स्तरावरील उच्चपदांच्या सर्वोच्च पातळीवरील पदांमध्ये महिला आढळत नाहीत.

९. एप्रिल १९९१ मध्ये जगातील एकूण देशांपैकी फक्त ७ देशांमध्ये महिला राष्ट्रप्रमुख पदावर होत्या.

यावरुन असे स्पष्ट होते की, शासनातील मंत्रीपदे व अन्य महत्वाची निर्णय प्रक्रियेतील पदे महिलांना अतिशय कमी प्रमाणात जागतिक स्तरावर मिळतात. अनेक देशांमध्ये या पदांवर महिला अजिबातच आढळत नाहीत, ही काळजी करण्यासारखी बाब आहे.

शिफारशी :–

१. महिला सबलीकरणाव्दारे स्त्री शिक्षणाचे साक्षरतेचे प्रमाण वाढवणे.

२. स्त्रीयांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे पुरुषाप्रमाणे महिलांसुध्दा निर्णय प्रक्रियेते सहभागी करुन

३. घेणे.

४. समाजामधील संसाधनाचा उपयोग करण्यासाठी महिलांना समान संधी मिळावी.

५. थ्वचार व प्रत्यक्ष कृती करतांना लिंग भेदभाव न करणे.

६. जीवनाशी संबंधित बाबींच्या निवडीकरिता पूर्णपणे स्वातंत्र्य हवे.

७. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य असले पाहिजे.

८. हिंसाचार, अत्याचारापासून मुक्ती हवी.

९. सर्व महत्वाचे निर्णय घेण्याच्या समितीमध्ये महिलांना सहभागी करुन घेणे.

१०. राजकारणात महिलांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात यावे.

११. विकास योजना व कार्यक्रम अंमलबजावणी मध्ये महिलांना प्राधान्य हवे.

निष्कर्ष :–

सबलीकरण ही एक सक्रिय अशी प्रक्रिया आहे. ज्यामुळे महिलांना स्वतःची वेगळी ओळख पटेल व त्यांचे सर्व क्षेत्रातील महत्वपूर्ण स्थान कळेल. सक्षम महिलांनी एक सकारात्मक

स्वप्रतिमा तयार होते व स्वतःसंबंधी कुटुंबासंबंधी व समाजासंबंधी निर्णय घेण्यात सक्रिय सहभाग नोंदवतात. यामुळे महिलांना संसाधनावर मोठया प्रमाणात नियंत्रण ठेवता येते व घरासंबंधी समाजासंबंधी आणि राष्ट्रासंबंधी निर्णय घेण्यावर देखिल नियंत्रण ठेवता येते. सबलीकरणामुळे सर्व क्षेत्रातील महिलांना त्यांची ओळख व सामर्थ्य याची जाणीव कळून येते. सबलीकरणामुळे घर, समुदाय, समाज व राष्ट्र यांच्या संबंधीचे ज्ञान व संसाधने व निर्णय प्रक्रिया यावर नियंत्रण करण्याकरिता महिलांना सहभागी करुन घेतले जाते.

संदर्भ ग्रंथ :–

१. महिलाओके मौलिक अधिकार रमा शर्मा, एम के मिश्रा

२. भारतीय शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह प्रा.ना.ग. पवार

३. स्त्री अभ्यासाच्या दिशा: डॉ. सुनंदा ल. अहिरे, प्रा. डॉ. उषा य. साळु

४. राष्ट्रीय महिला आयोग और भारतीय नारी एम. ए. अंसारी

५. कुटूंबसंस्था आणि परित्यक्त्या स्त्री डॉ शिला द. देशपांडे

६. सामुदायिक विकास, विस्तार, शिक्षण व महिला सबलीकरण डॉ. उज्वला वैरागड / प्रा. विद्युल्लता मुळे

७. कौटुंबिक हिंसाचार: मेघा ताडपत्रीकर

८. भ्रूण हत्या और महिलाये मंजू गुप्ता, सुभाषचंद्र गुप्ता

९. स्त्रियांची शतपत्रे डॉ. स्वाती कर्वे

१०. नारी सशक्तीकरण विदर्भ एवम यथार्थ आशा कौशिक

13 महिला सक्षमीकरणामधील समस्या व त्यावरील उपाययोजना

प्रा. डॉ. संकेत सुरेश काळे
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,
खडकी बु. अकोला
मो. क्र. ९८२२१७५६५२,
ई-मेल : sanketkale4050@gmail.com

प्रस्तावना :

महिलांना महिला असल्यामुळे अनेक समस्यांशी सामना करावा लागतो. या समस्यापैकी काही समस्या कौटुंबिक तर काही शैक्षणिक तर काही समस्यांचे स्वरुप हे राजकीय सामाजिक व आर्थिक असे आहे. ह्या समस्या स्त्रीला आव्हानेच ठरतात. काही महिला या आव्हानांना योग्य प्रकारे तोंड देऊ शकतात. तर ज्या महिलांना या आव्हानांना तोंड देता येत नाही, त्या महिला निराश होतात.

ज्याप्रमाणे प्रत्येक मुलाला, तरुणाला व वृध्द व्यक्तीला काही समस्यांना सामोरे जावे लागते तसेच महिलांनाही त्यांच्यासमोरील अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. त्या सर्व प्रश्नांना क्रमाने विचार करु.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या :-

भारतात दुसऱ्या महायुध्दानंतर व स्वातंत्र्यानंतर अनेक स्त्रियांना नोकऱ्या उपलब्ध झाल्या. पंचायत, समिती, जिल्हा परिषदा, शिक्षणसंस्था, बँका, तहसील कार्यालये, विद्यापीठे, विविध कारखाने इ. पोलिस, उद्योगधंदे वाहतूक व्यवस्था इ. ठिकाणी स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने नोकरी करताना दिसतात. स्त्रियांना पदवी व पदव्युत्तर शिक्षण मिळाले अनेक ठिकाणी रोजगार उपलब्ध झाले. पण यातून स्त्रियांच्या समस्यांची गुंतागुत वाढी. शहरातील आणि ग्रामीण भागातील नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्यांमध्येही खूपच तफ्फावत आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार आलेल्या अहवालाने असे निदर्शनास आले आहे की, शहरी आणि ग्रामीण भागातील, घराच्या चार भिंतीच्या बाहेर येऊन काम करणाऱ्या महिलांच्या संख्येत उल्लेखनीय वाढ झालेली दिसून येते. महिलांना नोकरी का हवी असते? त्यामागची त्यांची प्रेरणा पुरुषांपेक्षा भिन्न असते. पहिले महत्वाचे कारण म्हणजे पैशाची गरज

त्याशिवाय पतीचे अपुरे वेतन, पतीचे आजारपण, त्याचा अकाली होणारा मृत्यू, पतीने आधार न देणे, पतीने केलेला त्याग यामुळे स्त्रिया घराबाहेर नोकरी करण्यास उत्सूक असतात. जवळजवळ ९० टक्के महिलांना आर्थिक कारणासाठी नोकरी करावी लागते. त्याशिवाय भविष्यातील सुरक्षितता, व्यक्तिगत सन्मान व आकांक्षा, स्वाभिमानाचे समाधान, सामाजिक संपर्क, वाढते राहणीमान यामुळेही स्त्रिया नोकरी करतात.

कौटुंबिक जबाबदारी :–

नोकरी करणाऱ्या महिलांना कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तिला वेळेचे नियोजन करावे लागते. उपलब्ध वेळेत, कामाची आखणी करावी लागते. शहरातल्या धावत्या व गतिमान जीवनात तिला मुले लहान असताना शाळेत सोडावे लागते. मुलाला पाळणाघरात ठेवावे लागते. ते जमले नाही तर पर्यायी व्यवस्था करावी लागते. अशावेळी पती व घरातील इतर कुटुंबीय व्यक्ती यांचे तिला सहकार्य असेल तर तिचे जीवन सुसह्य होते. नाहीतर तिला खूप शारीरिक व मानसिक ताणातून मार्गक्रमण करावे लागते.

भूमिका–समायोजन :–

नोकरी करणाऱ्या महिलांना घरी आणि नोकरीच्या ठिकाणी स्वत:ला समायोजन करावे लागते. समायोजन म्हणजे परिस्थितीशी जुळवून घेणे. कौटुंबिक समायोजन आणि नोकरीतील समायोजन अशा दुहेरी पेचात ती सापडते. दोन्हीकडच्या जबादा ्या जर पध्दतशीरपणे पार पाडल्या गेल्या तर स्त्रीला समायोजनात अडथळे निर्माण होऊ शकत नाहीत.

आर्थिक समस्या :–

नोकरी करणाऱ्या बऱ्याचशा महिला या आर्थिक गरजेपोटी नोकरी करतात. त्यांना कठोर परिश्रमातून जावे लागते. बऱ्याचशा कुटुंबात, विवाहित महिलांना आपल्या पगाराचे पाकीट पतीला द्यावे लागते. तर कुमारिकांना ते आपल्या पालकांना द्यावे लागते. त्यांना फक्त चहासाठी व काम करण्याच्या ठिकाणी जा ये करण्यास पैसे मिळतात. अर्थात हे प्रमाण फक्रार अल्प आहे. पण समाजातील नोकरदार महिलांची ही स्थिती आहे.

स्त्रिया म्हणून नोकरीत नकार :–

खाणीत उद्योगधंदे, वनस्पतीची लागवड, काही सहकारी बँका इ. ठिकाणी, महिलांसाठी संरक्षक कायदे असल्यामुळे खर्च वाढेल म्हणून स्त्रियांना नोकरी नाकारली जाते. त्यांचे कामाचे तास, काम करण्याची क्षमता, प्रसुतीनंतरचे फक्रायदे, त्यांची काम करण्याची क्षमता, पाळणाघर इ. खर्चामुळे खाजगी मालक स्त्रियांना नोकऱ्या देण्यास नाखूष असतात.

स्त्रियांची कोंडी :–

नोकरीत काम करीत असताना, तिला नोकरीच्या ठिकाणी सन्मानाने वागविले जात नाही. माणूस म्हणून तिच्याकडे पाहिले जात नाही. ती एकटी असेल, तर तिच्याकडे वाईट नजरेने पाहिले जाते. ती कुमारी किंवा विधवा असेल तर तिला अनेक वखवखलेल्या नजरांशी सामना करावा लागतो. एखाद्या यंत्राप्रमाणे ती घरात व बाहेर काम करीत असतो. काही वेळेला ह्या दुहेरी जबाबदाऱ्या पार पाडतांना स्वत:ची कोंडी झाल्यामुळे, ती स्वत:च्या अस्तित्वालाही विसरुन जाते.

दुहेरी भूमिका :–

नोकरी करणाऱ्या स्त्रीला घरची नोकरीतील अशी दुहेरी भूमिका पार पाडावी लागते. ह्या दुहेरी भूमिका पार पाडतांना काम करणाऱ्या महिलांना भूमिका–संघर्षातून जावे लागते. कौटुंबिक संबंध, मुलांचे पालनपोषण, सक्रिय व निष्क्रिय रुपात भूमिका पार पाडणे यावर त्याचा प्रभाव पडतो. प्रभावशाली व्यक्तिमत्वाच्या स्त्रियांपेक्षा लज्जाशील व नम्र स्वभावाच्या महिलांना आपली भूमिका पार पाडताना, अधिक समस्यांशी सामना करावा लागतो. या भूमिकासंघर्षात पतीचा दृष्टिकान फ्फार महत्वाचा असतो. तो दृष्टिकोण जर निरोगी असेल तर त्या स्त्रीला काम करणे सोपे जाते. नाहीतर तिला अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते.

ग्रामीण भागातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या

कौटुंबिक समस्या :–

प्रत्येक स्त्रीने सुंदर, सुशिक्षित व विनयशील असावे, अशी अपेक्षा प्रत्येक पतीची आपल्या पत्नीबद्दल असते. पुरुषप्रधान संस्कृतीत, स्त्रीने नेहमीच दबलेले राहावे, अशी पुरुषाची अपेक्षा असते ही कल्पना वर्षानुवर्षे स्त्रियाही मनात जपत आल्या आहेत. स्त्रीने कुटुंबाची प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे. आणि कुटुंबात तिने गुलामासारखे राबले पाहिजे. एक पत्नी म्हणून तिने आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. पण तिने स्त्री म्हणून कोणत्याही हक्काची मागणी करता कामानये, अशी पतीची अपेक्षा असते. स्त्रीला घरची राणी, गृहलक्ष्मी असे म्हटले जाते. पण प्रत्यक्षात मात्र तिला तसे स्थान कुटुंबात नसते. आर्थिक स्वातंत्र्याअभावी प्रत्येक गोष्टीसाठी तिला पिता–पती–पुत्र यांच्यावर अवलंबून राहावे लागते.

कुटुंबात तिचा अनेक व्यक्तीशी संबंध येतो. त्यातून अनेक नवीन जाती व नसे संबंध निर्माण होतात. सासू–सून संबंध निरोगी असतील तर सुनेचे जीवन सुसह्य होते. काही कुटुंबात सासू म्हणून वावरणारी स्त्री चांगल्या विचाराची नसते. ती येणाऱ्या सुनेकडे आपली स्पर्धक म्हणून बघते तिला कामाला लावले जाते. आर्थिकदृष्ट्या सून स्वतंत्र असेल तर काही

सासवांना ते आवडत नाही. त्यातून संघर्ष निर्माण होतो. सासू म्हणून वावरतांना बऱ्याच स्त्रियांना हुंडा हवा असतो. ही हुंड्याची रक्कम मुलीकडून मिळाली नाही. तर अशा सासवा प्रसंगी मुलीचा (सुनेचा) हुंडाबळी घडवून आणतात. तिला जाळून मारल्याची उदाहरणे अनेक भारतीय कुटुंबात घडली आहेत.

काही कुटुंबात सासू-चांगली असते तर सून चांगली नसते. सून आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असेल आणि घरात काही च करीत नसेल तर सासू म्हणजे एक काम करणारे यंत्र अशी तिची भूमिका राहते. पती-पत्नी दोघे बाहेर गेल्यावर मुलांची जबाबदारी सासूवर पडते. मुलांची देखभाल घरकाम इ. नीट करता आले नाही तर सासू-सून संघर्ष सुरु होतो हा संघर्ष टोकाला गेला तर घरातील वृध्द आईवडिलांची रवानगी ही वृध्दाश्रमात होते.

निवासाची समस्या :-

ग्रामीण भागात स्त्रियांना नोकरी मिळाल्यावर ती गावाची रशिवाशी नसेल तर तिला प्रथम आपल्या निवासाची व्यवस्था करावी लागते. हे निवासस्थान सुरक्षित नसेल तर तिला प्रथम आपल्या निवासाची व्यवस्था करावी लागते. हे निवास्थान सुरक्षित ठिकाणी असेल तर तिला फक्तारसा त्रास होत नाही. शिक्षिका, ग्रामसेविका, परिचारिका, डॉक्टर्स इ. ना. खेड्यात नोकरीसाठी राहावे लागते. खेड्यातील असुरक्षित वातावरणामुळे ह्या सर्व स्त्रियांचे मन तेथे रमत नाही. आणि पुन: त्याशहरात बदली करुन घेण्यासाठी प्रयत्न करतात. निवासाची समस्या हा ग्रामीण भागातील नोकरीचा एक मोठाच प्रश्न आहे.

कष्टकरी, मजूरवर्गातील स्त्रिया :-

ग्रामीण भागात शेती, बांधकाम, धान्याच्या बाजारपेठा इ. ठिकाणी कुशल, अर्धकुशल, स्त्रियांना नोकरी दिली जाते. परंतु समान कामाला समान वेतन ही घोषणा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये होऊनही शेतीव्यवसायात व उद्योगधंद्यात तिला समान वेतन देण्याची टाळाटाळ होते. श्रमिक कष्टकरी महिला दिवसीार कष्ट करुनही त्यांच्याजवळ 'विष खायला' ही स्वत:ची कवडी नसते. आपला पैसा ती नवऱ्याच्या खातीजमा करते. कुठलाही खर्च करतांना नवऱ्याला कल पाहून त्याच्याकडे पैसे मागावे लागतात. आणि तो खुषीत असला तरच त्यांना ते मिळतात. अन्यथा मनात असले तरी आपल्या आईवडिलांना किंवा भावाबहिंर्णीनाही कष्टकरी स्त्री काहीही देऊ शकत नाही ही तिची खरी समस्या आहे.

ग्रामीण भागातील राजकीय पुढारी व राजकारण :-

ग्रामीण भागात स्त्रियांना नोकी करीत असतांना, तेथील राजकारणी लोकांच्या कारवायांना तोंड द्याव लागते. काही ठिकाणी राजकारणाचा वापर करुन नोकरी करणा ्या स्त्रियांना त्रास दिला जातो. त्यात ती स्त्री अविवाहित असेल तर तिचे हाल फक्तार होतात. प्रसंगी तिचे चारित्र्यहनन होते. गावातील पाटील, श्रीमंत शेतकरी, सरपंच पोलिस पाटील,

पतपेढ्यांचे चेअरमन, साखर कारखान्याचे चेअरमन या सर्वांच्या नजरांना, राजकारण प्रक्रियेला तिला तोंड द्यावे लागते. ह्या सर्वांतून तिला स्वत:चे चारित्र्य उत्तमप्रकारे सांभाळावे लागते. ग्रामीण भागात अशा स्त्रीकडे कोण येते व जाते याकडेही लोकांचे बारीक लक्ष असते. गावातील रिकामटेकडी माणसे या नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या हालचालींवर लक्ष ठेवून असतात. आपल्या कोणत्याही मागण्यांना अशा रीतीने तडफदारपणे व बाणेदारपणाने जर विरोध केला तर गावातील लोक तिला संपवून टाकतात किंवा शेवटी कंटाळून अशी स्त्री स्वत:चा शेवट करते.

मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न :–

ग्रामीण भागात स्त्रिया नोकरी करीत असतांना त्यांना स्वत:च्या मुलांच्या शिक्षणाची काळजी असते. आपल्या मुलांना चांगली शाळा व चांगले शिक्षण मिळावे, अशी तिची इच्छा असते. असे शिक्षण फक्त शहरातच मिळते, अशी तिची समजूत असते व ती रास्तही आहे. कारण आज अनेक खेड्यात शाळांमध्ये पुरेसा शिक्षण वर्ग नाही विद्यार्थ्यांना नीट शिक्षण मिळत नाही. त्यामुळे अशी स्त्री बदलीच्या खटपटीत असते. आणि केव्हा एकदा हे गाव सोडून जाते, असे तिला वाटते.

उपाययोजना :–

१. ग्रामीण तसेच शहरी भागातील, नोकरी करणाऱ्या स्त्रियांना पुरेसे संरक्षण मिहाले पाहिजे.आज दोन्ही ठिकाणी असे दिसते की, असुरक्षिततेचे जनक बदलले पण स्त्रीच्या जीवनात असुरक्षितता कायम आहे. कोणत्याही व्यक्तीचा विकास हा सुरक्षित वातारणातच चांगला होऊ शकतो. कोणत्याही स्त्रीवर संकट आले असता, गावतील ती ज्या ठिकाणी राहते किंवा शहरात राहते तेथील व्यक्तींनी तिची मदत केली पाहिजे.

२. स्त्रियांना आज विविध क्षेत्रात ३० टक्के आरक्षण द्यावे असे म्हटले आहे. पण अजून या ठरावाची अंमलबजावणी म्हणावी तितकी झालेली नाही. स्त्रियांसाठी रोजगाराच्या संधी वाढविल्या पाहिजेत. व्यावसायिक व तांत्रिक कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टीने त्याबाबत योग्य त्या योजना आखल्या पाहिजेत व हे कौशल्य शिकण्यासाठी त्यांना पुरेशी संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. स्वयं रोजगाराचीही संधी स्त्रियांना मिळाली पाहिजे.

३. बऱ्याचशा स्त्रिया कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी नोकऱ्या करतात. सिनेमा, टी.व्ही. पाहणाऱ्या सौंदर्य प्रसाधनाचा वापर करणाऱ्या मूठभर स्त्रिया या हा आक्षेप घेणाऱ्या लोकांच्या समोर असतात. प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय असते, ते त्यांना माहित नसते. म्हणून ह्या प्रश्नाकडे पाहण्याची पुरुषांची मनोवृत्ती बदलणे आवश्यक आहे.

४. अर्थार्जन करणारी स्त्री ही 'पुरुषी' होते. अशा आक्षेप काही मंडळी समाजात करीत

असतात. 'पुरुषी' या शब्दाची स्पष्ट व्याख्या त्यांना करता येत नाही. पण हा आक्षेप योग्य नव्हे. आर्थिक स्वावलंबनामुळे आणि स्वत:वरील अन्यायामुळे ती आज ताठ मानेने समाजसमोर उभी राहू शकते. व आपला निर्णय ठामपणे घेऊ शकते. यात ती मोठी 'पुरुषी' झाली असे होत नाही.

५. स्त्री मिळवती असली तरी सुध्दा तिला आई, गृहिणी आणि मिळवती स्त्री अशा तिहेरी भूमिका पार पाडाव्या लागतात. ह्या तिन्ही भूमिकांचा समन्वय तिने आपल्या जीवनात घालावा, असी सर्वांची समजूत असते. पण हा समन्वय घालताना घरातील पतीचे व मुलांचे तिला योग्य सहकार्य व मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे, असे मिळाले तरच तिचे जीवन सुसह्य होते.

६. ग्रामीण भागात शिक्षिका, ग्रामसेविका, परिचारिका व डॉक्टर्स यांना पुरेसे संरक्षण मिळणे आवश्यक आहे. जया समाजात निर्भयतेचे वातावरण आहे तेथेच स्त्रियांचा उत्तम विकास होऊ शकतो. हे वातावरण स्त्री-पुरुष संबंधातील निरोगीपणावर अवलंबून असते. बदली झालेल्या गावी जर नोकरी करणाऱ्या महिलांना 'काळ्या पाण्याची शिक्षा' असे वाटत असेल तर तेथील असुरक्षित वातावरणामुळे आपले कर्तव्य उत्तमप्रकारे पार पाडू शकणार नाहीत. म्हणून ग्रामीण भागातील सामाजिक, वातावरण चांगले हवे. राजकारणी व्यक्तीनीही संधी साधूपणा करता कामा नये. व ती वृत्ती ठेऊन स्त्रियांचा बळी घेता कामा नये.

७. सर्वत्र बेकारी माजलेली असताना, स्त्रियांनी नोकऱ्या करुन त्यात भर का घालावी, असा आक्षेप स्त्रियांच्या नोकरीवर येतो. या प्रश्नाला एकापेक्षा अनेक पैलू आहेत. तसेच या प्रश्नाला व्यक्तिगत बाजूही आहे. स्वत:ची बहीण किंवा मुलगी यांना चांगली नोकरी मिळाली तर त्यांच्या नोकरीला त्याचा विरोध नसतो. हा त्याचा विचार दुटप्पी असतो. स्त्रियांच्या नोकरीवर अनेक कुटुंबे तसेच शिक्षणासाठी त्यांचे नातलग हे अनेक वर्षापासून अवलंबून असतात.

सारांश :-

नोकरी करणाऱ्या मिळवतीचीही काही दु:खे असतात. ही दु:खे अन्यायाची, अत्याचाराची पक्षपाती दिली जाणारी वागणूक याबाबतची असतील. पण ती दु:खे व वेदना पुरुषांनी वाढविता कामा नयेत. स्त्रीला स्वावलंबी जीवन व स्वतंत्र सामाजिक अस्तित्व हे समाजाला उपकारच ठरते. स्वातंत्र्यानंतरच्या ५०-५२ वर्षाच्या कालखंडानंतरही तिला जर माणुसकीची वागणूक मिळत नसेल तर समाजाची प्रगती होऊ शकणार नाही. हे लक्षात घ्यावे.

संदर्भ :-

१)महिला कलण आणि विकास, प्रा. सौ. माधवी कवि, विद्या प्रकाशन, नागपूर ४४०००२

14 नारी स्वतंत्रता का एक कड़वा सच

डॉ. फिरोज एस खान,
उर्दू विभाग प्रमुख
मातोश्री शांताबाई गोटे आर्ट्स कॉमर्स एंड साइंस कॉलेज,
वाशिम-४४४५०५
Mob.no.9420292170
Email- ferozkhan9420292170@gmail.com

प्रस्तावना।

स्वतंत्रता का हक, यह जीवन पद्धति की आत्मा है । मानवी जीवन का वह एक अहम मूल्य है हर इंसान को अपने व्यक्तिमहत्व के महत्वके विकास के लिए और समाज कल्याण के लिए स्वतंत्रता की जरूरत होती है। नारी अधिकारों को और संकल्पों को याद दिलाने के लिए हर वर्ष ८ मार्च को अंतर्राष्ट्रीय महिला दिवस भी मनाया जाता है। भारतीय संदर्भ में प्राचीन समय से नारी के अधिकारों एवं भूमिकाओं में परिवर्तन दिखाई देते हैं। विदेशी आक्रमणों से भारतीय समाज में बदलाव हुए हैं, भारतीय नारी की दिशा और दशा यही से सही मायने में बदली है।

लेकिन भारत में नारी हर समय समाज का सं संवेदनशील मुद्दा रही है इसीलिए महामानव डॉक्टर बाबासाहेब अंबेडकर ने संविधान में इसका उल्लेख किया है कि अनुच्छेद १५ केवल धर्म, मूल वंश, जाति, लिंग,जन्म,स्थान या इनमें से किसी ही आधार पर भेदभाव पर रोक लगाता है। इसीलिए आज संवैधानिक सामाजिक और सरकारी क्षेत्र में नारी के साथ भेदभाव की स्थिति कुछ हद तक खत्म कर दी गई है, लेकिन दुनिया में बहुत सारे मामलों में नारियों को अभी तक पुरुष के समकक्ष नहीं माना जाता नारी जगत की जननी है, जो विश्व का पालन पोषण करती है लेकिन उसकी सदा निंदा ही की जाती है।प्राचीन काल से ही नारियों का दर्जा एक विवाद का विषय रहा है। इसकी वजह सिर्फ यही नहीं है, की नारियां दिमागी तौर पर कमजोर होती हैं। बल्कि इसकी एक अहम वजह हमारे पवित्रता संबंधी संकुचित विचारधारा भी हैं ।

अनेक पश्चिमी विद्वानों ने यहां तक मान लिया हैं, कि नारी के कुछ ऐसे जन्मजात दोष है, जिनकी वजह से वह पुरुषों के साथ समानता का दावा नहीं कर सकती। फ्राइड ने स्त्रियों के संदर्भ में यह कहा हैं ,कि उनमें न्याय की भावना बहुत कम होती हैं ।क्योंकि उनके दिल और दिमाग में ईर्ष्या भरी हुई हैं । लेकिन हिंदू समाज में स्त्रियों को संपत्ति, ज्ञान, और शक्ति का प्रतीक माना गया हैं ।जिस की अभिव्यक्ति के रूप में लक्ष्मी, सरस्वती, दुर्गा की पूजा की जाती हैं । इस्लाम में मां के पैरों तले जन्नत मानी जाती हैं ।लेकिन यह हमारा दुर्भाग्य

हैं,कि स्त्रियों में लज्जा, ममता और स्नेह की खूबियों को दुर्बलता समझ कर पुरुषों ने उनका मनमाना शोषण करना शुरू कर दिया हैं।वास्तविकता यह है कि पुरुष आज भी नारी को गंधारी के रूप में देखना पसंद करता है लोग अपवाद के कारण सीता की तरह उसे बहिष्कृत कर देता हैं। एक और नारी की छोटी सी भूल को क्षमा करने के स्थान पर अहिल्या बना देता, दूसरी ओर द्रोपदी के रूप में उपभोग भी करना चाहता हैं।

वैधानिक नजरिए से नारियों की स्थिति को ऊंचा उठाने के लिए बहुत प्रयास और उपाय किए गए हैं। लेकिन उनके साथ भेदभावपूर्ण रवैया तथा उनका अपमान, तिरस्कार व प्रताड़ना अभी भी जारी हैं।अनुसूचित जाति- जमाती और अन्य कमजोर वर्गों की नारियां सामाजिक रूप से पिछड़े होने के अलावा आर्थिक रूप से शोषित भी होती हैं। उन्हें न केवल उनके नारी होने की वजह से पक्षिपात का सामना करना पड़ता हैं,बल्कि युग युगांतर से चली आ रही छुआछूत की मार भी झेलनी पड़ती हैं ।ज्यादातर ग्रामीण क्षेत्रों में उच्च जाति के लोगों को जब कभी ऐसा लगे कि निम्न जाति के लोगों का वर्ग उनके अधिकारों पर प्रभुत्व पाता हैं ,तो वह इन जातियों की नारियों पर अपना गुस्सा निकालते हैं। उनका अपमान और सामूहिक बलात्कार करते हैं, नग्न अवस्था में उन्हें गांव में घूमते हैं। अभी हाल ही में मणिपुर की घटना इसका उदाहरण है। भारत में ऐसी हजारों घटनाएं हैं, जिन पर आज भी कोर्ट में मुकदमे चल रहे हैं।

पुरुष प्रधान संस्कृति में पुरुषों का स्थान श्रेष्ठ हैं ।इस वंश परंपरा को जारी रखने के लिए बेटा जरूरी होता हैं, और इस अंधी चाहत में मां-बाप, अपनी कन्या शिशु की जान लेने में जरा भी आगे पीछे नहीं देखते, जब से भ्रूण लिंग का पता लगाए जाने की सुविधा हुई, तब से न जाने कितनी कन्या शिशु इस संसार में आने से रोकी गई है?

नारियों के शोषण उत्पीड़न का एक स्वरूप, बालिकाएं, नारियों का अपहरण के रूप में भी सामने आता हैं ।भारत में हर साल अपहरण के हजारों मामले दर्ज होते हैं। इसी तरह पारिवारिक अत्याचार और दहेज से हत्या, वेश्यावृत्ति अथवा देह व्यापार,अश्लील साहित्य, मोबाइल में अश्लील वीडियो, अश्लील चित्र, अश्लील विज्ञापन, अश्लील फिल्मेंं बनाई जाती हैं, जिसकी वजह से नारी की इज्जत और स्वतंत्रता हमेशा खतरे में रहती हैं।

निष्कर्ष

भारतीय समाज की रचना पुरुष प्रधान है। जिसमें पुरुषी नजरिया महिलाओं के प्रति हमेशा नकारात्मक रहा है, यह वजह है कि हर समाज व्यवस्था में नारियों की स्थिति में सुधार लाने हेतु कितने भी भरपूर प्रयास क्यों न किए जाएं वह कामयाब नहीं हो पाए आज फिर एक बार नारियों का दर्जा सुधारने में शासन हर संभव प्रयास कर रहा है, पर जब तक पुरुष इसमें अपना हिस्सा योगदान प्रदान नहीं करता या नारियों के सशक्तिकरण के प्रति अपना सकारात्मक नजरियों के साथ किरदार नहीं निभाता, नारी अपने दायित्व से छुटकारा नहीं पा

सकती, चाहे आंकड़ों के हिसाब से करोड़ों रुपए खर्च क्यों ना हो अपेक्षित नतीजा पुरुषों के सहयोग पर ही टिका हुआ है। नारी के अधिकारों को लेकर सूलझे हुए चिंतन की जरूरत है। यह बात सच है, कि आज परिवार और समाज में उसकी सामाजिक स्थिति बदल रही है, नारी सबली करण के लिए कायदों के अमल के साथ-साथ समाज की मानसिकता में सकारात्मक बदलाव होना बेहद जरूरी है।

संदर्भ सूची।

१) डॉ. निशांत सिंह, महिला राजनीति और आरक्षण

२) एम.एस. अंसारी, महिला और मानव अधिकार

३) चंद्र राकेश, २०११, वुमन एंपावरमेंट इन इंडिया माइलस्टोन एंड चैलेंजिस, लखनऊ

४) आर. एस. नर्लेकर ,महिला स्वतंत्रता की वास्तवता.

५) डॉ. मंजू लता,अनुसूचित जाति में महिला उत्पीड़न, पृ ८

६) एम. एस. अंसारी, राष्ट्रीय महिला आयोग और भारतीय नारी ,पृ २३० -२३१

15 सच के आईने में महिला सशक्तिकरण कल और आज

डॉ अनूप सिंह,
शासकीय महाविद्यालय लोधीखेड़ा
छिन्दवाड़ा मध्यप्रदेश

इस २१वीं सदी में संपूर्ण भारत से एक ही आवाज आती है की महिलाओं ने सभी क्षेत्रों में सर्वोच्च कम करने के साथ ही समाज को अपना सर्वश्रेष्ठ योगदान देने का काम किया है यह भी कहा जाता है कि वह पुरुषों के साथ कंधा से कंधा मिलाकर हर हर क्षेत्र में अपनी भूमिका निभा रही है ।यह सही है कि महिलाओं को जहां भी अवसर मिला है उन्होंने समाज और देश की लिए अपना सर्वस्व निछावर करते हुए उसे मजबूत और तार्किक बनाया है। डॉ राम मनोहर लोहिया अपने सप्त क्रांति के सिद्धांत में लिखा है कि नर नारी समानता होनी चाहिए उन्होंने कहा कि पिछड़ा पावें १०० में ६० इसमें उन्होंने सभी समाज के महिलाओं को शामिल किए थे उन्होंने यह भी कहा था कि महिलाओं को हर क्षेत्र में समान अवसर मिलना चाहिए।

महिलाओं ने देश और समाज को अपना सर्वश्रेष्ठ योगदान देने का काम किया है इसका उदाहरण हमें इतिहास में तो मिलता ही है, गांधी जी द्वारा चलाए गए सत्याग्रहों में भी सहजता देखने को मिलता है, दक्षिण अफ्रीका में जो भारतीय महिलाएं घर से बाहर नहीं निकलती थी जिनमें किसी के पति जेल में थे किसी के भाई जेल में थे ,किसी के बेटा जेल में थे, वह महिलाएं सत्याग्रही बनकर यह कह रही थी कि घर के पुरुषों की भांति उन्हें भी जेल में डाल दिया जाए । वालीअम्मा नाम की एक १६ साल की लड़की जेल में बीमार पड़ी और बाहर आकर मर गई जो महिलाएं बाहर जाने से डरती थी, सत्याग्रह ने उनका यह भय मिटा दिया ।।जो यह भ्रम बन गया था कि औरत का जन्म इसलिए होता है कि वह घर में रहे या हालत जल्दी बदल गई और जब गांधी जी देश लौटे तो अमीर गरीब सभी के घर की महिलाओं को आजादी के आंदोलन में हिस्सा लेने की गुहार लगाई उनके लिए जगह-जगह प्रशिक्षण रखा गया देखते-देखते महिलाएं इतनी ताकतवर बन गई किस १९३० के गुजरात में नमक सत्याग्रह में अंग्रेज सरकार ने जिन लोगों को गिरफ्तार किया था उनमें औरतों कि संख्या ही ज्यादा थी ,कमला देवी चट्टोपाध्याय इस आंदोलन की नेता बनकर उभरी । गांधी के सत्याग्रह और महिलाओं के सत्याग्रही बनने का प्रमाण इसी से मिलता है कि देश के आजाद होते ही महिला और पुरुष को समान मात्रा में वोट देने का अधिकार मिला यह गांधी का प्रभाव था।

